
शनिवार । १४ एप्रिल १९७९
७५ पैसे

# माणूस



## कोट्यावधींना रोगमुक्त करणारा सरकारी औषधी कारखाना स्वतःच आजारी का?

## हिंदुस्थान ॲंटिबायोटिक्स

रौप्यमहोत्सवा निमित्त खास लेख

**साप्ताहिक माणूस**

वर्ष अठरावे-अंक सेहेचाळीसावा

१४ एप्रिल १९७९

मूल्य ७५ पैसे

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४ ३४ ५९

¤

# सप्रेम नमस्कार

¤ आपल्या ७ एप्रिलच्या अंकातील विनय गुणे यांचा संगमनेर दंगलीवरचा लेख वाचला व आवडला. लेख छोटा आहे, दंगलीचा सखोल अभ्यास त्यात नाही, कारणमीमांसा फारशी नाही; पण या घटनेकडे पहाण्याची गुणे यांची दृष्टी साफ व निकोप आहे, ही फार महत्त्वाची बाब आहे. हितसंबंधी लोक दंगल पेटवतात आणि निरपराध माणसे त्यात भरडून निघतात, हे एरवीचे विदारक सत्य याही लेखाच्या वाचनानंतर जाणवले. ज्यांना हिंदुराष्ट्रे निर्माण करायचीत किंवा जग इस्लाममय करायचेय ह्या मंडळींची राजकीय उद्दिष्टे अशा दंगलींतून साध्य होत असतील; पण रद्दीचे दुकान चालवणारा शाम पारख किंवा घड्याळे दुरुस्त करणारा रशीद यांना त्यासाठी जो फटका बसलाय ते आपल्या संस्कृतीला खाली पहायला लावणारा आहे. या सगळ्या दाहक जाळात शीतळ करणारी, आशादायक बाब हीच की सामान्य माणसे धर्माकडे न पाहता केवळ माणूस म्हणून दुसऱ्याचा जीव वाचवतात. मराठवाडा दंगलीनंतर दंगलीमुळे अस्वस्थ न होता, दंगलीत भरडलेल्यांना जराही मदत न करता मराठवाड्याची अस्मिता वगैरे विषय गंभीरपणे चघळणाऱ्या विद्वानांपेक्षा ही संगमनेरची काही सामान्य माणसे फार मोठी आहेत.

५ एप्रिल **अनिल अवचट, पुणे**

¤ लोकनायक जयप्रकाशजी यांचे दुखणे वाढल्यामुळे त्यांना पाटण्याहून मुंबई येथे 'जसलोक'मधे हलवण्यात येऊन, त्यांचेवर तज्ज्ञ डॉक्टरांकडून शिकस्तीने उपाय चालू आहेत; परंतु या वेळी जो जो म्हणून 'कोणी तरी' आहे, असा प्रत्येकजण आपले नित्याचे उद्योग टाकून जसलोकच्या आवारात गर्दी करीत होता ते कशासाठी? त्याच्या तेथे गर्दी करण्याने हॉस्पिटलच्या व्यवस्थेवर विनाकारण ताण पडला. डॉक्टरांना आपापली कामे करणे कठीण गेले, इतर रुग्णांना त्रास झाला, एवढेदेखील त्या बड्या मंडळींना समजू नये काय? प्रत्येकाने आपापल्या उद्योगात मग्न राहून जयप्रकाशजींच्या प्रकृति-स्वास्थ्यासाठी प्रार्थना करणे इष्ट! परंतु देखावा करणे हेच महत्वाचे असल्यामुळे ज्या मंडळींचा देव, प्रार्थना इत्यादींवर मुळातच विश्वास नाही, ते देखील प्रार्थनेला घोळक्याने बसले. ज्या रा. स्व. संघावर तीनही त्रिकाळ सारेजण तोंडसुख घेत आहेत त्यांनी निदान एक गोष्ट त्यांचेपासून शिकण्यासारखी आहे. प्रत्यक्ष संघाचे सरसंघचालक अत्यवस्थ असताना व त्यांचे निधन झाल्यावरही संघाचे दैनंदिन कार्यक्रम एवढेच नव्हे तर अधिकारी शिक्षणवर्ग हे देखील नेहमीप्रमाणे चालू होते.

२७ मार्च **नाना नरवणे, मुंबई**

¤ 'माणूस' (३१ मार्च)मधील, श्री. ग. मा. यांचे (संपादकीय!) 'जसलोकजत्रा'-संबंधीचे विचार वाचले. उत्तमच आहे हे विश्लेषण, फार छान आहे. अलीकडे 'येन-केन प्रकारेण' एकाबरोबर दुसऱ्याचे, पर्यायाने त्यात स्वतःचे, व्यक्तिमत्त्वाचे स्तोम माजवून चारचौघात पुढारीपणाचे चित्र (बोगस!) उभे करावयाचे फँड निर्माण करण्याचा आटापिटा सर्वत्र सर्रास चालू असतो. ही गोष्ट समाजाचे सर्व थरांतून विशेषत: उच्च-स्तरीय पातळीतून अधिक जाणवत आहे. (सामान्याचा प्रश्नच सोडा!) ह्यात स्पृहणीय असे काहीच दिसत नाही तर बौद्धिक दिवाळखोरीच अधिक उठून दिसते. जे. पीं.बरोबर इतरही अनेक रुग्ण स्वास्थ्याची अपेक्षा करीत आहेत. त्याची पर्वा या जत्रे-

करूंना कशी असणार? आपल्या व्यक्तिमत्त्वाची जाहिरात कशी होते...फोटोप्रसिद्धी कशी होते याकडेच लक्ष अधिक. हे संतापजनक तितकेच किसळवाणे होय.

रेडिओ जे. पीं बद्दल वृत्त सांगत असतो. 'राष्ट्रपतींनी—जयप्रकाशजींची चौकशी केली. मुख्यमंत्री आणखी अमके-तमके, नारायण यांचेबद्दल विचारपूस करते झाले. जयप्रकाश नारायण यांची प्रकृती ठीक आहे. डॉक्टर यांनी नारायण यांच्या प्रकृतीबाबत निवेदन केले. नारायण यांची फोनवर चौकशी—नारायण यांच्या प्रकृतीत बदल'. हे असे अनेक वेळा ऐकून ऐकून लोकांचीही 'अती झाले व हसू आले' अशीच स्थिती होते. डॉ. रिंदानी नारायण यांच्या प्रकृतीबद्दल म्हणाले, 'नारायण यांना आता डायलेसिसवर ठेवले आहे' इ. इ. वृत्त देणाऱ्या रेडिओ निवेदकाचीही तारीफच. त्यापेक्षा जयप्रकाशजी, जे. पी. किंवा लोकनायक हे सुटसुटीत म्हणायला हरकत काय आहे?

६ एप्रिल — **दत्तू गोरे, पुणे**

# मुक्ताफळे

**ग्यानबा**

## ◻ 'मधु' मधुरा तव गिरा

'आंतरराष्ट्रीय बालकवर्ष' सुरू होऊन आता शंभर दिवस झाले आहेत. बालकांसाठी मोठी माणसे काही करत नाहीत, तेव्हां या वर्षात बालकांसाठी मोठ्या माणसांनी सगळे काही करून टाकायचे आहे. म्हणजे पुढच्या वर्षापासून वटवट नको! बालकाने हट्ट केला—शक्यतो पुराच करायचा. बालकाने उगाच भोकाड पसरले—चापटीदेखील मारायची नाही; बालकाने अभ्यास केला नाही—रागवायचे नाही. कालिदासाने शाकुंतलात बालकांविषयी म्हटले आहे—'धन्यास्तदङ्गरजसा मलिनी भवन्ति।' मांडीवर बालक आहे, त्याच्या निरागस हास्यातून दंतकळ्या अस्पष्ट दिसत आहेत, त्याचे बोबडे बोल सुंदर भासत आहेत, अशा बालकांच्या धुळीने माखलेल्या पायांनी ज्यांची शरीरे मलिन होतात ते बाप धन्य होत...वगैरे. सगळीच बालके अशी नसतात. पुष्कळ बालके दंतकळ्या चावण्यासाठी वापरतात. देहधर्म त्यांना मांडीवर घेतल्यावर उरकण्यात मौज वाटते; परंतु या वर्षात अशी अपवादात्मक बालके जरी असली तरी त्यांच्यावर आपण रागवावयाचे नाही. त्यांना जवळ घ्यायचे—लोकांनी म्हटले पाहिजे—'हे बाप धन्य होत!'

तर या वर्षी बालकांची चंगळ आहे, ही गोष्ट बालपण हरवून बरीच वर्षे झालेल्या माणसांनी हेरली आणि त्यांनी पुन्हा बालरूपे धारण केली आहेत. ही मंडळी हट्ट करत आहेत, त्रागा करीत आहेत, भोकाड पसरत आहेत, चावत सुटली आहेत, विधिनिषेध आपल्याला मंजूर नाही हे त्यांनी स्पष्ट केले आहे...आणि तरीही वृत्तपत्रे त्यांच्या बाललीला ठळक मथळे देऊन छापत आहेत. याचे कारण हेच, की यंदा बालकवर्ष आहे.

आता लिमयांचे मधूजी काय म्हणतात पहा—

'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही या देशातील सर्वात मोठी जातीय शक्ती आहे. धर्मनिरपेक्षता, समाजवाद व लोकशाही प्रजासत्ताक स्थापन करण्यासाठी लढा देणे ही अत्यावश्यक बाब आहे. यासाठी संघाविरुद्ध लढा देणे ही गरज आहे.आणीबाणीला आम्ही विरोध केला असा जो संघातर्फे दावा केला जातो तो खोटा आहे आणीबाणीच्या काळात सरसंघचालक देवरस यांनी इंदिरा गांधी व विनोबा भावे यांना पत्रे पाठवली होती.'

मधूजी हे कोठे बोलले माहीत आहे? दिल्लीला एक 'सांप्रदायिकता विरोधी संघ' आहे. सुभद्राताई जोशींची ही किंडरगार्डन आहे. तिथे खूप मुले नेहमी जमतात. तिथे २४ मार्चला मधूजी गेले होते मधूजी इतके छान बोलले की, सुभद्राताईंनी त्यांची पाठ थोपटली. सुभद्राताई म्हणाल्या,

'मधूजी पहा किती हुषार आहे. किती सभाधीट आहे. या देशात आता एकच धोका आहे! तो मधूजींनी बरोबर ओळखला. चला मुलांनो, आता कामाला लागा! देश वाचवायचा आहे का...'

सुभद्राताईंनी या धीट मधूजींचे जे कौतुक केले ते कुणालाही आवडावे असेच आहे; पण मधूजींनी आम्हांला एक सांगावे—संघाचा मुलगा म्हणजे 'अशी पाखरे येती' या नाटकात विजय तेंडुलकरांनी 'बंडा' दाखवला आहे तशीच मुले ना! तेंडुलकर केवढे मोठ्ठे नाटककार! त्यांच्या नाटकातली पात्रे ही मुळी प्रातिनिधिकच असणार. आम्ही ते नाटक पाहिले. खूप हसलो. लष्करी छावणीत चालल्यासारखा तो बंडा घरातच चालतो काय, सारखा शाखेत काय जातो, अर्धी चड्डी काय घालतो. बरे झाले आमचे तिकिट पहिल्या रांगेतले नव्हते. रंगभूमीवर अर्धी चड्डी घालून वावरायला बंदीच केली पाहिजे! आणि जग ही रंगभूमी असल्यामुळे तिथेसुद्धा!! तर असा हा डोके म्हणून शरीरावर 'ठोकळा' वापरणारा बंडा! समजा असे अगदी दहा लाख 'बंडा' एकत्र झाले तरी देशाला कसला बुवा धोका आलाय? 'अशी पाखरे येती' हे जब्बारने दिग्दर्शित केलेले सुंदर नाटक पाहून आमची तर अशी खात्री

झाली होती, की ज्यांना डोके नसते, सतरंज्या घालण्यापरीस ज्यांना दुसरे काम येत नाही, ज्यांना घरातल्या संबंधाबाबत आणि मुख्य म्हणजे मुलीच्या प्रेमाबाबत काही म्हणता काही कळत नाही असे सगळे बंडा संघात जातात! आणि मधूजी म्हणतात 'या बंडांपासून देशाला धोका आहे!' आंतरराष्ट्रीय बालक व असल्याने तरीही आम्ही मधूजींचे सभाधीटपणाबद्दल कौतुक करू!

आता ती देवरसांनी लिहिलेल्या पत्रांची गंमत! आणीबाणीत देवरसांनी इंदिरा गांधींना जे पत्र पाठवले ते आम्ही आता वाचलेले आहे.

हे पत्र देवरसांनी येरवडा कारागृहातून दि. २२।८।७५ ते २५।८।७५ अशा दोन दिवशी थोडे थोडे लिहिले आहे. थोडे थोडे लिहिले आहे त्या अर्थी विचारपूर्वक लिहिले असावे असे समजायला हरकत नाही. या पत्रात देवरसांनी इंदिराजींना लिहिले आहे.

१. मला का पकडले, संघाच्या सुमारे दोन हजार पदाधिकाऱ्यांना का पकडले, संघावर बंदी का घातली याचा उलगडा आपल्या बंदीहुकमात नाही.

२. संघावर लोक खोटे आरोप करतात. गांधींना संघाने मारले असे पूर्वी म्हणत. ते खोटे ठरले. ललित नारायण मिश्रांना आम्ही मारले असे म्हणत ते खोटे ठरले.

३. हिंदू समाजातील व्यक्तींना उत्तम नागरिक व चारित्र्यवान देशभक्त करण्याचा प्रयत्न आम्ही करतो.

४. पूर्वग्रह सोडून आपण असा विचार करावा अशी प्रार्थना आहे. लोकशाही संघटना स्वातंत्र्याचा असलेला मूलभूत अधिकार आपण आम्हाला नाकारीत आहोत.

५. आपल्यास उचित वाटल्यास आपणास भेटण्यास मला आनंदच वाटेल.

म्हणजे येरवडा तुरुंगात डांबल्यानंतर देवरसांनी हे पत्र लिहिले. या पत्रात आक्षेपार्ह काय आहे हे आम्ही आता वयाने बालक नसल्याने आम्हाला तरी कळत नाही. मधूजींना ज्या अर्थी हे आक्षेपार्ह वाटते त्या अर्थी या वर्षात तरी त्यांच्या बुद्धीला शरण जाण्यापलीकडे आपल्या हाती काही नाही. आता बंदिवासात पत्र लिहितो यात तरी काय नवल आहे हं! तुरुंगात लोक आपल्या बायकांना प्रेमपत्रे लिहीत होते. भूमिगत आपल्या बायकोला भेटत होते. जमिनीचे वाटण्यांबाबत वकिलांना भेटत होते...... आणि देवरसांनी मात्र इंदिराजींना देखील पत्र लिहायचे नाही?

मधूजी, तुम्ही इंदिरामावशीकडे का जात नाही? तुमच्या बोलांनी या मावशीला किती आनंद झाला ठाऊक आहे? २७ मार्चला मावशी म्हणाल्या–

'मागे मला जनता सरकारने पकडले तेव्हा पाच लाख लोक तुरुंगात गेले! जर पुन्हा मला पकडले तर त्याचा उपयोग आपला पक्ष वाढवण्यासाठी कसा करावा याचा विचार माझ्या पक्षाने करावयाचा आहे!'

पुढे मावशी म्हणाली–

'माझ्या पक्षाने आणि मी पूर्वी रा. स्व. संघाशी लढा दिला आहे. यापुढेही देत राहू–'

मधूजी, तुम्हाला संघाशी लढा द्यायचा आहे ना? मावशींचा तोच बेत आहे. तुम्ही दोघं मिळून हा लढा दिला तर 'बंडां' चा संघ आणि संघाचे एकूण 'बंड' तात्काळ थंड होईल! मावशी वाट पहात पहात आहेत.

मधूजींनी इंदिरामावशीकडेच जावे असे आम्हाला वाटले याचे मुख्य कारण या आंतरराष्ट्रीय बालकवर्षातही चंद्रशेखर, जगजीवनराम अथवा जॉर्ज फर्नांडिस या लढाईत त्यांच्या उपयोगी पडण्याची शक्यता दिसत नाही. चंद्रशेखर म्हणतात–'व्यक्तिगत रागलोभातून हा संघविरोधी खेळ सुरू झाला आहे.' जगजीवनराम म्हणतात–'संघाने जनता पक्षापुढे कसलाही प्रश्न निर्माण केलेला नाही.' फर्नांडिस म्हणतात– 'पक्षांतर्गत मतभेदांविषयी मी जाहीर वक्तव्य करणार नाही!'

मधूजी, तुम्हाला काय उपयोग या थोर पुरुषांचा मार्ग! इंदिरामावशी, चव्हाणकाका स्टीफनदादा, सुभद्राताई यांच्या अंगणात तुमचे किती कौतुक होईल!

या आंतरराष्ट्रीय बालकवर्षात तुमच्या बोलांनी आम्ही खरोखर तृप्त आहोत...

'मधु, मधुरा तव गिरा!

□


हे पुस्तक प्रत्येक ग्रंथालयात जाईल अशी व्यवस्था करण्यासाठी शासनाने आवर्जून प्रयत्न करावेत.

(रविवार केसरी दि. १० सप्टेंबर १९७८)

–डॉ. वा. ना. कुबेर

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.

सर्वत्र होवो !

◻

जगात लोकांच्या हृदयापर्यंत पोहोचलेली अशी सांस्कृतिक वाहने दोनच. एक बैलगाडी. दुसरी आगगाडी. या दोन वाहनांभोवती माणसाच्या कल्पनांनी जेवढा पिंगा घातला तेवढा कुठल्याही वाहनाभोवती नाही. वेदांमध्ये बैलगाडीच्या चाकाच्या अऱ्यांना सूर्यकिरणांची उपमा दिली आहे. जमिनीवर चालणाऱ्या सर्व वाहनांची ती जननी आहे. गृह्यसूत्रात रंगवलेल्या बैलगाडीत नवविवाहित दांपत्य कसे जाते याचा उल्लेख आहे. मृच्छकटिक नाटकात वसंतसेना दुसऱ्या बैलगाडीत बसल्यामुळे सारे नाटक घडले असे आहे. अगदी आता-आतापर्यंत बैलगाड्यांचे तांडे मालाची वाहतूक करीत भारतभर हिंडत होते. आता-आतापर्यंत बैलगाड्यांच्या रोमहर्षक शर्यती होत आणि आता-आतापर्यंत पौर्णिमेच्या चांदण्यातून जाणाऱ्या एकट्या-दुकट्या बैलगाडीशी जाऊन अश्वत्थामा तेल मागत असे.

आगगाड्या आल्यावर त्यांच्याशीही बैलगाडीचे नाते जुळले. स्टेशनापर्यंत प्रवासी व माल घेऊन बैलगाड्या जाऊ लागल्या. आगगाड्या आल्या व त्यांनी बैलगाड्यांप्रमाणे सर्वांना आपलेसे केले. तिच्या आरंभीच्या काळात काहींनी आगगाडी वर्ज्य ठरविली. लौकरच त्यांचीही मने वळली व आगगाडी हे जातिभेद व अस्पृश्यता निवारणाचे पहिले अस्त्र ठरले. आगगाडीने हे पण दाखवून दिले की, केवळ एकमेकांशेजारी बसून अस्पृश्यतेचे निवारण होणार नाही. त्याहून खोल जावे लागेल.

◻

महापौर वडके व केंद्रीय मंत्री धारिया यांनी जी माहिती दिली त्यावरून सव्वाशे वर्षांपूर्वी आपली पहिली गाडी मुंबई-ठाणे आगगाडी सुरू झाली तेव्हा तिची लांबी तेहतीस कि. मि. होती. आज तेच रूळ एकसष्ट हजार किलोमीटर पसरले आहेत. नव्वद लाख प्रवासी रोज रेल्वेने प्रवास करतात व रोज अकरा हजार गाड्या सुटतात. जनरल मॅनेजर कृष्णचंद्र यांनी प्रथम आपले हिंदी भाषण वाचून दाखविले. ते म्हणाले, 'घाटात तिसरी लाइन टाकली

पुष्ठ ३१ वर

संध्याकाळचे पुणे । दि. बा. मोकाशी

# झुकुझुकु झुकुझुकु आगिनगाडी

श्रोत्यांना शक्य तेवढे 'बोअर' करण्याचा वक्त्यांचा जन्मसिद्ध हक्क असतो. तो सोडून देऊन वक्त्यांनी वेळेआधी दहा मिनिटे आपली व्याख्याने संपविण्याचे आश्चर्य पुणे रेल्वेस्टेशनच्या सहा नंबरच्या फलाटावर झालेल्या समारंभात घडले. समारंभ नवी आगगाडी सोडण्याचा होता. उरलेली दहा मिनिटे भरून काढण्याची जबाबदारी उद्घाटक पाहुण्यांवर आली. समयसूचकता दाखवून पुन्हा उभे राहून, तीन विनोदी किस्से सांगून त्यांनी वेळ भरून काढली !

उद्घाटन पुणे ते जम्मूतावी धावणाऱ्या झेलम एक्स्प्रेसचे होते. समारंभाचे अध्यक्ष पुण्याचे महापौर रामभाऊ वडके होते. केंद्रीय व्यापार आणि नागरी पुरवठामंत्री मोहन धारिया हे गाडी सोडणार होते. मोहन धारिया पुणेकर आहेत. शिवाय ते आमचे आळीकर आहेत. साहाजिकच ते हसतमुख आहेत. मात्र मला एकदा त्यांना रागावलेले पहावयाचे आहे. माझ्यावर नव्हे–दुसऱ्या कुणावर. टिळक रोडला एस. पी. कॉलेजला लागून पर्वतीला जाणाऱ्या आळीत ते राहतात. आम्ही त्याच आळीत फक्त टिळकरोडच्या उलट हाताच्या बोळात राहातो. तुम्हाला वाटेल आमची रोज गाठ पडत असेल; पण ते त्यांच्या कामात, आम्ही आमच्या कामात. दोन डोळ्यांची गाठ पडत नाही तशी आमची स्थिती आहे. दोन भाऊ शेजारी–गाठ फलाटावरी अशी अवस्था झाली आहे. या क्षणी त्यांच्यासमोर काही रांगा मागे मी खुर्चीवर बसलो आहे; पण आळीकर समोर बसलाय अशी ओळख त्यांच्या डोळ्यांत नाही. अर्थात आमची कधी ओळखच झाली नाही, तिथे ओळख लागणार कशी? आमच्या आळीतील एकजण दिल्लीला गेला या कौतुकाने मी हे सारे लिहीत आहे. आम्ही बाहेरगावी गेलो की तिथे लोकांना सांगतो, अहो, मंत्री, मंत्री काय करता? आमच्या आळीत एक केंद्रीय मंत्री राहतो, एक हाय कमिशनर राहतो !

◻

माझ्या डाव्या हातास उद्घाटन होणार असलेली झेलम एक्स्प्रेस नारळ फोडून, कुंकुम लावून पल्लवांनी व पताकांनी सुशोभित उभी आहे. आमच्या माथ्यावर तसाच सजविलेला मंडप आहे. फलाटावर निमंत्रितांसाठी पाऊणशेएक खुर्ची मांडलेली आहे. लोक गर्दीने गाडी जवळून जातयेत, कुणी तरी विशेष मानव आत बसलेले आहेत अशा चेहऱ्याने गाडीच्या खिडक्यांतून डोकावत आहेत. गाडीतल्या लोकांना पहावयास इतके लोक कधी आले नसतील. मोहन धारिया व रामभाऊ वडके येऊन उच्च व्यासपीठावर बसल्यावर ते येण्यापूर्वी चाललेली रेल्वे अधिकाऱ्यांची धावपळ थांबली आहे. व्यासपीठावर दोन फलक टांगले आहेत. डाव्या हाताच्या फलकावर, पुणे जम्मूतवी झेलम एक्सप्रेसका उद्घाटन/1–4–79 असे व उजव्या हाताच्या फलकावर झेलम एक्स्प्रेस उद्घाटन/प्रस्थान 16–50 असे एकाखाली एक लिहिले आहे. दुसऱ्या फलकावरील उद्घाटन हा शब्द अप्रकाशित आहे. गाडी सुटताच तो प्रज्वलित होईल.

व्यासपीठावर मोहन धारिया व रामभाऊ वडके यांच्या दोन्ही हातांना मध्य रेल्वेचे महाप्रबंधक कृष्णचंद्र, मुंबई विभाग व्यवस्थापक अर्जुन प्रसाद आणि चीफ ऑपरेटिंग सुपरिंटेंडंट व्ही. डी. जोग असे तीन अधिकारी बसले होते. संध्याकाळी चार वाजून वीस मिनिटांनी भाषणे सुरू झाली. त्या वेळी श्रोत्यांचे घड्याळाकडे लक्ष असेल यात नवल नाही; पण वक्तेही घडाळाकडे नजर लावून होते. पाचही वक्त्यांनी वीस मिनिटांत आपली भाषण आटोपली. वक्त्यांनी कमीत कमी वेळात भाषणे आटोपण्याचा हा भारतातील विक्रम धरला जाईल. त्याचे अनुकरण

# श्री. भांडारी यांचा लेख : दुसरी बाजू

गंगाधर पटने, आमदार, बिलोली

'बबनराव ढाकणे विरुद्ध बापूराव काळदाते' हा श्री. माधव भांडारी यांचा लेख 'माणूस' साप्ताहिकाच्या ३१ मार्च १९७९ च्या अंकात प्रसिद्ध झाला आहे. 'एक सडेतोड राजकीय लेख' अशा शब्दात संपादकांनी त्याची मुखपृष्ठावर भलावण केली आहे; पण तो लेख वाचल्यानंतर कुणाचीही खात्री पटेल की, जनता पक्षातील पूर्वीच्या समाजवाद्यांच्या नावाने बोटे मोडण्यासाठीच तो लेख लिहिला गेला आहे.

'हे ढाकणे कोण ? असला प्रश्न विचारून महाराष्ट्र जनता पक्षावर पूर्वाश्रमीचा जनसंघ आपली पकड बसवतोय असा आरडाओरडा केला गेला', असे श्री. भांडारी यांनी म्हटले आहे. तो प्रश्न कुणी विचारला ? वास्तविक दै. महाराष्ट्र टाइम्सने लिहिलेल्या अग्रलेखाचे ते शीर्षक होते. महाराष्ट्र टाइम्सचे संपादक हे भूतपूर्व समाजवादी नाहीत. ते समाजवाद्यांच्या सांगण्यावरून अग्रलेख लिहितात असा श्री. भांडारी यांचा समज झालेला दिसतो आहे; पण तो खरा नाही. महाराष्ट्र टाइम्सकार मधु लिमयांना जेव्हा झोडपतात तेव्हाही ते भूतपूर्व समाजवादीच असतात का ?

हे ढाकणे कोण ? हा प्रश्न भूतपूर्व समाजवादी विचारणे शक्य नाही. कारण १९६८ सालापासून डॉ. बापूसाहेब काळदाते, पन्नालाल सुराणा, प्रा. मधु दंडवते हे त्यांना ओळखत असून १९७३-७४ च्या दुष्काळाच्या काळात तर पन्नालाल व मृणालताई त्यांच्या भागात अनेक वेळा गेल्या होत्या. गेल्या विधानसभा निवडणुकीत श्री. बबनराव ढाकणे ह्यांच्या प्रचारमोहिमेतील शेवटची सभा डॉ. काळदाते ह्यांनी घेतली होती. एक जिद्दीचा, निर्भीड, तरुण कार्यकर्ता म्हणून श्री. ढाकणे ह्यांच्याविषयी भूतपूर्व समाजवाद्यांना आदर वाटत आला आहे. म्हणूनच पुलोद मंत्रिमंडळात त्यांचा समावेश व्हावा असा आग्रह पन्नालाल व इतर मित्रांनी धरला होता. पाथर्डी व शेवगाव येथे नुकतीच जी निदर्शने झाली त्याबाबत चौकशी करून आपल्या कार्यकर्त्यांना मदत करण्यासाठी भाई वैद्य व शिवाजी शिंदे हे भूतपूर्व समाजवादीच धावून गेले होते. पक्षांतर्गत निवडणुकांचे पर्व सुरू झाल्यावर प्रदेशाचे अध्यक्षपद डॉ. काळदातेंनी घ्यावे असे श्री. ढाकणे ह्यांनी काहीजणांजवळ म्हटले होते. काही घटना घडत गेल्या व श्री. ढाकणे ह्यांना डॉ. काळदाते ह्यांच्या विरुद्ध निवडणूक लढवावी लागली व त्यात त्यांचा विजय झाला, याबद्दल भूतपूर्व समाजवाद्यांनी श्री. ढाकणे ह्यांना मुळीच दोष दिला नाही. अध्यक्ष या नात्याने श्री. ढाकणे सांगतील ती कामे भूतपूर्व समाजवादी करीत आहेत.

श्री. माधव भांडारी यांनी या संदर्भात पुढे असे म्हटले आहे की, 'केवळ उत्तमरावांना विजयाचा आनंद मिळू नये एवढ्यासाठी निहाल अहमद यांना त्यांच्याविरुद्ध उभे केले. आज काळदात्यांपुढे ढाकणे कोण असा प्रश्न विचारणाऱ्यांना त्या वेळेस, उत्तमरावांपुढे निहाल अहमद कोण ? हा प्रश्न सुचला नव्हता ! ही वृत्ती वर्षभरानंतरही बदललेली नाही. मुंबई जनता पक्षाच्या अध्यक्षपदावर न्याय्य हक्क असलेल्या राम नाइकांना विरोध करण्यासाठी मुकुंदराव ठकोजी पाटील या माणसाला मारून-मुटकून उभे केले गेले.' श्री. भांडारी इतकी बेफाट व इतरांचा अवमान करणारी विधाने का करतात हे त्यांचे त्यांनाच माहीत. श्री. निहाल अहमद यांनी उत्तमरावांविरुद्ध विधिमंडळ पक्षनेतेपदाची निवडणूक लढविली यात त्यांचे काय चुकले ? तेव्हा व आताही निहाल अहमद ह्यांना व इतर सर्व भूतपूर्व समाजवाद्यांना श्री. उत्तमराव पाटील यांच्याविषयी आदरच आहे. निहाल अहमद यांनी सतत वीस वर्षे हालअपेष्टा सोसून काँग्रेसला टक्कर दिली, आणीबाणीच्या काळात १९ महिने तुरुंगवास भोगला. जनता पक्षाच्या स्थापनेपर्यंत ते समाजवादी पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे सभासद होते. महाराष्ट्रात जनता मुस्लिम फोरम स्थापन करून मुस्लिम समाजाला निर्भयतेने संघटित व्हायला त्यांनी शिकविले. हे जर श्री. भांडारी ह्यांना माहीत नसेल तर त्यांच्या राजकीय ज्ञानाची कीव करावी तेवढी थोडीच. पुलोद सरकारमध्ये रोजगार हमी मंत्री या नात्याने उत्कृष्ट कामगिरी ते बजावीत आहेत, असे रोजगार हमीवर काम करणाऱ्या लाखो शेतमजुरांचे मत आहे.

श्री. मुकुंदराव ठकोजी पाटील हे भूतपूर्व संघटना काँग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ते होते व बी. पी. सी. सी. चे काही वर्षे अध्यक्ष होते. ते जनता पक्षाचे लोकसभा उमेदवार होते हे माहीत नसणारे श्री. भांडारी हे राजकीय लेख लिहिण्याचे धाडस कसे करतात, असा प्रश्न 'माणूस' च्या संपादकांनी त्यांना विचारावयास हवा.

श्री. माधव भांडारी यांनी भूतपूर्व समाजवाद्यांवर अनेक खोटेनाटे आरोप केले आहेत. या निवडणुकीत बोगस सदस्य नोंदणी झाल्याचा ओरडाही खूप झाला. खुद्द मृणाल गोरे त्याबाबतीत आघाडीवर होत्या,' असे श्री. भांडारी यांनी म्हटले आहे. त्यांनी असेही म्हटले आहे की, खरं तर जनता पक्षाच्या निवडणूक पद्धतीत बोगस सदस्य नोंदविण्यास वावच नाही'. आपल्याला जनता पक्षाची घटना तोंडपाठ आहे अशा आविर्भावात श्री. भांडारी यांनी पुढे असे म्हटले आहे की, 'पंचवीस प्राथमिक सदस्य नोंदविणाऱ्याला क्रियाशील सदस्य मानून त्यालाच मताधिकार देणाऱ्या काँग्रेसच्या निवडणूक पद्धतीत घोटाळे करायला वाव होता.' वास्तविक केवळ क्रियाशील सभासदाला मताधिकार जनता पक्षाच्या घटनेत नाही; तसा तो जुन्या संघटना काँग्रेसच्या घटनेतही नव्हता. क्रियाशील सभासदाला

मलपृष्ठ १ वर

मुलाखत । विनय सहस्रबुद्धे

# सामान्य कार्यकर्त्याला मी अधिक महत्त्व देतो !

## श्री. बबनराव ढाकणे

बबनराव, सर्वप्रथम महाराष्ट्र जनता पक्षाचे अध्यक्ष म्हणून आपण निवडून आलात याबद्दल मनापासून अभिनंदन ! जनता पक्षातील भांडणे आणि वादविवाद ऐन बहरात असतानाच, एका कसोटीच्या काळात अध्यक्षपदाची ही जबाबदारी आपल्यावर येऊन पडली आहे. अशा परिस्थितीत जनता पक्षाच्या भवितव्याबद्दल आपल्याला काय वाटतं ? जनता पक्षाचा भविष्यकाल उज्ज्वल आहे असे खात्रीशीरपणे म्हणता येईल काय ?

श्री. ढाकणे : जनता पक्षाचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे यात शंका नाही. जनता पक्षाने प्रारंभी एक महान ऐतिहासिक कामगिरी पार पाडली आहे व आताही जनता पक्षाची वाटचाल योग्य दिशेने सुरू आहे. तरी पण आमच्या पक्षासमोर काही समस्याही आहेत व घटकवाद गाडणे ही त्यापैकी एक कठिणतम समस्या आहे. ही समस्या जशी सुजाण नेत्यांनी जाणली आहे, तशीच समंजस कार्यकर्तेही ती जाणून आहेत; पण या समस्येचा बाऊ न करता पक्षनेत्यांनी व कार्यकर्त्यांनी जनता पक्षाचे लोकशाही दृढमूल करण्याचे उद्दिष्ट सदैव ध्यानात ठेवले पाहिजे. १९७७ च्या निवडणुकीत जनता पक्षाबाबत जनतेच्या मनात दृढ विश्वासाची भावना होती आणि त्या विश्वासाला जागणे हे जनता पक्षाचे कर्तव्य आहे. हा विश्वास जागृत ठेवा, जनता सदैव तुमच्याच मागे येईल असे माझे स्पष्ट मत आहे.

प्रश्न : बबनराव, जनता पक्षांतर्गत घटकवाद गाडणे ही कठीण समस्या असल्याचे आताच आपण म्हणालात व ते निःसंशय खरे आहे. अगदी आपल्या निवडणुकीच्या निमित्तानेही या पक्षांतर्गत घटकवादाची चर्चा अनेक वृत्तपत्रांतून झाली आहे. एकूणच, आपल्या निवडीनंतर ज्या प्रतिक्रिया व्यक्त झाल्या त्या संदर्भात आपण काय म्हणाल ?

उत्तर : जनता पक्षाची सेवा करण्याची एक संधी या दृष्टीने मी माझ्या अध्यक्षपदी झालेल्या निवडीकडे पाहतो. पक्षाच्या ज्येष्ठ अशा २०० सदस्यांनी मला पाठिंबा दिला आहे व लोकशाही पद्धतीने मी निवडून आलो आहे. निवडणुकीपूर्वी कदाचित मतभेद असतील; पण आता हा बहुमताचा निर्णय मान्य करून सर्वजण पूर्वीच्याच उत्साहाने कामाला लागले आहेत.

पक्षाध्यक्षपदी माझी निवड झाल्यानंतर महाराष्ट्रातील काही वृत्तपत्रांनी मात्र वेगळाच सूर लावला आहे. मी अप्रसिद्ध व एक प्राथमिक कार्यकर्ता आहे, हे मी नाकारीत नाही; पण म्हणून मी अध्यक्षपदाला अपात्र किंवा कमी पात्र कसा काय ठरेन ? वैचारिक चर्चा करणारे आणि वृत्तपत्रांतून प्रसिद्धी मिळविणारेच फक्त पुढे यायला हवेत, असं या तथाकथित बुद्धिवाद्यांना वाटतं; पण मी एक दुष्काळी जनतेचा प्रतिनिधी म्हणून, गेली दहा वर्षे खेड्यातील सामान्य गोरगरिबांबरोबर राहून, स्वकष्टाने, तळातल्या जनतेतून वर आलेला कार्यकर्ता आहे. गावपातळीवर लोकांबरोबर राहणारा व लोकांना घेऊन पुढे येणारा कार्यकर्ता अध्यक्ष व्हावा, हे या तथाकथित बुद्धिवाद्यांना पटत नाही. त्यांना असं वाटतं याचं कारण त्यांचा संपर्क येतो तो फक्त वरवरच्या पुढाऱ्यांबरोबर. लोकांच्या जीवनाशी समरस होणाऱ्यांची ते दखल घेत नाहीत. आता परवाचीच गोष्ट पहा ना ! जसलोकमध्ये जयप्रकाशजी आजारी होते. माझी कामे, मंत्रिपदाची जबाबदारी इ. सर्व सांभाळून रात्री उशीरापर्यंत मी जसलोकवर थांबत असे; पण हे लक्षात न घेता एका संपादकाने लिहिले की, अनेक नेतेमंडळी लोकनायकांच्या काळजीने जसलोकवर थांबून आहेत; पण राज्य जनता पक्षाचे अध्यक्ष बबनराव ढाकणे काही दिसत नाहीत ! अशी खोटी माहिती देणाऱ्या या संपादकमहाशयांना मी फोन करून सांगितले की, 'अमुक अमुक वेळात मी रोज तिथे थांबतो.' त्यावर ते म्हणाले की, 'फोटोत काही तुमचा चेहरा दिसला नाही, त्यामुळे मला वाटले तुम्ही येतच नाही !'

या संपादकांचेही खरेच आहे. मला काही फोटोत येण्याची हौस नाही. शिवाय मी उंचीनेही एक लहान कार्यकर्ताच आहे, त्यामुळे फोटोत मी कसा येणार ? पण हा कुठलाच विचार न करता या तथाकथित बुद्धिवाद्यांनी मनात येईल ते लिहिले ! मीदेखील एक पत्रकार होतो; पण अशी पत्रकारिता मी कधी केली नाही.

प्रश्न : महाराष्ट्र जनता पक्षाचे अध्यक्ष म्हणून आपण निवडून आला आहात. आता ही अध्यक्षपदाची धुरा सांभाळताना कोणकोणत्या गोष्टींना आपण प्राधान्य देणार आहात ? थोडक्यात म्हणजे, लगेचच हाती घ्यायला हवेत असे काही कार्यक्रम किंवा योजना आहेत काय ? एकूणच आपल्या कार्याची पद्धत, शैली कशी काय राहणार ?

उत्तर : यापूर्वीचे माझे कार्य हे केवळ ग्रामीण समस्यांशी निगडित होते. पंचायत समिती, जिल्हा परिषद इ. तून काम करीत असताना ग्रामीण जीवनाच्या समस्यांशी मी समरस झालो, त्यांचा सखोल अभ्यास केला. हे सारे करीत असताना जे धोरण मी ठेवले होते तेच यापुढेही अवलंबणार आहे. मी नेहमी पदाधिकारी व पुढारी यांच्यापेक्षा तळातल्या सामान्य कार्यकर्त्याला महत्त्व देतो. कारण त्याचा उत्साह टिकला तरच आमच्या योजना टिकणार आहेत मी

कोणत्याही खेडेगावात प्रवेश केल्यानंतर सर्वप्रथम दलित वस्तीला भेट देतो. कारण सामान्य गावकऱ्यांपेक्षा या दीन-दलितांचे दुःख, त्यांच्या वेदना हे सारे समजून घेणे अधिक महत्त्वाचे आहे. वृत्तपत्रीय प्रसिद्धी हेच सर्व काही मानणाऱ्यांपैकी मी नाही. काही तरी विधायक कामे उभी राहावीत हाच माझा दृष्टिकोन होता व त्यामुळेच गेल्या निवडणुकीत नगर जिल्ह्यातून फक्त दोन जनता उमेदवार निवडून आले व त्यात ११००० मते अधिक मिळवून मी निवडून येऊ शकलो.

प्रश्न : ढाकणेसाहेब, हे झाले तुमच्या व्यक्तिगत कार्य करण्याच्या पद्धतीबाबत; पण आता पक्षाची म्हणून जी संघटनात्मक जबाबदारी आपणावर आली आहे त्याबद्दल कोणत्या योजना आपल्या मनात आहेत ? विशेषत: घटकवाद गाडण्यासाठी......

उत्तर : घटकवाद विसरावयास लावणे हे माझ्यापुढील एक आव्हान आहे असे मी समजतो; परंतु माझा असा विश्वास आहे की, एकात्म जनता पक्ष मानणारे खंबीर कार्यकर्ते जर मोठ्या संख्येने उभे राहिले तर हे सामान्य कार्यकर्तेच आपल्या नेत्यांना मतभेद विसरण्यास भाग पाडतील. महाराष्ट्रातच काय, पण देशात सर्वत्रच समाजवाद्यांनी जनसंघावर टीका करायची, जनसंघीयांनी समाजवाद्यांशी भांडायचे हे प्रकार आता थांबले पाहिजेत आणखी एक महत्त्वाचे म्हणजे, एखाद्या घटक पक्षाचे सर्व फायदे घ्यायचे पण त्याला श्रेय मात्र द्यायचे नाही, ही वृत्ती कोणत्याच घटक पक्षाची असता कामा नये. घटकवाद आणि अंतर्गत मतभेदांना या वृत्तीमुळेच प्रोत्साहन मिळते. असे प्रोत्साहन मिळू नये यासाठी जागरूक व समंजस कार्यकर्त्यांची गरज आहे. त्यामुळे गावपातळीवर अभ्यासू व जागरूक कार्यकर्ते निर्माण करण्यास मी अधिक महत्त्व देतो. शहरातूनही कार्यकर्ते जागरूक असतात; पण त्यांनी अभ्यासू बनणे व आपल्या समस्यांचा गांभीर्याने विचार करणे हे खरे महत्त्वाचे आहे. सध्या आमचे सरकार सत्तेवर आहे; पण सरकारी निर्णय व चांगल्या योजना जर खालपर्यंत पोहोचत नसतील तर त्याचा उपयोग काय ? त्यासाठी मंत्री, खासदार, आमदार, जि. प. सदस्य, ग्रामसेवक, सरपंच, गावकरी अशी एक साखळी सर्वत्र असण्याची गरज आहे. या सर्व घटकांत सुसंवाद असेल व जनहिताची तळमळ सर्वांनाच असेल तर हे साध्य करणे कठीण नाही. तेव्हा या सर्व उपायांतून आपल्या भागातील जनतेच्या समस्यांचा अभ्यास करणारा असा अभ्यासू कार्यकर्ता गावपातळीवर तयार होणे याला मी प्राधान्य देणार आहे. विधायक कार्यकर्त्यांचे असे मोहोळ उभे राहिल्यास घटकवादाला मूठमाती मिळेल असा माझा विश्वास आहे.

संघटनात्मक काम करताना मी मध्यम मार्ग अवलंबणार आहे. पक्षांतर्गत शिस्तीच्या अतिरेकामुळे काँग्रेसचा नाश झाला, तर पक्षांतर्गत लोकशाहीच्या अतिरेकामुळे जनता पक्ष संकटात सापडला आहे. त्यामुळे या दोन्हीतून मार्ग काढण्याचा माझा प्रयत्न राहील व असा प्रयत्न करताना पक्षहितासाठी जे जे योग्य वाटेल ते ते सारे मी करीन. मी अध्यक्षपदी निवडून आल्यानंतर मी एक सामान्य कार्यकर्ता असल्यामुळे, मी कोणा ज्येष्ठ नेत्याच्या हातातले बाहुले बनेन अशी एक शंका काही वृत्तपत्रांतून उगीचच व्यक्त झाली होती; पण मी स्वतंत्र बुद्धीने, स्वतंत्र विचाराने पण सर्वांना बरोबर घेऊन काम करणार आहे यात तिळमात्र शंका नाही.

प्रश्न : संघटनात्मक कामाचीच चर्चा सुरू आहे, म्हणून विचारतो. आपल्या पक्षात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा एक वादाचा विषय बनला आहे. या वादाबद्दल व या संघटनेबद्दल आपलं काय मत आहे ?

उत्तर : खरं म्हणजे रा. स्व. संघाचा व जनता पक्षाचा काहीही संबंध नाही. जनता पक्षाची स्थापना झाली, पक्षाची धोरणे ठरली, पदाधिकारी निवडले गेले हे सारे करताना रा. स्व. संघाचा कधी विचार केला गेला ? मग आताच रा. स्व. संघावरून वादंग का माजावे ? माझ्या मते रा. स्व. संघ ही एक स्वतंत्र संघटना आहे व जनता पक्षाशी तिचा काहीही संबंध नाही. जनसंघ म्हणजे रा. स्व. संघ हा विचारही मला बरोबर वाटत नाही.

प्रश्न : बबनराव, कोणत्याही राजकीय पक्षाची खरी ताकद ही त्या पक्षाच्या युवक कार्यकर्त्यांच्या संचामध्ये असते. जनता पक्षाबद्दल सहानुभूती असणाऱ्या युवकांच्या सध्या दोन स्वतंत्र संघटना आहेत. त्यांच्यात एकी व्हावी या दृष्टीने आपण प्रयत्न करणार आहात काय ? एकूणच जनता पक्षीय युवकांसाठी आपल्याजवळ काही कार्यक्रम आहे का ?

उत्तर : जनता पक्ष ही माझ्या मते युवकांनीच घडविलेल्या एका राजकीय क्रांतीची परिणती आहे. त्यामुळे हा युवकांचाच एक पक्ष आहे. सध्या ज्या दोन संघटना आहेत त्यांना एकत्र आणण्याचे प्रयत्न मी जरूर करणार आहे आणि युवकांसाठी कार्यक्रम म्हणाल, तर सामाजिक जागृती वाढविण्याच्या दृष्टीने युवकांच्या कामाची रचना करावी असा विचार माझ्या मनात आहे त्यासाठी युवकांची शिबिरे घ्यावीत, प्रशिक्षण कार्यक्रम घ्यावेत असे माझ्या मनात आहे. सर्व कार्यक्रमांची उद्दिष्टे शेवटी दुर्बल व दलितांना ताकद देणे आणि लोकशाही बळकट करणे हीच असतील व त्या दिशेने युवक चळवळीचा प्रवास होईल.

प्रश्न : सध्याच्या महाराष्ट्रातील राजकीय स्थितीबद्दल आपल्याला काय वाटते ? सध्याच्या पु. लो. द. शासनाबद्दल आपण समाधानी आहात काय ? ह्या सरकारला धोका असल्याच्या बातम्या कितपत खऱ्या आहेत ?

उत्तर : एक लक्षात घ्या की, पुरोगामी लोकशाही दल हे लोकशाहीवर निष्ठा असलेल्या सर्व पक्षांनी एकत्र येऊन बनविले आहे. त्यामुळे या पक्षांना तूर्त तरी वेगळा पर्याय नाही. समान कार्यक्रमावर व समान उद्दिष्टे ठेवून हे पक्ष एकत्र आले आहेत आणि आता हे पक्ष जाणार तरी कुठे ? आमचे सरकारही सुरळीत काम करीत आहे. सरकारचे नेतृत्व बदलण्याची तूर्त तरी गरज वाटत नाही. सरकारला धोका असल्याच्या ज्या बातम्या आहेत. त्यातही काही तथ्य नाही. सरकारला धोका निर्माण करू शकतील एवढ्या मोठ्या संख्येत पक्षांतर होईल असे मला अजिबात वाटत नाही.

प्रश्न : आता शेवटचे दोन प्रश्न विचारतो. एक म्हणजे आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत आपल्या पक्षाचे धोरण काय रहाणार ? मित्र-पक्षांशी युती कायम राहाणार काय ? आणि दुसरा प्रश्न म्हणजे पक्षाध्यक्ष झाल्यानंतर आपण मंत्रिपदाचा राजीनामा देणार आहात काय ?

श्री. ढाकणे : जिल्हा परिषद निवडणुका सर्व मित्र-पक्षांच्या सहकार्यानेच लढविल्या जाव्यात, असा आमचा प्रयत्न राहील. अर्थात हे सर्वसाधारण सूत्र असले तरी जिल्ह्याच्या राजकीय परिस्थितीनुरूप थोडाफार बदल होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

मी जनता पक्षाचे अध्यक्षपदी निवडला गेल्यानंतर, राज्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्याचा विचार करीत आहे आणि योग्य वेळ येताच निर्णय जाहीर करीन, एवढेच मी तूर्तास सांगू इच्छितो. ☐

परराष्ट्रीय घडामोडी । चन्द्रशेखर पुरन्दरे

# हजार वर्षे लढू म्हणणारा एक्कावन्नाव्या वर्षी फासावर !

तर देणार देणार म्हणून गाजत असलेली भुट्टोंची फाशी अंमलात आली. दि. १७–२–७९ च्या 'माणूस'मध्ये, अधिक कडक शिक्षेअभावी भुट्टोंना फाशी देणेच आवश्यक, असे मत मी व्यक्त केले होते. या फाशीने पाकिस्तानचा राज्यकर्त्यांचा वाईटरित्याच शेवट होण्याची मालिका चालू राहिली आहे. आजवर खून आणि तुरुंगवास व त्यानंतर हद्दपारी हे चालू होते, फाशीचीच शिक्षा तेवढी राहिली होती. तिचा मान भुट्टोने पटकावला आणि त्यासाठी पाकिस्तानात जास्तीत जास्त Qualified माणूस तोच होता.

बऱ्याच मुद्द्यांवरून या शिक्षेच्या अंमलबजावणीवर गदारोळ माजला आहे.

वरवर सामान्य माणूस 'असेल बुवा' असे म्हणून ज्या युक्तिवादापुढे मान तुकवतो तो म्हणजे 'आंतरराष्ट्रीय कटा'चा भुट्टो हा बळी होय, असा युक्तिवाद! इंदिरा गांधींनी हा आवडता मुद्दा पुढे केला आहे. लोकसभेच्या निवडणुका त्या हरल्या तेव्हासुद्धा त्यांना 'आंतरराष्ट्रीय' (म्हणजे अमेरिका) कटाचीच खात्री होती ! वस्तुतः आन्तरराष्ट्रीय दडपणांनी भुट्टोला अधिक सौम्य शिक्षा मिळाली असती. भुट्टोला फाशी देण्याचे प्रमुख कारण म्हणजे झिया आणि भुट्टो यांच्यात फक्त कोण कोणाच्या हातून मरणार, एवढाच प्रश्न होता. त्यात झियाने भुट्टोला वेळीच अडकवला आणि प्रेमात व राजकारणात सारे काही माफ असतेच !

दुसरा मुद्दा पूर्णतः मानवतेच्या भूमिकेतून पुढे करण्यात येतो. ज्या लोकांना स्वत:चा काहीही स्वार्थ नाही; पण केवळ सहृदयतेमुळे फासावर कोणाला देऊ नये असे वाटते त्यांना (तथाकथित) न्यायाची चाड नाही, असेच म्हणावे लागेल. Ceaser's wife should be above suspicion. जितके उच्च पद तितकी जबाबदारी अधिक, हे लक्षात न घेता कोणत्याही नीचतम पातळीपर्यंत विधिनिषेधशून्य राजकारण ज्यांनी केलेले आहे, त्यांना दया दाखवणे हा राष्ट्रावर केलेला अन्याय आहे. भुट्टोचा सूड घेण्याच्या प्रवृत्तीची झलक ज्यांना माहीत आहे त्यांना तर याचे परिणाम सहज लक्षात येतील.

ब्रिटन, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, अमेरिका वगैरेचे राष्ट्रप्रमुख तीन तीन तारा पाठवून थकले म्हणे ! यांच्या मानवतेच्या पुळक्याला काहीही किंमत नाही. वर्णभेदावरून जिथे अजून दंगली चालू आहेत ते ब्रिटन, अण्वस्त्रस्पर्धेत अमेरिका आणि कॅनडाशी स्पर्धा करण्यासाठी पुरेशा खबरदारीची शाश्वती नसतानाही केवळ पैशासाठी अण्वस्त्रे व अत्याधुनिक विमाने विकणारा फ्रान्स, इराणच्या शहापासून लाल चीनपर्यंत सगळ्यांशी बेशरम शय्यासोबत करून आपला प्रभाव वाढवू इच्छिणारी अमेरिका आणि आपले हितसंबंध जपणारा म्हणून भुट्टोकडे पहाणारा ऑस्ट्रेलिया यांच्या आवाहनांना काडीइतका अर्थ नाही. मानवतेच्या सोयिस्कर बुरख्याखाली नग्न सत्तापिपासेला दडवण्याचा हा प्रयत्न आहे. प्रत्येक राष्ट्राने मानवतेची काय चाड आपल्याला आहे ते कधी ना कधी उद्वेग येईल इतक्या तीव्रतेने दाखवून दिले आहे. त्यांच्या भुलथापांवर अजून विश्वास ठेवणारा बेअक्कल मूर्ख म्हणावा लागेल.

जनरल झियाने नंतरच्या एका टी. व्ही. वरच्या मुलाखतीत, फक्त भुट्टोचेच प्राण वाचवावेत अशा तारा आल्या, इतर चौघांचेही वाचवा अशा का आल्या नाहीत, अशी पृच्छा केली आहे आणि ते बरोबरच आहे.

आपल्या पराभूत मनोवृत्तीच्या राजकारण्यांना आणि प्रेसला अशा वेळी करुणेचा पान्हा न फुटेल तरच नवल. 'गलिच्छ कुत्रे' म्हणून ज्या भुट्टोने आपली संभावना केली त्याला ९०,००० युद्धकैद्यांसारखी अनामत हाती असताना शिक्षा तर केली नाहीच, पण आताही उमाळे येऊन गळे काढायला सुरुवात. मधु लिमयांचं मी समजू शकतो. त्यांची भारतीय दर्जाचे कार्टून होण्यासाठी विनोबा आणि राजनारायणांशी स्पर्धा चालू आहे. व्ही. व्ही. गिरींना त्यानिमित्तानं तरी दोन ओळी प्रसिद्धी मिळणार होती; पिलू मोदींचा म्हणे तो मित्र; पण जॉर्ज फर्नांडिससारख्या माणसानंही तेच करावं हे समजणे कठीण आहे. भारताला तापदायक असणाऱ्याचा काटा आपोआप निघाला ही निव्वळ आनंदाची गोष्ट आहे. बरं, शत्रूबद्दलही आदर वाटावा एवढ्या उंचीचा हा माणूस नव्हताच. मागच्या भुट्टोवरच्याच लेखात दिलेल्या प्रसंगानुसार ज्याची सत्तेसाठी मार्शल लॉ लावायचीही तयारी होती, त्याला कसली दया नि कसली मानवता ?

मधू लिमयांना पाकिस्तानच्या भविष्याची काळजी पडली आहे. वस्तुतः RSS ची काळजी त्यांना पुरेशी आहे. पाकिस्तान काही काळातच फुटण्याची जबरदस्त शक्यता आहे; पण त्याचा भुट्टोच्या मरणाशी संबंध नाही. उलट, भुट्टोनेच ही विघटनाची प्रक्रिया अधिक वेगवान केली. बलुचिस्तानमध्ये लष्कर घालून तिथला असंतोष केवळ

भयानक अत्याचारांनी दडपला, वायव्य सरहद्द प्रांतातला विरोध सरळ वलीखानावर आधी गोळ्या घालून आणि नंतर त्याला तुरुंगात डांबून दावण्याचा प्रयत्न केला आणि जर भुट्टोएवढ्याच उंचीचा माणूस हा पाकिस्तान निर्माण करू शकणारा सर्वांत उंच माणूस असेल, तर पाकिस्तानचीच कीव करावी लागेल आणि पाकिस्तानचे भवितव्य याच गोष्टींवर अवलंबून आहे. भुट्टो नाही तर पोकळी, असे मानण्याचे कारण नाही. तसे नेहरूनंतर कोणपासून मोरारजीनंतर कोणपर्यंत प्रश्न असतातच. काळ प्रश्न टाकतो आणि समाजातून नेतृत्व पुढे येते. भुट्टो असा कोण नियतीचा लाडका पुत्र होता की जो नसल्यास राखरांगोळी व्हावी? या साऱ्या विचारसरणीचे मूळ व्यक्तिपूजेत आहे आणि तिचाच आता पाकिस्तानातही गैरफायदा घेतला जात आहे.

Anti-zia एवढाच भुट्टोला आज अर्थ प्राप्त झाला आहे. काही तरी एक निशाण असल्याशिवाय, कोलीत असल्याशिवाय माणसं जमत नाहीत. मेलेला भुट्टो हे तसं बुजगावणं आहे. त्याचीही उपयोगिता संपेल आणि जरी तो हुतात्मा झालाच तरी ते लादलेलं हौतात्म्य होईल.

पाकिस्तानात येत्या दोन-तीन महिन्यात यादवी मोठ्या प्रमाणावर माजण्याची शक्यता आहे. इराण एका बाजूला विकल असल्याने बलुचिस्तानच्या मागणीला जोर चढेल. उत्तरेकडचा अफगाणिस्तान रशियाने घशात घातल्याने वायव्य सरहद्द प्रांतात घुसखोर वाढून अराजक वाढवण्यास मदत होईल. झियाच्याविरुद्ध मिलिटरीतच गट निर्माण होत असल्याने पंजाबातही उभी फूट पडण्याची शक्यता आहे. आजवर पाकिस्तानची मिलिटरी बऱ्यापैकी एकसंघ होती, म्हणून राज्यकर्ते राज्यावर राहू शकले. तीच एकदा छिन्नविच्छिन्न झाली की लहरी राजा, प्रजा आंधळी, अधांतरी दरबार व्हायला वेळ नाही; पण ' भुट्टो असता तर ' – म्हणून टिपे गाळायचे काही कारण नाही. कारण भुट्टोने निवडणुकात Rigging केल्यावर ज्या विरोधाला त्याला तोंड द्यायला लागले आणि त्यापुढे मान तुकवूनही राज्य करणे अशक्य झाले तो लक्षात आणता भुट्टोचेही काही चालले असते असे अजिबात नाही.

परत एकदा निवडणुकांची घोषणा करण्यात आली आहे. पुन्हा निवडणुका पुढं ढकलण्याची घोषणा होईपर्यन्त ती खरी मानायची. निवडणुका घेणे तर झियाला परवडणारच नाही. पीपल्स पार्टीला मेलेला भुट्टो इतका सोयीचा आहे की त्यांना सहज विजय मिळेल. झियाला लष्करी पकड तरी घट्ट करावी लागेल किंवा वेळीच देशाबाहेर पळ काढावा लागेल! कारण अस्थिर राजकीय परिस्थितीत परकीय मदतीचा ओघ आटतो. त्यात सौदी अरेबियासारख्या राष्ट्राने खास दूत पाठवून भुट्टोच्या सुटकेची केलेली मागणी झियाने फेटाळल्याने त्याची व तशा अनेक मित्रांची अंमळ खप्पा मर्जी होऊन मदत बंद झाली नाही तरी लांबणीवर पडणार. मुस्लिम लॉ हा त्यात नवा विचित्र प्रकार. राजकीय स्वातंत्र्य नाही, आर्थिक प्रगती नाही अशी कोंडी झियाला महागात जाईल.

तीस वर्षांच्या इथल्यासारख्याच तिकडच्या बौद्धिक दिवाळखोरीचा हा परिणाम आहे. त्यात धर्मांधता आणि भारतद्वेष या दोन अकरणात्मक गोष्टींवर भुट्टोपर्यन्त सगळ्यांनी भांडवल केले; पण लोक त्यालाही कंटाळले आहेत.

कम्युनिस्ट थिअरीप्रमाणे ब्यूरोक्रसीचा भुट्टो हस्तक होता, त्याची जरुरी संपताच त्याला उडवण्यात आले आणि आता अजून काही काळ तरी लष्कर-गोंधळ लष्कर हे चक्र चालू रहाणार! एअरमार्शल अशगरखान, खान अब्दुल वलीखान, बेगम वलीखान अशांसारखेच लोक फक्त पाकिस्तान एकत्र ठेवू शकतील; पण त्यांना मोकळीक कुठे आहे? आणि सध्या जनमानस काहीच ऐकण्याच्या मनःस्थितीत नाही.

भुट्टोच्या मरणानेच खास हे प्रश्न उभे राहिले आहेत असे नव्हे; विरोधकांना दडपणाऱ्या भुट्टोनेच याची सुरुवात केली होती. त्यानेच corrupt केलेली न्यायसंस्था त्याच्यावर उलटली तर त्यात शोक कसला करायचा?

या संदर्भात स्टॅलिनने रशियन शेतकऱ्यांबद्दल काढलेले उद्‌गार फार बोलके आहेत –

'Our peasant is a simple man, but wise; when he sees a wolf, he shoots it. He does not preach morals to the wolf,—he just shoots it!' □

' कलाकृतीची संदर्भमुक्तता लाभलेली समर्थ कलाकृती '
—प्रा. स. शि. भावे

जनांचा प्रवाहो चालिला

विनय हर्डीकर । राजहंस प्रकाशन, पुणे । किंमत वीस रुपये

उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण हा विषय जॉर्ज फर्नांडिस यांच्या वक्तव्यांमुळे पुन्हा एकदा सार्वजनिक चर्चेचा ठरला आहे.

पुण्याजवळील ' हिंदुस्थान अँटिबायोटिक्स ' या राष्ट्रीयीकरण झालेल्या औषधी कारखान्याने नुकतीच पंचवीस वर्षे पूर्ण केली आहेत. त्यानिमित्त वृत्तपत्रांतून जाहिराती, गौरव वगैरे सोपस्कारही पार पडलेले आहेत.

पण वस्तुस्थिती काय आहे ? ती या लेखात मांडली आहे.

हेतू एवढाच की, राष्ट्रीयीकरणातल्या धोक्यांकडेही दुर्लक्ष होऊ नये. सध्या चालू असलेली चर्चा अधिक वास्तववादी पातळीवरून व्हावी.

या अधोगतीला, राष्ट्रीय साधन-सामग्रीच्या अपव्ययाला जबाबदार कोण ?

व्यक्ती की व्यवस्था ? जाणकारांनी शोध घ्यावा....

# हिंदुस्थान अँटिबायोटिक्स एक रोगजर्जर सरकारी औषधी कारखाना

सरकारी उद्योगांवर नियंत्रण ठेवणाऱ्या लोकसभेच्या समितीने ( Bureau of Public Enterprise ) अलीकडेच आजारी सरकारी उद्योगांची यादी प्रसिद्ध केली आहे. त्या यादीत पिंपरी येथील पेनिसिलीन व स्ट्रेप्टोमायसिन उत्पादन करणाऱ्या सरकारी कारखान्याचे नाव आहे. हा कारखाना ओळीने सतत पाच वर्षे तोटयात आहे. या काळातील कारखान्याचा एकत्रित तोटा १० कोटी रुपये झाला आहे. यंदाचे वर्षी म्हणजे १९७८–७९ साली अंदाजे ३ कोटी रुपये तोटा होण्याची शक्यता आहे.

पूर्वीचे संचालक श्री. सी. एन. चारी यांना कारखान्याची आर्थिक स्थिती बिघडल्याबद्दल जबाबदार धरले गेले होते व त्यामुळे त्यांना संचालकपदावरून दूर केले होते. वस्तुतः श्री. सी. एन. चारी संचालकपदी रुजू झाले तेव्हाच कारखान्याची आर्थिक स्थिती बिघडलेली होती. ' हेमायसिन व व्हिटॅमिनी सी ' यांच्या उत्पादनासाठी भांडवली गुंतवणूक झाली होती; परंतु उत्पादन बिलकूल होत नव्हते. त्याशिवाय पेनिसिलीन व स्ट्रेप्टोमायसिन या दोहोंच्या उत्पादनक्षमतेत घट झाली होती. या सर्वांवर कळस म्हणून उत्पादनासाठी लागणाऱ्या सर्व कच्च्या मालाचे भाव भरमसाठ वाढले होते. या अडचणीवर मात करण्यासाठी श्री. चारी यांच्या प्रयत्नांनी ग्लॅक्सो कंपनीकडून स्ट्रेप्टोमायसिनचा अधिक क्षमतेचा स्ट्रेन ( strain ) फुकट मिळाला होता. पेनिसिलिनचा अधिक क्षमतेचा स्ट्रेन ( strain ) जपानच्या ' टोयो झोजो ' कंपनीकडून मिळवण्याचा करार केला होता. त्याशिवाय ' 6 A P A ' पासून अँपिसिलीनच्या उत्पादनासही सुरुवात झाली होती. ' 6 A P A 'चे उत्पादन करून त्यापासून अँपिसिलीन उत्पादन करू शकणाऱ्या ३० टन क्षमतेच्या प्लॅंटची उभारणी पूर्ण झाली होती; परंतु एकीकडे सुधारणांच्या या योजनांचा अंमल चालू असताना, कारखान्याची आर्थिक स्थिती झपाटयाने बिघडत गेली व ' चारी हटाव ' मोहिमेने जोर केला. सरकारला शेवटी श्री. सी. एन्. चारी यांचे जागी दुसऱ्या संचालकांची नेमणूक करावी लागली. अर्थात या परिस्थितीस श्री सी. एन्. चारी हे सर्वस्वी जबाबदार नसल्याने व फर्मेंटेशन विषयात ते तज्ज्ञ असल्यामुळे, सरकारने त्यांची दुसऱ्या नोकरीची व्यवस्था केली. सध्या ते युरोपमध्ये युनोच्या एका संस्थेत लठ्ठ पगारावर नोकरी करतात. श्री. चारी यांच्या जागी पूर्वीचे इलेक्शन कमिशनर श्री. स्वामीनाथन यांच्या चिरंजिवांची श्री. आनंद स्वामीनाथन यांची नेमणूक झाली. नवीन संचालक तरुण, उच्च शिक्षित व औषधी उद्योगाचा अनुभव नसलेले आहेत. लहानपणापासून उच्च सरकारी अधिकाऱ्यांच्या समाजात वाढल्यामुळे उच्च पदावरील सरकारी अधिकारी-वर्तुळात त्यांच्या अनेक ओळखी असून, अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांशी ते बरोबरीच्या नात्याने व सहजतेने वागतात. खरे म्हणजे नोकरशाहीच्या ( Bureaucracy ) विशिष्ट संस्कृतीचे ते उत्तम प्रतीक आहेत. अहंमन्यता हा त्यांच्या

स्वभावाचा केंद्रबिंदू म्हणता येईल. आपल्या बरोबरीच्या (स्थानात) नसणाऱ्या इतरांबद्दल यांच्या वागण्यात एक प्रकारची तुच्छता जाणवते. या नवीन पदाची जबाबदारी संभाळण्यासाठी त्यांना एका विश्वासू सहकाऱ्याची जरूर होती. त्यासाठी त्यांनी 'हिंदुस्थान ऑरगॅनिक केमिकल्स' या पनवेलजवळच्या रासायनिक उद्योगातून श्री. घारपुरे यांची आयात केली व त्यांची जनरल मॅनेजर म्हणून नेमणूक केली. श्री. घारपुरेही तरुण, उच्चशिक्षित, परंतु औषधी उद्योगाचा पूर्वानुभव नसलेले आहेत. या कारखान्याच्या आजाराचे निदान करणे व त्यावर इलाज करून कारखाना पुन्हा भरभराटीस आणण्याचे कार्य जणू फक्त आपण दोघेच करणार आहोत, अशा थाटात यांनी आपली कारकीर्द सुरू केली.

## आजाराची मीमांसा

संचालक व जनरल मॅनेजर या दोघांनी या कारखान्याच्या अडचणींचे तडकाफडकी निदान केले. ते असे १ : इथे जरुरीपेक्षा अधिक कामगार असून, कामगार आळशी, कामचुकार व ओव्हरटाइमला चटावलेले आहेत. २ : इथले बहुतेक सर्व अधिकारी (एखादा अपवाद वगळता) अकार्यक्षम, पुरेशी शैक्षणिक पात्रता नसलेले व दीर्घ काल व चिकाटीने काम करण्याची पात्रता नसलेले आहेत. ३ : ऑफिसमधल्या कामाची पद्धत व एकंदरच व्यवस्थापन जुनाट व कालबाह्य आहे. त्यांच्या या मीमांसेत तथ्यांश जरूर आहे; पण हे पूर्ण सत्य आहे हा त्यांचा आग्रह कोणीही मान्य करणार नाही.

कामगार आळशी आहेत, त्यांना सुधारण्यासाठी पदोपदी अधिक काम करा, कारखान्यावर तुमचा भार आहे वगैरे उपदेशाचा त्यांनी धडाकाच लावला. कामगारांचे अनेक दोष मान्य करूनसुद्धा तोटा होण्यातील कामगारांची जबाबदारी या कारखान्यात अत्यल्प आहे, याचाच यांना विसर पडला. या कारखान्यात मुख्यत्वेकरून मोठ्या प्रमाणावर ( Bulk drugs ) औषधनिर्मिती केली जाते. औषधउत्पादनाची ही प्रक्रिया प्रामुख्याने जीवशास्त्रीय ( Biological ) आहे. त्यामुळे कित्येक वेळा सर्व गोष्टी नियमाने करूनही, अचानकपणे उत्पादनक्षमतेत घट येऊ लागते. कितीही प्रयत्न केले तरी या उत्पादनक्षमतेतील घटीचे कारण सापडत नाही. त्या वेळी सर्वसामान्य कामगार आपले नेहमीचे काम व्यवस्थितपणे करीतच असतो. काही दिवसांनंतर अचानकपणे उत्पादन पूर्ववत होते. उत्पादनक्षमतेतील या चढ-उताराचे नेमके कारण कुणीही सांगू शकत नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या चढ-उतारासाठी कामगारांना जबाबदार धरणे चूक आहे. पेनिसिलिन व स्ट्रेप्टोमायसिनच्या मूळच्या स्ट्रेनची योग्य प्रकारे जोपासना व वाढ करणे हे काम रिसर्च विभागाचे होते. त्याच्या अपयशाचे खापर सर्वसामान्य कामगाराच्या डोक्यावर फोडण्याचा हा प्रयत्न चीड आणणारा होता.

खरे म्हणजे इथले कामगार व कामगार संघटना जबाबदारीची जाणीव असलेले आहेत. कै. श्री. र. के. खाडिलकर, श्री. धारिया, श्री. अनंतराव पाटील अशा सत्ताधारी पक्षातील मान्यवर नेत्यांचे मार्गदर्शन या संघटनेस वेळोवेळी लाभले होते; परंतु ही कामगार संघटना पक्षीय राजकारणात कधीच गुरफटलेली नव्हती. उत्पादनाशी निगडित बोनस फॉर्म्युल्याचा करार देशात बहुधा प्रथम या कारखान्यातच झाला होता. कामगारांना व्यवस्थापनात सहभाग देण्याच्या योजनेचा भाग म्हणून, डायरेक्टर बोर्डावर कामगाराची नेमणूक झालेलाही हाच पहिला कारखाना होता. अशा या कामगारांना, कारखान्याच्या अडचणींसाठी सर्वांशाने जबाबदार धरण्याची चूक नवीन संचालकांनी केली. over-time चा लोभ हा एक दोष मात्र कामगारांना जडला होता. तो आवरणे जरूर होते. त्यासाठी संचालक श्री. स्वामीनाथन यांनी खंबीर पावले उचलली व ओव्हरटाइम जवळजवळ पूर्णपणे बंद करण्यात ते यशस्वी झाले. ही फार मोठी कामगिरी त्यांनी बजावली आहे हे निर्विवादपणे मान्य केले पाहिजे; परंतु हा एक विषय सोडला तर कामगारांसंबंधीचे त्यांचे धोरण पूर्णतः चूक आहे. कामगार संघटनेशी संघर्षाची भूमिका घेण्याचा निर्णय दुर्दैवी होता; परंतु Confrontation हे धोरण ठरवल्यानंतर संचालक व जनरल मॅनेजर यांनी कामगार व कामगार संघटनेस त्रास देण्याच्या नवनवीन कल्पना अंमलात आणण्यास सुरुवात केली. कामगार व पुढारी यांच्यात अविश्वास निर्माण व्हावा म्हणून कामगार-पुढाऱ्यांशी जाहीरपणे सलगीचे प्रदर्शन करणे, कामगार-पुढाऱ्यांतील अंतर्गत वैमनस्यास खत-पाणी घालणे, कामगार संघटनेशी कोणत्याही विषयांवर सामोपचाराने व निर्णायक बोलणी न करणे, अगदी किरकोळ कारणाने कामगारांवर एकदम खटले भरणे, अशा प्रकारे कामगार व व्यवस्थापक यांच्यातील तणाव कायम राहील यासाठी कसून प्रयत्न केले गेले. खरे म्हणजे आधुनिक व्यवस्थापनतंत्राचा अवलंब करण्याचा टेंभा मिरवणाऱ्या या संचालकांनी 'कामगार डायरेक्टर'ची पुन्हा नेमणूक करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक होते. व्यवस्थापनातील कामगारांच्या सहकार्यास आवश्यक म्हणून Works Committee ( जी कायद्याने बंधनकारक आहे ) चेही पुनरुज्जीवन करणे जरूर आहे; पण या गोष्टी केल्या असत्या तर संघर्षाची भूमिका सोडावी लागली असती. म्हणून कामगार व व्यवस्थापक संबंधाला विधायक स्वरूप देण्याऐवजी कामगारांना बदनाम करण्याचा मार्ग त्यांनी स्वीकारला आहे. दिसेल त्या कामगाराला भेटेल तेथे व संधी मिळेल तेव्हा, 'तुम्ही आळशी आहात,' 'कारखान्यावर तुमचा भार आहे,' 'अधिक काम करा,' अशा प्रकारे दटावण्याचा या दोघांनी धडाकाच लावला. उपदेश चांगला असला तरी तो अती झाल्यामुळे त्याचे हसू होत आहे, याचेही संचालक व जनरल मॅनेजर यांना भान राहिले नाही. कॉलनीत शाळेच्या कार्यक्रमाला गेले तरीही मुलांना हे उपदेश करतात की, आपल्या पालकांना अधिक उत्पादन करण्यास सांगा. अशा वागण्याची चेष्टा होते व शब्द अर्थ हरवून बसतात. तसेच उत्पादनवाढीच्या व अधिक काम करण्याच्या यांच्या उपदेशाचे झाले. कामगार-व्यवस्थापकसंबंधाचे स्वरूप नवीन संचालकांच्या काळात हे असे आहे व उत्पादनवाढीसाठी हे तणावाचे वातावरण पोषक नाही, हे कुणीही सांगेल.

ज्यांनी कामगार-प्रश्नाचा असा विचका केला, त्यांनी अधिकाऱ्यांच्या प्रश्नाबाबत अधिक गोंधळ केला नसता तरच नवल. कारण कामगारांना असलेले कायद्याचे संरक्षणही अधिकारीवर्गास नसते. त्यामुळे इथे तर यांना कशाचेही बंधनच नव्हते. अधिकारीवर्गाबद्दल यांनी त्वरेने केलेले निदान असे होते की, 'इथले सर्व जुने अधिकारी सुखासीन, शैक्षणिक पात्रता नसलेले व अकार्यक्षम आहेत.' घाईने

केलेले हे मूल्यमापन अर्थातच पूर्णत्वाने खरे नव्हते; परंतु एकदा पूर्वग्रहदूषित दृष्टीने हे मूल्यमापन केल्यावर इथे नवीन अधिकाऱ्यांची भरती करणे व जुन्यांच्या वागण्यात आमूलाग्र सुधारणा करण्यासाठी प्रयत्न करणे एवढेच संचालकांच्या हातात राहिले.

## जुने अपात्र तर नवे निरोपे

प्रथमतः जुन्या अधिकारीवर्गाला उद्देशून अनेक आदेश यांनी तोंडीच बजावले. सर्व अधिकाऱ्यांनी रोज आठ तासांपेक्षा अधिक काम केलेच पाहिजे. अधिकाऱ्यांच्या सुट्ट्यांतही तोंडी आज्ञेनेच कपात केली. सर्व अधिकाऱ्यांनी रविवारीही कामावर आलेच पाहिजे. संध्याकाळी क्लबमध्ये बसून पत्ते खेळणे म्हणजे वेळेचा अपव्यय आहे, असेही आपले मत त्यांनी जाहीरपणे व्यक्त केले. या व अशा प्रकारच्या आज्ञा निघाल्या व अनेकांचा इथे थरकाप उडाला. गेली कित्येक वर्षे या कारखान्यात वशिलेबाजी, संकुचित प्रांतीयता यांचे थैमान होते. त्यामुळे अनेक वरिष्ठ पदावर अपात्र व उतारवयाकडे झुकलेल्या व्यक्ती होत्या. त्या सर्वांनी संचालकांचे हे हुकूम नाइलाजाने पाळायला सुरुवात केली. मध्यम श्रेणीतील Middle management level च्या अधिकाऱ्यांवर सर्व प्रकारची दडपणे सुरू झाली. सकाळी ७॥ वाजता कामावर हजर होणाऱ्या अधिकाऱ्यांना संध्याकाळी सहा वाजता सुटका झाली तर धन्य वाटू लागले. संचालकांच्या या हुकुमशाहीमुळ पुण्याहून कामावर येणाऱ्या अधिकाऱ्यांचे तर अतोनात हाल होत आहेत. कारण कारखान्यातील कामाच्या वेळेशिवाय रोजच्या प्रवासात त्यांचे दोन तास अधिक खर्च होतात. अनेकांचे खाजगी आयुष्य संपुष्टात आणले गेले. इथले अधिकारी म्हणजे जणू गुलामच बनवले गेले. एखाद्या व्यक्तीस गुलामाच्या पातळीवरची वागणूक मिळू लागली तर त्या व्यक्तीच्या कार्यक्षमतेवर विपरीत परिणाम होतो, याचाही यांना विसर पडला. इथले जुने अधिकारी नालायक, निरुपयोगी असल्यामुळे, त्या सर्वांना फक्त 'होय साहेब' (yes sir) म्हणण्याशिवाय काहीही काम ठेवले नाही. विचार करण्याचे सर्व अधिकार संचालक व जनरल मॅनेजर या दोघांनी फक्त स्वतःकडेच ठेवले. जुन्या अधिकाऱ्यांना सुधारण्यासाठी हे उपाय केले व त्यानंतर नवीन अधिकाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर नेमणूक करणे आधानेच आले. गेल्या दीड वर्षांत सुमारे १०० नवीन अधिकारी नेमले गेले. या नेमणुकात वशिलेबाजी नव्हती असे नव्हे तर पूर्वीप्रमाण ती फक्त एकाच रंगाची (संकुचित प्रांतीयतेच्या रंगाची) नव्हती. पूर्वीप्रमाणेच स्वत.चे नातेवाईक, दुसरीकडून राजीनामा द्यायला भाग पाडलेले, अपुरी शैक्षणिक पात्रता असलेले, अशांच्या या सत्रात वरिष्ठ पदावर नेमणुका झाल्या. या नवीन भरती झालेल्या बहुसंख्य अधिकाऱ्यांत काही समान गुण प्रकर्षाने दिसतात. ते सर्व तरुण, सुशिक्षित, औषधी कारखान्याचा अनुभव नसलेले व त्यामुळे पडेल ते काम करण्यास तत्पर व उत्तम निरोपे आहेत. जुन्या अधिऱ्यांच्या अपात्रतेचीही जाणीव संचालकांनी या नवीन अधिकाऱ्यांना वेळोवेळी दिलेलीच आहे. परंतु या नेमणुकांमुळे कारखान्याच्या कार्यक्षमतेत वाढ झाली आहे असे कुणीही म्हणणार नाही. खरे म्हणजे खुद्द संचालकांनाही अजून याची खात्री पटलेली नाही. याबाबत काही उदाहरणे मुद्दा अधिक स्पष्ट करतील.

विक्री-विभागातील महाराष्ट्रीय अधिकाऱ्यास कामावरून काढल्यानंतर, त्याच्या जागी नेमणूक झालेले दाक्षिणात्य अधिकारी अधिक शैक्षणिक पात्रता असलेले नाहीत.

नवीन अधिकारी अधिक तरुण आहेत हे खरे, त्यामुळे ते अधिक अधिक चपळ आहेत हे मान्य करावे लागेल. परंतु फक्त या दोनच गुणामुळे विभागाचे काम सुधारता येत नाही, हे सत्य संचालकांनाही नाकारता येणार नाही.

फॉर्म्युलेशन विभागाच्या नवीन प्रमुखांचीही शैक्षणिक पात्रता अपुरीच आहे. त्यामुळे अन्न व औषध प्रशासनातर्फे आवश्यक असलेला परवाना, त्यांच्या नावावर काढता आलेला नाही. हा विभाग चालवण्यासाठी अत्यावश्यक असलेला हा परवाना आजही मध्यम श्रेणीच्या अधिकाऱ्याच्या नावावरच आहे.

क्वालिटी कंट्रोल विभागातील उच्च पदासाठी इंटरव्ह्यूला आलेल्या अधिकाऱ्यांची निवड झाली; परंतु नोकरीवर रुजू झाल्यापासून आजपर्यंत (सुमारे दीड वर्षात) त्यांना क्वालिटी कंट्रोल विभागात नेमण्यात आलेले नाही. ते विभागात गेले तर त्यांना त्या विभागाच्या कामकाजाचे प्रशिक्षण देण्याची वेळ येईल असे सांगतात जुने अधिकारी नालायक, अपात्र असा शिक्का मारणारांनी या नेमणुका कराव्यात ही दुर्दैवाची गोष्ट आहे. या व्यक्ती कुठल्या प्रांताच्या आहेत वा या कुणाच्या वशिल्यावर आल्या हा मुद्दा गौण आहे. इथे असलेली तथाकथित उणीव भरून काढण्यास हे अधिकारी पात्र नाहीत हाच मुद्दा महत्त्वाचा आहे.

अकौन्टस विभागातील उच्च शिक्षित महाराष्ट्रीय अधिकाऱ्यास काढून त्याच्याऐवजी तीन–चार अधिकाऱ्यांची नेमणूक झाली. त्यापैकी एकजणसुद्धा गेलेल्या महाराष्ट्रीय अधिकाऱ्याच्या बरोबरीची शैक्षणिक पात्रता असलेला नाही. पूर्वीच्या व्यवस्थापनाला दोष देणाऱ्या नव्या संचालकांकडून अशा नेमणुकांची अपेक्षा नव्हती. अधिकारी तरुण नसणे ही एकच इथली उणीव होती, असे ठोकळेबाज मत संचालकांनी बनवले होते की काय कुणास ठाऊक !

परंतु डिसेंबर महिन्यात या कारखान्यात १३ दिवस संप झाला. तेव्हा जुन्या अधिकाऱ्यांच्या संपूर्ण सहकार्यामुळेच प्रक्रिया चालू असलेले एकही ग्रॅम औषध वाया गेलेले नाही. संपानंतर संचालकांनी स्वतःचा अहंकार गुंडाळून ठेवून याची जाहीर कबुली द्यावी लागली आहे; परंतु जुना तवढा नालायक, ही अढी मनात अजून असल्याची सर्वांना पदोपदी जाणीव होईल, असे वर्तन ते जाणूनबुजून करतात. ज्या अधिकाऱ्यांच्या सहकार्यावर इथले व्यवस्थापन चालवायचे त्यांच्यात जुने ते नावडते व नवे ते लाडके असा भेद करण्याचे धोरण कारखान्याच्या दृष्टीने आत्मघातकी आहे.

अपात्र अधिकाऱ्यांच्या प्रश्नावर तोडगा म्हणून नवे अधिकारी नेमले व त्याच वेळी कारखान्याच्या वाढीच्या अनेक योजना सल्ला-

## जुने ते नावडते, नवे ते लाडके हे धोरण आत्मघातकी

गार कंपन्यांकडे पूर्णत्वाने सोपवण्यात आल्या. (on turn key basis) यामध्ये असलेला विरोधाभास संचालकांच्या दृष्टीला कसा दिसत नाही याचेही अनेकांना आश्चर्य वाटत आहे.

अपात्र अधिकाऱ्यांच्या प्रश्नाचा निकाल लावल्यानंतर इथल्या समस्येचे आणखी एक कारण हाताळायचे राहिले; ते म्हणजे कारखान्यातील तथाकथित कालबाह्य व अशास्त्रीय व्यवस्थापन आणि कार्यपद्धती. संचालक श्री. स्वामीनाथन व जनरल मॅनेजर श्री. धारपुरे यांचा आधुनिक व्यवस्थापनशास्त्राचा अभ्यास चांगला असावा. त्या ज्ञानाचा उपयोग करण्याची त्यांना इथे उत्कृष्ट संधी मिळाली. परंतु त्यांच्या या ज्ञानात एक त्रूटी आहे, ती सर्वांना सारखी जाणवते. व्यवस्थापन म्हणजे मनुष्यशक्तीचे योग्य नियोजन. Management of manpower या मूलभूत तत्त्वाची ते बिलकूल दखल घेत नाहीत, याचे अनेकांना आश्चर्य वाटते. माणसे म्हणजे यंत्रे नव्हेत व त्यांच्या प्रतिक्रिया प्रकट झाल्या नाहीत तरी त्यांचा परिणाम माणसांच्या कार्यक्षमतेवर होतो, याची जाणीव त्यांना नसावी याचे आश्चर्य वाटते. निर्णयाचे सर्वाधिकार स्वतःकडे घेतल्यानंतरसुद्धा, चुका करणारांची कानउघाडणी करणे जेवढे आवश्यक आहे, तेवढेच काम करणारांची प्रशंसा करणेही आवश्यक असते. तसेच सर्वाधिकारी असलेली व्यक्ती सर्वज्ञ असतेच असे नव्हे. औषधी उत्पादनाच्या नियोजनात तर निरनिराळ्या विषयांतील अधिकाऱ्यांच्या मनमोकळ्या सहकार्याची आवश्यकता फार असते. अनेक नवीन योजना चालू झाल्या; परंतु थोड्याच काळात त्या योजनांकडे दुर्लक्ष होते, असे दिसून येते. त्यामुळे नवीन योजना मांडणे हा एक प्रचाराचा भाग असावा असे वाटते. उदाहरणार्थ—

कोणत्याही उद्योगाच्या सुयोग्य वाढीसाठी दीर्घ पल्ल्याच्या सर्वंकष नियोजनाची (Corporate long range planning) आवश्यकता असते. या कामासाठी नवीन विभागाची संचालकांनी निर्मिती केली व या कारखान्याच्या पुढील १० ते १५ वर्षांच्या वाढीच्या योजना आखण्याचे काम त्या विभागाकडे सोपवले. या विभागात अधिकाऱ्यांच्या नेमणुका कशा केल्या त्या पाहण्यासारख्या आहेत. खरेदी-विभागाचे प्रमुखांना खरेदी-विभागातून अलग करायचे होते. त्यांची दुसरीकडे नेमणूक करता येत नव्हती. (त्यांची कलकत्त्यालाही बदली करून झाली होती.) दुसरे अधिकारी रिसर्च विभागातील होते. सिनिऑरिटीप्रमाणे जनरल मॅनेजर रिसर्च अँड डेव्हलपमेंट हे पद त्यांना मिळणे जरूर होते. त्यांना ते पद न मिळाल्याने ते नाराज झालेले होते. त्यांची समजूत काढणे आवश्यक होते. पूर्वीच्या संचालकांचे जे पर्सनल सेक्रेटरी होते, त्यांना कोणतेही महत्त्वाचे काम द्यायचे नव्हते. अशा या तीन अयोग्य व्यक्तींची नेमणूक या दीर्घ पल्ल्याच्या नियोजनाच्या कामावर झाली. सगळीच नको असलेली माणसे इथे पाठवली आहेत, असे वाटू नये म्हणून रिसर्च विभागातील आणखी एका अधिकाऱ्याची या विभागात बदली केली. दीड वर्षाच्या काळानंतर या विभागात आता दोनच अधिकारी शिल्लक आहेत. रिसर्चमधील ज्येष्ठ अधिकाऱ्यास जनरल मॅनेजरचे पद मिळाले आहे. जुन्या पर्सनल सेक्रेटरीची दुसऱ्या विभागात बदली केली आहे व रिसर्चमधील दुसरे अधिकारी Long range planning चे काम सध्या करीत नाहीत. म्हणजे या विभागात नको असलेले जुने खरेदी-विभागाचे प्रमुखच आता शिल्लक आहेत. दीर्घ पल्ल्याच्या नियोजनाचा केवढा गाजावाजा झाला! या विभागाला भरमसाट प्रसिद्धी दिली गेली; असे असताना काम करण्यास अयोग्य माणसांची निवड का केली? वैयक्तिक आवडी-निवडीसाठी एका चांगल्या योजनेची अशी नासाडी करण्याचीही संचालकांना सत्ता असते काय? चांगल्या व आधुनिक व्यवस्थापनतंत्रात हे बसते का?

## परदेशी कंपनीशी करार

औषधी उद्योगात मोठ्या प्रमाणावर औषध-निर्मितीपेक्षा, (Bulk drugs) गोळ्या, इंजेक्शन्स, सायरप्स् उत्पादनात (Formulations) फायद्याचे प्रमाण जास्त असते. कारखान्याला आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यास Formulations चे उत्पादन वाढवण्याचा निर्णय संचालकांनी घेतला तो योग्यच होता; परंतु याच्याही कार्यवाहीत गफलत कशी झाली समजत नाही. म्हणजे त्याचे असे झाले की, जॉर्ज फर्नांडिस, परकीय बहुराष्ट्रीय कंपन्यांना धमकावण्या देत होते. त्यांनी कोकाकोला, आय. बी. एम्. वगैरे कंपन्यांना गाशा गुंडाळायला लावला; पण त्या सुमारासच इथले मान्यवर संचालक 'मर्क शार्प अँण्ड डोम' या बहुराष्ट्रीय अमेरिकन कंपनीशी करार करीत होते. त्या करारान्वये 'मर्क शार्प अँण्ड डोम' कंपनीस कॉन्ट्रॅक्ट पद्धतीवर हिंदुस्थान अँटिबायोटिक्स्साठी इंजेक्शन्स्च्या व्हायल्स भरून देण्याचे काम दिले गेले. अशा प्रकारचे काम करणारी भारतीय कंपनी अस्तित्वात नाही काय? असल्यास त्यांनी हे काम करण्यास नकार दिला होता काय? वगैरे अनेक प्रश्न आज तरी अनुत्तरितच आहेत; परंतु कारखान्यात गोळ्या, इंजेक्शन्स वगैरे अधिक उत्पादन होण्याऐवजी हा सरकारी कारखाना चक्क दलाली करू लागला. संबंधित मंत्र्यांनी या घटनेची काय दखल घेतली कुणास ठाऊक!

कारखान्याच्या वाढीच्या काही योजना केंद्र सरकारने मान्य केल्या आहेत. इथले जुने अधिकारी नालायक आहेत असे ठरवून मोठ्या प्रमाणावर नवीन अधिकाऱ्यांच्या नेमणुका झाल्या आहेत. तरीही नव्या योजनाच्या कार्यवाहीचे काम सल्लागार कंपन्यांकडे (Consultancy Firms) का सोपवले? या सल्लागार कंपन्यांपैकी प्रमुख – जास्तीत जास्त काम मिळालेली – कंपनी केरळमधील आहे. हा योगायोगही इथल्या प्रांतवादाच्या परंपरांना धरूनच आहे. पेनिसिलिन, स्ट्रेप्टोमायसिन व अँपिसिलिन या तीनही औषधांच्या उत्पादनवाढीच्या योजनासंबंधात या सल्लागार कंपनीची निवड करण्यात आली आहे. निरनिराळ्या कामांची टेंडर्स या सल्लागार कंपनीमार्फत दिली आहेत. निरनिराळ्या कॉन्ट्रॅक्टर्सना कामे देण्याची यांची पद्धत पूर्णपणे गुप्त आहे. त्यामुळे एखादे काम कुणाला द्यायचे यासंबंधीचे निर्णय गुप्त वाटाघाटीने घेतले जातात. या प्रकारात गैरप्रकारास वाव असतो हे कुणीही सांगेल. केरळच्या या (Fedo) कंपनीस करारात नसलेल्या अनेक सवलती दिल्या जातात. त्यांच्या हेड ऑफिसला – म्हणजे केरळला फुकट टेलिफोन करण्याची सवलत यांना दिलेली आहे. पेनिसिलिन कारखान्यातील काही नोकरवर्गही यांच्या कामासाठी बदली करून पाठवण्यात आला आहे. त्यांच्यासाठी

पृष्ठ २२ वर

# गॉर्की कॉलनी

: लेखक:
**ए. एस. मकरेन्को**

: अनुवाद :
**मीनाक्षी कोल्हटकर**

पूर्वसूत्र : कारावानोव व मिटचागिन यांना डावलल्यामुळे कॉलनीच्या इतिहासात कधीही नव्हते इतके औदासीन्य सबंध कॉलनीत पसरलं. कारण त्यांची सर्व मुलांवर मोठीच पकड बसलेली होती. यात आणखी एक भर म्हणजे शेतीचे प्रयोगही फारसे फलद्रूप होत नव्हते. शिक्षकवर्गावरही निराशेची छाया पसरलेली होती एखादे मशिन सतत चालू रहाते त्याप्रमाणे कॉलनीचे जीवन हास्य-विनोदाशिवाय संथपणाने चालले होते.

एक दिवस आन्तोननी कॉलनीत कसरतीचे व कवायतीचे शिक्षण द्यायला सुरुवात केली. मुलांनीही त्याचं मनःपूर्वक स्वागत केलं. या लष्करी कवायतीचा मुख्य परिणाम म्हणजे मुलांचा गबाळेपणा जाऊन ती तरतरीत व व्यवस्थित दिसू लागली. शेतीच्या कामावरही एडवर्ड शेरे हे खिलाडू व हसतमुख वृत्तीचे गृहस्थ रुजू झाले. त्यांचा आत्मविश्वास आणि कामाचा उरक दांडगा होता. नवीन कॉलनीचं कामही चालू होतं. त्या ठिकाणी वीस एक मुलं रहायला लागली. त्या सर्वांच्याबरोबर रोडिम्चिक नावाची एक व्यक्ती शिक्षक म्हणून काम करीत होती नवीन चेहरे, वाढणाऱ्या नव्या काळज्या व नवीन कॉलनीचं काम, दिवसेंदिवस होणारी प्रगती यामुळं जुनं दारिद्र्य आणि औदासीन्य यावर सगळ्यांनी मात केली.

एव्हाना शेरेसाहेब खरी पात्रता, सखोल ज्ञान, कामाचा उरक, जाड्या जाड्या शब्दांचा कमी वापर, शांतपणाने काम करायची पद्धत या त्यांच्या स्वभाव-वैशिष्ट्यांमुळे कॉलनीतल्या तरुण मुलांना फारच आकर्षित करू लागले होते.

फेब्रुवारीच्या सुरुवातीला एके दिवशी काराबानोव कॉलनीमध्ये परत आला. पुन्हा कॉलनीतच राहाण्याची इच्छा त्याने प्रदर्शित केली आणि आन्तोननीही त्याला परवानगी दिली. पहिल्या दिवसापासूनच तो शेरेसाहेबांचा उजवा हात बनला. आन्तोननीही दोनदा त्याला पैसे आणायला सांगून त्याच्यातील प्रामाणिकपणाला आवाहन केलं आणि काराबानोवही या परीक्षेला यशस्वीपणे उतरला.

### प्रकरण पंचविसावे

## एकजिनसी शिक्षणशास्त्र

१९२३ च्या हिवाळ्यात अनेक घडामोडींमुळे आमच्या सामुदायिकाच्या दृष्टीने नवीन संघटना करण्यात आम्ही सुधारणा केल्या. यात मुख्यत्वेकरून म्हणजे सैनिकी पद्धतीवर छोट्या छोट्या तुकड्या व त्यांचे अधिकारी यांची नेमणूक होय.

आतासुद्धा अशा तऱ्हेच्या तुकड्या व त्यांचे प्रमुख गॉर्की कॉलनीत, झेझिन्स्की कम्यून व अशाच युक्रेनमध्ये पसरलेल्या छोट्या छोट्या कॉलनीतून येत.

१९२७ व १९२८ मध्ये झालेल्या गॉर्की कॉलनीच्या किंवा झेझिन्स्की कम्यूनच्या तुकड्या व झादारोव व बुरुन यांनी बनविलेल्या तुकड्या यांच्यात पुष्कळ फरक होता; परंतु १९२३ च्या हिवाळ्यात आम्ही प्रथम याचा पाया गॉर्की कॉलनीत घातला. या तुकड्यांचा खरा अर्थ लोकांच्या बराच उशीरा लक्षात आला. कारण त्यामुळे एकंदर शिकवण्याच्या तंत्रात फार मोठा फरक झाला. त्याची बरीच निंदा-नालस्ती पण करण्यात आली आणि आमच्या या सगळ्या कामावर एकछाप शिक्षणतंत्र अशी नावे ठेवण्यात आली. या दोन्ही शब्दांचे एकत्रीकरण हेच आमची हेटाळणी करण्याला पुरेसे होते.

१९२३ साली या रानातल्या एका छोट्याशा संस्थेत नव्या प्रकारचे शिक्षणशास्त्र अमलात येत होते, याची कुणालाही कल्पना नव्हती.

एका क्षुल्लक गोष्टीवरून ती सुरुवात झाली.

आमच्या एकंदर वस्तू मिळवण्याच्या चिकाटीमुळे आम्हाला कोणीही धंदा, लाकूडफाटा दिला नव्हता. नेहमीप्रमाणे आम्ही वठलेल्या झाडाचे लाकूड किंवा जंगलात पडलेले लाकूड जमा करून आणीत होतो. उन्हाळ्यात अशा तऱ्हेने जमा केलेला सगळा लाकूडफाटा नोव्हेंबरपर्यंत कसाबसा पुरला आणि मग मात्र आमची जळणाची मोठीच हलाखीची परिस्थिती निर्माण झाली. खरे सांगायचे म्हणजे, असे हे वठलेले लाकूड गोळा करायलाही आम्हाला कंटाळा येत असे. कारण त्याच्यासाठी शेकडो मैल जंगलात फिरावे लागे आणि त्यातूनही म्हणण्यासारखे लाकूड जमा होत नसे. काही पालापाचोळा पुष्कळदा पडत असे. त्यामुळे केलेल्या श्रमांचे चीज होत

नसे. दुसरे म्हणजे हे करीत असताना कपडेही फाटत. आधीच आमचे कपड्यांचे दैन्य होतेच, शिवाय हिवाळ्यात हे काम करायचे म्हणजे थंडीने पावले आणि हात गारठून जात असत. ब्राटचिन्को जमवलेले लाकूड आणण्यासाठी घोडे द्यायला तयार होत नसे.

'तुम्ही स्वतःच करा ना! या कामाला घोडे मिळणार नाहीत! ते जळण आणायचे काम करतील; पण असल्या प्रकारचे जळण आणायला ते जाणार नाहीत. ते काय जळण आहे?' ब्राटचिन्को सांगे.

कालिनासाहेबांनी त्याला विचारले, 'अरे बाबा, आपल्याला थंडीपासून रक्षण करायला पाहिजे का नको?' त्यांना वाटले हा अगदी बिनतोड प्रश्न आपण त्याला विचारला.

'मला विचाराल तर आपल्याला शेकोटीची काही जरुरी आहे असं वाटत नाही. तबेल्यात आम्ही कधी शेकोटी पेटवीत नाही. तरीसुद्धा आम्ही ठीकठाक आहोत!'

आम्ही एकदा आमच्या कॉलनीच्या सभेमध्ये एक ठराव केला. त्याअन्वये काही दिवस मुलांना शेतात खत घालण्यास न पाठविता काही मुलांना लाकूड जमा करायला आमच्या मदतीला द्यावीत, अशी शेरेसाहेबांना विनंती करायचे ठरविले वीस मुलांची एक तुकडी—त्यामध्ये बुरुन, बेलुखिन, बेर्शनेव, वोल्कोव, असादची, चबोट वगैरे तगड्या मुलांचा समावेश केला. ते सकाळी भाकरी खिशात घालून रानामध्ये जात. सबंध दिवसभर ते घुंडून येत. संध्याकाळी आमच्या कॉलनीतले रस्ते जळाऊ लाकडांच्या तुकड्यांच्या ढिगांनी चितारले जात व ब्राटचिन्को त्याची गाडी घेऊन येई व हे सर्व घेऊन जाई.

संध्याकाळी मुले अगदी कमालीची भुकेलेली असत. बरेच वेळा परत येताना मुले काही तरी खेळ खेळत येत. ब्राटचिन्को काही मुलांच्या मदतीने ती लाकडे गाडीत घालायचे काम करीत असताना राहिलेली मुले चोर-शिपाई हा खेळ खेळत. त्यायोगे आपल्या पूर्वायुष्यातल्या अवशेषांचे धागेदोरेच ते हाताळीत. हारलेली मुले संध्याकाळी कॉलनीत पकडून आणीत. हे सारे गमतीतच चाले. त्या मुलांना माझ्या ऑफिसात असादची किंवा कोटर्यो घेऊन येत. कोटर्यो हा मखनोच्या टोळीत होता व त्याची चाकरी करताना एक बोटही घालवून बसलेला होता. ते जरा जोरातच मला सांगत,

'यांची डोकी उडवा पाहू! हे सारे शस्त्रं घेऊन रानात लपून बसलेले होते. कदाचित आणखीसुद्धा काहीजण असतील हं!'

यानंतर त्यांची उलटतपासणी घेण्यात येई. वोल्कोव मोठेपणाचा आव आणून बेलुखिनला विचारी, 'किती मशिनगन्स सापडल्या?'

'मशिनगन्स म्हणजे काय? ती काही खाण्याची वस्तू आहे काय?' बेलुखिन विचारी.

'बंदुकीची औलाद, मशिनगन्स कधी खातात काय?'

'मग तसं जर असेल तर मला त्या खाण्यालायक नसलेल्या वस्तूशी काही कर्तव्य नाही!'

फेदरेन्को हा एक अगदी गावंढळ. त्याला एकाएकी विचारीत असत, 'बोल, तू मखनोच्या हाताखाली काम केलंयस का नाही?'

फेदरेन्को तेवढा चलाख नव्हता. खेळाची गंमत न घालविता उत्तर कसे द्यायचे ते त्याला समजत नव्हते. तो म्हणे, 'हो. मी काम केलेलं आहे.'

'तू तिथे काय काम करीत होतास?' त्याला असे परत विचारण्यात आल्यावर तो विचार करीत बसे. तेवढ्यात मागून कोणी तरी त्याची नक्कल करीत उत्तर देई,

'मी होय, मी गाई चरायला रानात घेऊन जात असे.'

फेदरेन्को सभोवार नजर टाकून कोणी उत्तर दिले ते शोधण्याचा प्रयत्न करी; पण त्याला सर्वजण मोठ्याने हसताना दिसत, कोटर्यो रागारागाने फेदरेन्कोच्या बावळट चेहऱ्याकडे पाही. मला तो हळूच सांगे, 'त्याचे डोळे बघा! हा माणूस भयंकर आहे. याला फाशीचीच शिक्षा झाली पाहिजे!'

मी पण तशाच पद्धतीने त्याला उत्तर देई,

'होय. तू म्हणतोस ते बरोबर आहे. त्याला अद्दल घडलीच पाहिजे! त्याला जेवणघरात घेऊन जा आणि रोजच्यापेक्षा जास्त खायला दे!'

'भयंकरच शिक्षा!' दुःखी आवाजात कोटर्यो म्हणे.

बेलुखिन मध्येच म्हणे, 'तसं म्हणाल तर मी पण दरोडेखोरांच्या टोळीत गाई वळायचंच काम करीत असे!'

हे सारे ऐकल्यावर फेदरेन्कोच्या डोक्यात जरा प्रकाश पडे आणि तो हसून सर्वांच्याकडे पाही. मुले अशा तऱ्हेने काम करीत होती. अशावेळी बुरुन आत येऊन म्हणे,

'आमच्या या तुकडीनं बारा गाड्या जळाऊ लाकूड जमा केलं आणि नाताळापर्यंत आम्ही हजार मण लाकडं जमा करू!'

जोपर्यंत क्रांतीची उरलीसुरली लाट संपली नव्हती तोपर्यंत रेजिमेंट व डिव्हिजन हे दोन्ही शब्द अस्तित्वात आले नव्हते. मुख्यत्वेकरून युक्रेनमध्ये गनिमीयुद्ध बराच काळपर्यंत चालू होते. हे अशा तऱ्हेच्या छोट्या छोट्या तुकड्यांच्या द्वारे चालत असे. तुकडीमध्ये हजारो सैनिकांचा समावेश होऊ शकतो किंवा शंभरहून कमी सैनिकही असू शकतात. काहीही असले तरी काम तेच होते व तेही जंगलच्या आसऱ्यानेच करावे लागते.

आमच्या मुलांना या गनिमी युद्धतंत्राचे एक प्रकारचे आकर्षण होते आणि जे आपल्या कमनशिबाने विरुद्ध बाजूला पडले गेले होते त्यांना तर या प्रकारच्या धडपडीमध्ये जास्तच आकर्षण झाले होते, तसे पाहिले तर वर्गलढा म्हणजे काय, याचा अर्थही त्यांना माहीत नव्हता. शिवाय सोविएत सरकारने याबाबत त्यांच्याकडून फारच कमी अपेक्षा केली होती, म्हणूनच मला वाटते त्यांना कॉलनीत पाठविण्यात आले होते.

आमची ही रानातली छोटीशी तुकडी कुऱ्हाडी-करवत घेऊन कामे करीत होती; परंतु त्यांनीसुद्धा आमच्यासमोर खऱ्याखुऱ्या गनिमी युद्ध-तुकडीचे चित्र उभे केले होते. त्याच्या प्रत्यक्ष आठवणी नसल्या तरी त्याबद्दलच्या गोष्टी व दंतकथा ऐकिवात होत्या.

आमच्या मुलांच्या डोक्यात असलेल्या क्रांतीच्या ढोबळ कल्पनांना डिवचायची इच्छा माझी नव्हती. शिक्षणशास्त्राची नुसतीच नक्कल करणाऱ्यांनी आमच्यावर सपाटून टीका केली. कारण आम्ही हा सैनिकी खेळ कोणत्या संदर्भात खेळतो, याचे त्यांना कधीच आकलन झाले नव्हते. तुकडी या शब्दाला या काही लोकांच्या मनात फारशी चांगली सांगड नव्हती. कारण शास्त्रीय किंवा बुद्धिवादी आव आणणाऱ्या लोकांवर त्यांची आसने आणि त्यांचे मानसशास्त्र याकडे

दुर्लक्ष करून, डाव्या व उजव्या बाजूंनी त्याच्यावर चौफेर हल्ला करण्यात आला होता आणि त्यांना तुकडीमध्येच कबुल्या द्याव्या लागल्या होत्या.

पण याला काही उपाय नव्हता. कॉलनीची सुरुवात कुठल्याही प्रकारच्या टीकेला न जुमानता आम्ही तुकडीपासूनच केली होती

बुरुन नेहमी लाकूड तोडणाऱ्या तुकडीचे पुढारीपण करीत असे. हा मान त्याला अगदी निर्विवादपणे मिळाला होता. आमच्या तुकडीच्या खेळाप्रमाणे मुले त्याला दरोडेखोरांचा नायक म्हणत असत.

'नायक वगैरे कशाला म्हणता? दरोडेखोरांनाच फक्त नायक असतो!' मी त्यांना सांगे.

'दरोडेखोरांनाच कसा? लाल सेनेलासुद्धा नायक होताच. शिवाय गनिमी सैनिकांनाही नायक होताच की!' काही मुले म्हणाली.

'लाल सेनेच्या प्रमुखाला नायक म्हणत नसत.'

'लाल सेनेमध्ये अधिकारी असत. आपली काय लाल सेना थोडीच आहे?'

'समजा, तरीसुद्धा आपण अधिकारी हा शब्द वापरू शकतो आणि तो चांगला आहे!'

लाकडे तोडाण्याचे काम एकदाचे संपले. एक जानेवारीपर्यंत आमच्याकडे एक हजार मण लाकूडफाटा जमा करण्यात आला. तरीही आम्ही बुरुनच्या तुकडीचे विसर्जन केले नाही, तर नव्या कॉलनीत उष्मघरे दुरुस्त करण्यासाठी आम्ही त्याची नेमणूक केली. ही तुकडी दररोज सकाळी न्याहारी वगैरे करून जात असे व संध्याकाळी परत येत असे.

एक दिवस झादारोव मला म्हणाला, 'हे आपल्याकडं असं का असावं? आपण एकच बुरुनची तेवढी तुकडी का बनविली? बाकीच्यांचं काय करायचं?'

आम्ही फारसा विचार करीत बसलो नाही. त्या वेळी कॉलनीमध्ये आम्ही चटकन् कोणताही नियम लागू करीत असू. त्याने लक्षात आणून दिल्याप्रमाणे झादारोवच्याच नेतृत्वाखाली दुसऱ्या तुकडीची जुळणी आम्ही करून टाकली.

ही दुसरी तुकडी निरनिराळ्या वर्कशॉपमधून काम करीत असे. बेलुखिन व वेर्शनेव वगैरेंनी बुरुनची तुकडी सोडून देऊन झादारोवच्या तुकडीत प्रवेश केला.

अशाच तऱ्हेने निरनिराळ्या तुकड्यांची उभारणी झाली आणि नव्या कॉलनीत तिसऱ्या व चौथ्या तुकडीची जुळणी झाली. मुलींनी सुद्धा नात्स्या निचेवनथा हिच्या नेतृत्वाखाली पाचवी तुकडी तयार केली.

अशा तऱ्हेने वसंत ऋतूच्या सुरुवातीपर्यंत ह्या निरनिराळ्या तुकड्यांची उभारणी झाली. या तुकड्या लहान लहान असून आमच्या वर्कशॉपमध्ये नियुक्त केल्या होत्या. चामड्याच्या वर्कशॉपमध्ये १ नंबरची तुकडी, घोड्याच्या पागेमध्ये २ नंबरची तुकडी, लोखंडाच्या वर्कशॉपमध्ये ६ नंबरची तुकडी, डुकरांच्या खुराड्यात १० नंबरची तुकडी अशा तऱ्हेने वाटणी केली होती. तुकडीच्या अधिकाऱ्यांची नेमणूक मात्र मी स्वतः केली होती.

परंतु काही दिवसांनी मी या अधिकाऱ्यांची सभा घ्यायला सुरुवात केली आणि आमची मुले गमतीने त्याला अधिकारी मंडळ म्हणू लागली. या सभा मी वरचेवर घेत असे. कुठलाही महत्त्वाचा निर्णय या अधिकारी मंडळाच्या संमतीनेच मी घेऊ लागलो. पुढेपुढे या अधिकाऱ्यांची नेमणूकही निवडणुकीच्या पद्धतीने होऊ लागली. मी अशा तऱ्हेने अधिकाऱ्यांची निवडणुकीद्वारे नेमणूक केली व ते त्या मतदारांना जबाबदार राहू लागले. नवीन अधिकाऱ्यांची नेमणूक करावयाची झाल्यास अधिकारी मंडळात जोरदार चर्चा होऊन मगच ती नेमणूक होत असे. आमच्या मुलांच्या सहकार्यामुळे आम्हाला चांगल्यापैकी अधिकारी निवडता येत आणि आमच्या या अधिकारी मंडळाचे कधीही विसर्जन करावे लागले नाही किंवा त्यांनी कधी राजिनामाही दिला नाही.

एक गोष्ट आम्ही कटाक्षाने पाळीत होतो. आमच्या अधिकारी मंडळाला कोणतेही खास अधिकार देण्यात आले नव्हते. त्यांना कोणतीही गोष्ट अधिकारी म्हणून इतरांपेक्षा जास्त प्रमाणात दिली नाही. महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांनाही इतर मुलांसारखेच व इतरांइतकेच काम करावे लागे.

१९२३ च्या उन्हाळ्याच्या सुरुवातीला आम्ही आमच्या तुकड्यांच्या पद्धतीत खूपच सुधारणा केली आणि ही सुधारणा म्हणजे आमच्या सामुदायिकाचा हा एक नवीन शोध १३ वर्षांच्या आयुष्यात लागला. या शोधान्वये विरोधी संघटना, सामान्याची लोकशाही, हुकूम आणि आपआपसातले दुय्यम स्थान अस्तित्वात असूनही आमचे हे खरेखुरे सामुदायिक भक्कम पायावर उभे राहिले.

हा शोध म्हणजे आमच्या संमिश्र तुकड्यांचे किंवा निरनिराळ्या तुकड्यांचे एकत्रीकरण होते.

आमचे विरोधक आमच्यावर व साचेबंद शिक्षणपद्धती म्हणून आमच्या या पद्धतीवर हल्ला करीत. त्यांनी आमच्या अधिकाऱ्यांना काम करताना कधीही पाहिले नव्हते. खरे तर त्यांनी अशा तऱ्हेच्या संमिश्र तुकड्यांबद्दल कधी ऐकलेही नव्हते किंवा त्यांनी आमच्या या पद्धतीमागचे सूत्र जाणून घेण्याचीही कधी पर्वा केली नव्हती.

या संमिश्र तुकड्या अस्तित्वात येण्याचे मुख्य कारण म्हणजे आमचे काम खरेखुरे शेतीप्रधान होते. आमची जमीन ७० एकरच असली तरी शेरेसाहेबांनी उन्हाळ्यामध्ये सर्व मुलांची मदत शेतीसाठीच उपयोगात आणावयाचे ठरवले. काही मुले निरनिराळ्या वर्कशॉपमधून कामे करीत असत आणि त्यांना ते काम सोडावेसेही वाटत नव्हते; परंतु शेतावर काम करणे म्हणजेच जीवनावश्यक वस्तू उत्पादन करणे, तसेच आमच्या दैनंदिन आयुष्यात सुधारणा करणे म्हणजेच वर्कशॉपमधून कामाचे शिक्षण घेणे याची जाणीव पक्की होती.

हिवाळ्यामध्ये शेतीचे काम जवळजवळ संपले आणि पुन्हा सर्वांनी वर्कशॉपमधून आपापल्या जागा भरल्या; पण जानेवारीत शेरेसाहेबांनी पुन्हा उष्णगृहात काम करायला, खताची ने-आण करायला मुलांची मागणी सुरू केली. त्यांच्या मागण्या दिवसेंदिवस वाढतच होत्या.

शेतीचे काम हे ज्याप्रमाणे जागा आणि रचना यांच्या फरकाप्रमाणे बदलत असे, त्याप्रमाणे याचा परिणाम म्हणजे आमच्या सामुदायिकाची विभागणी त्या त्या कामाप्रमाणे होत असे. कामाच्या

वेळेला आमच्या प्रमुखांचा अधिकार आणि त्यांची जबाबदारी या दोन गोष्टी महत्त्वाच्या होत्या आणि शेरेसाहेब नेहमी म्हणत की, कॉलनीत शिस्त राखण्याबाबतीत व ती पालन करण्याबाबतीत एका माणसाला जबाबदार ठेवले पाहिजे. तसेच कामाच्या बाबतीत व कामाचा दर्जा ठेवण्याच्या बाबतीत कोणाही एकाला जबाबदार ठेवले पाहिजे. कोणताही तर्कशुद्ध विचार करणारा माणूस वरील बाबतीत हरकत घेणार नाही; परंतु आमची विद्वान मंडळी मात्र हरकती उपस्थित करीत असत.

या संमिश्र तुकड्या आम्ही आमच्या निरनिराळ्या कामांच्या गरजांनुसार बनविण्याची खबरदारी घेत असू.

संमिश्र तुकडी ही तात्पुरती एका आठवड्यापेक्षा जास्त मुदतीसाठी बनविलेली नसे. ती विशिष्ट शेतातले बटाटे उकरणे, आखलेली जागा नांगरणे, वियाणे बाजूला करणे, खताची नें-आण करणे किंवा बी पेरणे वगैरे खास कामासाठी बनविलेली असे.

प्रत्येक वेगवेगळ्या कामाला सारख्याच संख्येने माणसे नसत. काही कामाला दोनच माणसे लागत होती. काहींना पाच, तर काहींना आठ, तर काहींना वीस माणसे पण लागत असत. या संमिश्र तुकड्यांना कामाप्रमाणे वेळही कमी-जास्त लागे. थंडीच्या दिवसांत शाळा चालू झाल्यानंतर मुले जेवणाआधी किंवा जेवणानंतर दोन पाळ्या घेऊन काम करीत. जेव्हा मुले बाहेरच्या शाळेत जाऊ लागली त्या वेळी सहा तासांचा दिवस चालू करण्यात आला व एकाच वेळी सारेजण काम करीत असत; परंतु निरनिराळी कामे पुरी करण्यासाठी काही मुले सकाळी सहा वाजल्यापासून दुपारपर्यंत व काही मुले दुपारपासून संध्याकाळी सहा वाजेपर्यंत काम करीत. कामेच इतकी होती की, त्यामुळे आम्हाला कामाची वेळ वाढवावीच लागली.

कामाच्या वैचित्र्यामुळे आणि त्याला लागणारा निरनिराळा वेळ यामुळे आपोआपच आमच्या संमिश्र तुकड्यांत एक प्रकारचे वैचित्र्य निर्माण झाले. आमच्या संमिश्र तुकड्यांच्या कामाची जणू काही एखाद्या रेल्वे-वेळापत्रकाप्रमाणे घडी बसली होती.

३ आणि १ ही संमिश्र तुकडी सकाळी ८ वाजल्यापासून दुपारी चार वाजेपर्यन्त जेवणाचा वेळ सोडून बगीच्यात काम करीत होती आणि बरेचदा ट्रकगार्डनमध्ये, तसेच ३ व ० ही तुकडी फळबागेत, ३ व आर ही उष्णघरामध्ये व दुरुस्ती कामात हे सर्व कॉलनीत माहीत झाले होते. पहिली संमिश्र तुकडी सहापासून बारापर्यन्त आणि दुसरी संमिश्र तुकडी बारापासून सहापर्यन्त अशा तऱ्हेने काम करीत असे. एकूण १३ संमिश्र तुकड्या झाल्या होत्या.

या संमिश्र तुकड्या फक्त कामाच्या वेळेपुरत्याच असत. ठराविक काम झाल्यानंतर मुले कॉलनीत परत येत आणि संमिश्र तुकड्यांचे अस्तित्वही तिथेच संपत असे.

प्रत्येक मुलगा कुठल्या तरी एका कायम तुकडीचा सभासद असे आणि त्याचे त्या तुकडीवर ठराविक प्रकारचे काम– वर्कशॉपमध्ये, डॉरमिटरीत व जेवणघरात– ठरलेले होते. तसाच त्याचा प्रमुखही ठराविक असे. कायम स्वरूपाच्या तुकड्या आणि त्यांचे प्रमुख हे जणू काही कॉलनीचे केंद्रबिंदू समजले जात असत. त्यांच्या प्रमुखांना प्रतिनिधिमंडळाचा सभासद असावेच लागे; परंतु वसंत ऋतू संपल्यावर उन्हाळा जसजसा जवळ येऊ लागला तसतसे कॉलनीच्या मुलांचे संमिश्र तुकड्यांचे काम कधी कधी ठराविक कामासाठी संपूर्ण आठवडा चालू ठेवावे लागे.

कुठल्याही संमिश्र तुकडीत दोघेचजण काम करीत असले तरी त्यातला एक प्रमुखाची जागा घेई. कामाच्या बाबतीतली सर्व जबाबदारी त्याच्यावर असे. कामाची वेळ संपता क्षणी ही संमिश्र तुकडी विसर्जित होई.

प्रत्येक तुकडी एका आठवड्यापुरती मर्यादित असे. अशा तऱ्हेने कॉलनीतल्या प्रत्येक मुलाला चालू आठवड्यातले काम करून झाल्यावर पुढील आठवड्यातील काम दुसऱ्या प्रमुखाच्या हाताखाली करावे लागे. संमिश्र तुकडीची नियुक्ती पण अधिकारी मंडळाकडूनच एका आठवड्यापुरती होत असे आणि नियमाप्रमाणे दुसऱ्या आठवड्यातल्या प्रमुखाचे काम त्यांना करता येत नसे. अशा तऱ्हेने प्रत्येक मुलाला तुकडीचा सामान्य सभासद म्हणूनही काम करावे लागे.

अशा तऱ्हेने प्रतिनिधिमंडळ कॉलनीच्या प्रत्येक सभासदाला आळीपाळीने संमिश्र तुकडीच्या प्रमुखाचा मान देई. याला फक्त अपवाद म्हणजे अगदीच नालायक मुलांना हा मान मिळत नसे आणि ते अगदी योग्यही होते. कारण संमिश्र तुकडीच्या प्रमुखावर मोठी जबाबदारी असे. आमच्या या पद्धतीला खरोखर धन्यवादच दिले पाहिजेत. कारण त्यायोगे सर्वजणांना कामाच्या बाबतीत सारखीच संधी व कामाची जुळणी करण्यास मदत मिळत असे आणि समाजसत्तावादाचं शिक्षण देण्याच्या दृष्टीनं अशा तऱ्हेची पद्धती फार महत्त्वाची होती. १९२६ मध्ये या पद्धतीमुळे आमची कॉलनी आणि तिचे सर्व विद्यार्थी पडेल ते काम व जबाबदारी पेलण्याच्या बाबतीत झालेल्या चाचणीत अतिशय उत्तम रीतीने चमकले. याबद्दल खरोखरच धन्यवाद देणे आवश्यक आहे. स्वतंत्रपणे कामाची आखणी करण्यासाठी किंवा कोणतेही घेतलेले काम पुरे करण्यासाठी आम्हाला योग्य माणसांचा तुटवडा पडला नाही.

कायमच्या तुकडीच्या प्रमुखाचे महत्त्व जरा कमी झाले. संमिश्र तुकड्यांचे प्रमुख म्हणून हे कायम तुकडीचे प्रमुख जागा घेत नसत. कारण त्यांना मुळातच पुष्कळ काम पडत असे. कायम तुकडीचा प्रमुख संमिश्र तुकडीमध्ये एक सामान्य कामगार असे आणि कामाच्या वेळेला संमिश्र तुकडीच्या प्रमुखाच्या आज्ञा पाळीत असे. हा संमिश्र तुकडीचा प्रमुख अनेकदा त्याच्या तुकडीचा सभासद असणे अगत्याचे असे.

या आमच्या गुंतागुंतीच्या तुकडी-पद्धतीमुळे कॉलनीचा कुठलाही मुलगा कुठेही काम करायला मागे-पुढे पहात नसे आणि कुठल्याही मुलाला फाजील, महत्त्व मिळत नसे किंवा इतरांच्यावर दादागिरी करता येत नसे हेच आमच्या सामुदायिकत्वाचे गमक होते.

या संमिश्र तुकडी-पद्धतीत आलटूनपालटून काम आणि जमवाजमव, हुकुमत आणि त्यांचे पालन याचे प्रात्यक्षिक, सामुदायिक आणि वैयक्तिक यांचा सुंदर समन्वय हीच कॉलनीच्या जीवनाची गुरुकिल्ली होती आणि यामुळेच कॉलनीच्या जीवनात खरा आनंद उपभोगता येत होता.

□

## प्रकरण सव्विसावे

# नव्या कॉलनीतले विक्षिप्त प्राणी

ट्रेपकेवाडीचे दुरुस्तीचे काम जवळजवळ दोन वर्षे चालले होते. १९२३ च्या वसंत ऋतूपर्यंत बऱ्याचशा गोष्टी ठीकठाक झालेल्या होत्या. आमचे आम्हालाच आश्चर्य वाटते की, ही नवी कॉलनी आमच्या दैनंदिन आयुष्याचा एक भाग बनली होती. मुख्यत्वेकरून गाईंचे गोठे, घोड्यांचे तबेले, डुकरांचे घर ही शेरेसाहेबांना लागणारी सर्व सिद्धता झाली होती. उन्हाळ्याच्या सुरुवातीला आमचे आयुष्य उगाच फुकट गेले नसते तर निरनिराळ्या कार्यक्रमांमध्ये आम्ही जास्तीत जास्त गुंतून गेलो असतो.

काही दिवसांपर्यंत आमच्या जुन्या कॉलनीच्या संमिश्र तुकड्या ह्याच प्रेरक होत्या. सबंध दिवसभर काहीही खंड न पडता आमच्या या संमिश्र तुकड्या कॉलनीतल्या छोट्या रस्त्यावरून किंवा दोन्ही कॉलनींच्या हद्दीवर सतत दिसून येत असत. कधी काही संमिश्र तुकड्या जुन्या कॉलनीकडून नव्या कॉलनीकडे कामासाठी जाताना दिसत आणि काही काम संपवून जेवणासाठी जुन्या कॉलनीकडे जाताना दिसत.

संमिश्र तुकड्या ओळीने जाताना बरेचसे अंतर एकदम कापीत असत. मुलांच्या कल्पक व धीट वृत्तीमुळे व लवकर पोचण्याच्या इच्छेमुळे ते दुसऱ्या आजूबाजूच्या शेताच्या हद्दीत न जाण्याची पर्वा करीत नसत. सुरुवातीसुरुवातीला आजूबाजूच्या शेतमालकांनी याला अडथळा करायचा प्रयत्न केला; परंतु ते त्यांना शक्य झाले नाही. कारण मुलांनी सतत निश्चित हेतू मनात धरून, सातत्याने आणि अविचलितपणाने परिश्रम करून ने-आण करण्याचे मार्ग शेतातूनच काढले. हे करीत असताना सरळरेषेत जाण्यासाठी भूमितीची मदत घेणे अशक्य होते. कारण कुत्रे, कुंपणे किंवा कुंपणाला लावलेला तट्टया आणि फाटक यांचा अडथळाही दूर करणे जरुरीचे होते व तो त्यांनी यशस्वी केला.

त्यातल्या त्यात कुत्र्यांचा अडथळा दूर करणे फारच सोपे. कारण आमच्याकडे भाकरीचा साठा असे व त्यातली थोडी भाकरी देऊन आम्ही त्यांना गप्प करू शकत होतो; परंतु हे कुत्रेसुद्धा फारसे अडथळे आणीत नसत. कारण त्यांना कॉलनीच्या मुलांबद्दल आदर वाटत असे. कुठल्याही तऱ्हेची करमणूक नसलेले असे नीरस आयुष्य ती कुत्री आतापर्यंत जगत होती; परंतु एकाएकी हे सारे जाऊन एकदम नवीन नवीन अनुभव, खूपशी माणसे, त्यांचे मनोरंजक संवाद, त्यांच्याबरोबर खेळण्याची संधी आणि एखाद्या छोट्याशा मुलाच्या हातातून बक्षीसरूपाने पट्टा वगैरे मिळविण्याची आशा इत्यादी गोष्टी आमच्या कॉलनीच्या सान्निध्यामुळे त्यांना मिळू लागल्या. घराघरातून बांधून ठेवलेली कुत्रीसुद्धा हळू हळू फितूर व्हायला लागली. कारण त्यांना लोकांवर तुटून पडायची संधीच मिळेनाशी झाली. वसंत ऋतूच्या सुरुवातीला आमच्या मुलांनी तुमानी घालायच्या सोडून देऊन अर्ध्या चड्डया घालायला सुरुवात केली. कारण त्या सुटसुटीत आणि कमी खर्चाच्या असत व आरोग्यदृष्टयाही चांगल्या होत्या.

शेतकऱ्यांचा संकुचितपणा नाहीसा व्हायला प्रथम त्यांच्या कुत्र्यांपासून सुरुवात झाली आणि हळू हळू आमची कॉलनी व कोलोमाक नदी हा रस्ता निर्वेध करण्यामधले सर्व अडथळे दूर झाले. प्रथम आंद्रेइ, निखिताज, नेचिपोर्स आणि निकोलास ही साधारण १० ते १६ वर्षांची मुले आमच्या बाजूला आली. आमच्या कॉलनीच्या मुलांचे काम आणि त्यांचा वेगळ्या प्रकारचा पण वैचित्र्यपूर्ण दिनक्रम या गोष्टींनी त्या बाहेरच्या मुलांना आकर्षित करून घेतले. सुरुवातीला ती मुले आमचे बिगुल ऐकत असत आणि आमच्या सामुदायिकाबद्दल त्यांना कुतूहल व आवड उत्पन्न झाली. ती मुले आमचे निरनिराळे कार्यक्रम, निरनिराळ्या तुकड्यांचे संचलन, त्यांचे प्रमुख आणि शेवटी म्हणजे त्यांची निवेदनपद्धती या सगळ्या गोष्टी मोठ्या कौतुकाने बघत. त्यांच्यातल्या मोठ्या माणसांमध्ये आमच्या नव्या शेतीप्रयोगांमुळे एक कुतूहल निर्माण झाले. ती त्यात रस घेऊ लागली. उदा आळीपाळीने निरनिराळी पिके काढण्याची पद्धत, आमचे पेरणीचे यंत्र या गोष्टी त्यांच्या मनात फार भरल्या होत्या. पुढे पुढे तर आमच्या संमिश्र तुकड्यांमध्ये बाहेरच्या शेतकऱ्यांमधला एखादा मित्र हळूच खुरपे किंवा फावडे घेऊन शिरत असे. काही काही आजूबाजूची मुले संध्याकाळच्या वेळेला आमच्या कॉलनीत येत आणि ती आमच्या मुलांमध्ये एकरूप होऊन जात. कॉलनीचा सभासद असणे ही जणू काही भाग्याची गोष्ट असे ते समजतात, असे त्यांच्याकडे पाहिल्यावर वाटे.

कधी कधी घरात रोजच्या दैनंदिन कटकटी किंवा धार्मिक गोष्टींना केलेला विरोध यामुळे ते आपल्या आई-बापांपासून दुरावून कॉलनीमध्ये मिसळून गेले.

सगळ्यात कळस म्हणजे हे वेगळेपण, जगातील सगळ्यात मोठी शक्ती जी स्त्री-शक्ती त्यामुळे म्हणजेच आमच्या सभोवतालच्या शेतकऱ्यांच्या मुलींमुळे शेवटी अजिबात मोडून पडले. शेतकऱ्यांच्या मुलींना आमच्या कॉलनीत अनवाणी फिरणाऱ्या परंतु अतिशय आनंदित व खेळकर दिसणाऱ्या मुलांनी आकर्षित करून घेतले. कारण त्यांच्या समाजातील मुले आमच्या मुलांसारखी तरतरीत नव्हती. आमच्या कॉलनीच्या मुलांनी त्या मुलींशी सलगी करण्याचा किंवा लघळपणा करण्याचा आणि घाबरविण्याचा प्रयत्न केला नाही. त्यामुळे स्थानिक पुरुषवर्गाला विरोध करण्याची संधी मिळाली नाही. आमची मोठी मुले माध्यमिक शिक्षण (राब फॅक) व राष्ट्रीय दल (कोसोमोल) यापर्यंत पोचली होती आणि साहजिकच जास्तीत जास्त रुबाबदार व्हायला लागली होती.

शेतकऱ्यांच्या मुलींना आमच्या मुलांबद्दल वाटणाऱ्या सहानुभूतीने अजून आकर्षणाचे स्वरूप घेतले नव्हते. आमच्या कॉलनीतल्या मुली त्या मुलींपेक्षा जास्त तरतरीत आणि हुशार असूनही अभिमानी नव्हत्या म्हणून त्या कॉलनीच्या मुलांना आवडत असत. प्रेम-प्रकरणे आमच्याकडे बऱ्याच उशीरा सुरू झाली. तारखांचे बंड (डेटिंग) करा रात्रीचे कार्यक्रम वगैरेसारख्या गोष्टी आमच्या कॉलनीत या मुलींनी कधीच केल्या नाहीत. त्या मुली वरचेवर कॉलनीत येत असत; परंतु कॉलनीत एकेकट्या न येता नेहमी गटागटाने येत व

ओळीने बाकावर बसत. कदाचित सूर्यफुलांच्या बिया घरी किंवा कॉलनीत खाण्यास मनाई असल्यामुळे त्या मुकाटयाने बसून राहात.

आमच्या कॉलनीतल्या मुलांबद्दल आजूबाजूच्या मुलांना सहानुभूती असल्यामुळे सभोवतालच्या शेतांचे मालक पूर्वीप्रमाणे मुलांना जाण्या-येण्यासाठी अडथळा करीत नसत. शिवाय आमची मुले इतकी धीट बनली होती की, काही ठिकाणी त्यांनी तट्टयाच्या कुंपणांना भोके पाडली आणि त्यातून फळया घुसवून जाण्या-येण्याचा रस्ता तयार केला व काही ठिकाणी उंच दरड बांधून कुंपणावरून उडी मारण्याची सोय करून घेतली.

कॉलनी ते कोलोमाक नदी हा रस्ता करण्यासाठी काही ठिकाणी शेतकऱ्यांच्या पिकाची नासाडी झाली हा खरोखर आमच्या हातून गुन्हा झाला हे आम्ही कबूल करतो. १९२३ च्या वसंत ऋतूपर्यंत हा रस्ता जणू काही ऑक्टोबर रेल्वे-रस्त्याबरोबर तुलना करण्यासारखा झाला. या रस्त्यामुळे आमच्या संमिश्र तुकडयांचे काम सोपे झाले.

संमिश्र तुकडयांना जेवण आधी देण्याची प्रथा होती. १२ वाजून १० मिनिटांनी पहिली तुकडी जेवून बाहेर पडे. कॉलनी-ड्यूटीवर असलेला शिक्षक तुकडीच्या प्रमुखाच्या हातात त्याच्या तुकडीचा आकडा व त्या तुकडीतल्या मुलांची नावे, प्रमुखाचे नाव, त्याच्यावर सोपविलेले काम आणि ते करण्यास लागलेला वेळ हे सारे लिहून देत असे. शेरेसाहेबांनी हे सगळे प्रकार उच्च गणिताला अनुसरून बसविलेले होते व त्यामध्ये प्रत्येक क्षणन्‌क्षण काटेकोरपाने उपयोगात आणलेला दिसे.

संमिश्र तुकडया जलदगतीने बाहेर पडत आणि पाच–सहा मिनिटांच्या अंतराने त्या लांब एखाद्या शेतामध्ये चालत जाताना दिसत. थोडयाच वेळात एखाद्या कुंपणावरून उडी टाकून त्या पुढे गेलेल्या दिसत. त्यांच्यापाठोपाठ दुसरी तुकडी थोडयाच अंतरावर ३–सी किंवा ३–ओ येताना दिसे. थोडयाच वेळात आजुबाजूचा परिसर सगळया संमिश्र तुकडयांनी गजबजून जाई आणि मध्येच आमचा तोस्का एखाद्या घराच्या छपरावर बसून विचारीत असे.

'१–पी परत आली काय ?'

खरोखर १–पी ही तुकडी शेतांच्यामधून तट्टया-कुंपणांमधून परत येताना दिसे. १–पी ही तुकडी नांगरणी आणि पेरणीचेच काम करीत असे. बहुधा घोडयांच्या सहाय्याने ते सकाळी ५॥ वाजता घर सोडीत. बेलुखिन हा त्यांचा प्रमुख होता आणि त्या बेलुखिनलाच बघण्यासाठी हा तोस्का घराच्या छपरावर चढून बसत असे. थोडयाच वेळात १–पी त्यांच्या सहा सभासदांसकट कॉलनीच्या आवारात आलेली दिसे. ते सर्वजण टेबलाजवळ बसत आणि बेलुखिन त्याचा अहवाल ड्युटीवर असलेल्या शिक्षकाच्या हातात देत असे. रोदिमचिक याने येण्या-जाण्याची वेळ तपासलेली असे. शिक्षक वेळ व काम बरोबर आहे की नाही ते पहात.

बेलुखिन आमचा नेहमी खुशीत असतो.

'आम्हाला आज होडी वेळेवर न मिळाल्यामुळं पाच मिनिटं उशीर झाला हं! आम्हाला आज लवकर कामाला जायचं होतं; परंतु आपला मिटका काही दलालांना घेऊन सोडायला गेला होता!'

'कसले दलाल ?' ड्युटीवरच्या शिक्षकांनी विचारले.

'तुम्हाला माहीत नाही का ?'

'ते आपली फळबाग भाडयानं देणार आहेत!'

'खरं काय ?'

'मी काही त्यांना किनाऱ्याच्या पुढे जाऊ दिले नाही. आम्ही त्यांना विचारले, 'तुम्ही सफरचंद खाऊन आम्ही काय तुमची तोंडं बघायची?' असे म्हणून आम्ही त्यांना परतवून लावले.'

'आन्तोन-सेमियानोविच, नमस्ते!'

मी पण त्यांना नमस्ते म्हटले. मातवई पुढे म्हणाला, 'आन्तोन-साहेब, तुम्ही त्या रोडिमचिकना कधी काढणार? ते सदा तोंड वाकडं करून साऱ्या कॉलनीभर फिरतात. अगदी कॉलनीला लाज आणतात. आपण काही न करता दुसऱ्यांनाही निरुत्साहित करतात आणि तुम्ही आम्हाला त्यांना आमच्या कामाचा अहवाल द्यायला सांगता! आम्हाला काही हे बरे वाटत नाही!'

हा रोडिमचिक कॉलनीत अगदी बदनाम झालेला होता. नव्या कॉलनीत एव्हाना वीस लोकांना ठेवण्यात आले होते. तिथे कामही होते; पण भरपूर वेळही होता. शेरेसाहेबांनी जुन्या कॉलनीतल्या संमिश्र तुकडयांच्या मदतीने प्रथम शेतीचे काम करून घेतले. घोडयांचे तबेले; गाईंचे गोठे आणि डुकरांची खुराडी हे दुरुस्त करण्याचे काम तेथील रहिवासी मुलांवर सोपविले होते. फळबाग व्यवस्थित करून घेण्यासाठी फार मोठे परिश्रम करावे लागले होते. ही फळबाग चार एकर पसरलेली होती आणि शेरेसाहेबांनी ती मोठया प्रमाणावर वाढविण्याचे काम घेतले होते. ती सकाळी आजूबाजूची जमीन चांगली नांगरून, झाडी व्यवस्थित कापून व त्याच्यावर वाढणारी वेडीवाकडी निरुपयोगी झुडपे कापून टाकली होती. खुरटी झाडे झुडपे कापून टाकून छानसे रस्ते तयार केले होते आणि फुलांचे ताटवे लावले होते. आमच्या नव्या उष्मघरात जोपासलेली कलमे पण लावली होती. नदीच्या किनाऱ्याकिनाऱ्याने शेवाळं वगैरे काढून टाकून स्वच्छ पाण्याचे ओहोळ काढले होते.

संबंध वाडीत दुरुस्तीचे काम जवळजवळ संपतच आले होते. तबेल्याच्या जमिनीला असलेले खड्डे किंवा त्याच्या छपराला असलेली भोके जवळजवळ बुजवून टाकलेली होती आणि सुतारलोक डुकरांच्या घराची दुरुस्ती करीत होते. शेरेसाहेबांच्या म्हणण्याप्रमाणे त्या इमारतीत १५० डुकरे सामावू शकली असती.

विशेषतः हिवाळयात नव्या कॉलनीत राहणे फारसे कुणाला पसंत नव्हते. जुन्या कॉलनीत आम्ही तसे बरेच स्थिरावलो होतो. तिथल्या जुन्या इमारती, एकंदर छानछोकीचा अभाव याची आम्हाला कधी खंत वाटली नाही. कडक शिस्त, स्वच्छता आणि कमालीचा नीटनेटकेपणा या गोष्टींमुळे देखाव्याकडे लक्ष देण्याची आम्हाला फारशी जरुरी वाटली नाही. नवी कॉलनी कोलोमाक नदीच्या किनाऱ्यावर वसलेली होती. आजूबाजूला गर्द झाडीच्या मधून डोकावणाऱ्या छानछान इमारती, नदीचा किनारा, फळबाग हे सर्व नैसर्गिक सौंदर्य आम्हाला अजून आकर्षित करीत नव्हते. कारण अजूनही तिथे खूपशी पडझड, अर्धवट दुरुस्त झालेल्या इमारती, चुन्याच्या घाणी, जागजागी उगवलेली झाडे वगैरे दृश्ये होतीच आणि त्याची व्यवस्थित घडी आम्ही केव्हा बसवू शकू हे मला सांगता येणे कठीण होते.

तसे पाहिले तर अजूनही नवी कॉलनी राहण्यायोग्य झाली नव्हती. तिथल्या डॉरमिटऱ्या पुष्कळ मोठया आणि प्रशस्त होत्या;

पण तिथे जेवणघराची किंवा स्वयंपाक करायची सोय नव्हती. स्वयंपाकाची जागा तयार झाली; परंतु तिथे सामानसुमान ठेवायला तळघराची सोय नव्हती. सर्वांत मुख्य म्हणजे, कोणीही जबाबदार व्यक्ती सर्व काही व्यवस्थित लावण्यासाठी तिथे नव्हती.

या सगळ्याचा परिणाम म्हणजे ज्या ज्या लोकांनी हौसेने नव्या कॉलनीची दुरुस्ती व प्रचंड काम अंगावर घेऊन पार पाडले त्यांनाही तिथे राहायची उत्सुकता नव्हती. आमचा ब्राटचिन्को दररोज नव्या व जुन्या कॉलनीत २० किलोमीटर जा-ये करीत असे. अपुऱ्या जेवणा-खाणाची तो फारशी पर्वा करीत नसे. तोसुद्धा नव्या कॉलनीत राहायला जायला तयार नव्हता. असादचीने तर चक्क सांगून टाकले की, 'मी वेळ पडल्यास कॉलनी सोडून जाईन; पण नव्या ट्रेपकेवाडीत राहायला जाणार नाही!'

आमच्या कॉलनीतल्या सगळ्या प्रमुख व्यक्तींनी एक गट तयार केला होता आणि त्यातल्या कुणालाही फोडणे अशक्य होऊन बसले होते. त्यांना नव्या कॉलनीत जबरदस्तीने राहायला पाठविणे व्यक्तींच्या दृष्टीने आणि कॉलनीच्या दृष्टीनेही धोक्याचे होते आणि मुलांना ही गोष्ट पुरेपूर माहीत होती.

काराबानोव म्हणायचा, 'आपली मुलं म्हणजे जणू काही घोड्यासारखी दिसतात. त्यांना चांगल्या तऱ्हेनं ठाकठीक करा आणि पाठीवर थाप मारून सोडून द्या म्हणजे ते अतिशय नीट व्यवस्थित वागतील; पण त्यांना त्यांचं डोकं वापरायला सांगितलंत तर ते डोक्यानंच चालायला लागतील आणि सर्वच संपुष्टात येईल!'

नव्या कॉलनीत एक विचित्र प्रकारचे सामुदायिक आपोआप तयार झाले. त्यामध्ये फारशी चलाख नसलेली किंवा बुद्धीने बेताबाताचीच असलेली व कामसू नसलेली मुले होती. सामुदायिक या दृष्टीने ते खऱ्या अर्थाने सामुदायिक नव्हते, म्हणजेच शिक्षणशास्त्राच्या दृष्टीने निवडलेले नव्हते.

चुकूनमाकून नवीन आलेल्या गटातील एखादी हुशार व्यक्ती अजूनही तिथे पोचली नव्हती आणि पोचली असती तरीही तिचे स्वतःचे अस्तित्व ती विसरून गेली असती. त्या ट्रेपकेवाडीच्या विशिष्ट सामुदायिकात मिसळून गेली असती.

या ट्रेपकेवाडीत पाठविलेली सर्वच मंडळी-शिक्षक आणि कार्यकर्ते-या सर्वांनीच माझी निराशा केली. ते सर्वजण आळशी, अधाशी आणि लाचार होते. जुन्या कॉलनीतल्या लोकांचा ते हेवा करीत. त्यांना रात्रीच्या किंवा दुपारच्या जेवणाला वेगळे काही तरी विशेष मिळत असल्याची अफवा उठवीत. जुन्या कॉलनीवाल्यांना खास मटन आणले होते आणि नव्या कॉलनीवाल्यांना आणले नाही, अशा साऱ्या गोष्टी ते उघडपणे बोलत नसत, तर आपापसात कुजबुजत असत.

जुन्या कॉलनीतली मुले ट्रेपकेवाडीत राहणाऱ्या मुलांची हेटाळणी करीत. झादारोव किंवा वोल्कोव एखाद्या कुरकुरणाऱ्या मुलाला आमच्या स्वयंपाकघरात घेऊन येत आणि तिथल्या मुलांना सांगत, 'अरे, हा बऱ्याच दिवसांचा उपाशी आहे. याला काही खाऊ घाला!'

अर्थातच तो मुलगा खोट्या अभिमानाने खाणे नाकारीत असे. खरे पाहिले असता नव्या कॉलनीतली मुले जास्त खात होती- कारण आमची फळबाग त्यांना जवळ होती. तसेच बाहेरून चक्कीवर धान्य येई. आमच्या गाईपण नव्या कॉलनीतच होत्या. जे दूध निघे ते जुन्या कॉलनीत पाठविणे अशक्यच होते. कारण आमच्याकडे ते आणण्यासाठी काही साधन नव्हते आणि म्हणून ते दूध ट्रेपकेवाडीच्या मुलांनाच मिळत असे.

कुरकुरणाऱ्यांचे आणि कामचुकारांचे एक नवे सामुदायिक नव्या कॉलनीत तयार झाले. याला अनेक गोष्टी कारणीभूत होत्या. मुख्य म्हणजे एका केंद्रबिंदूचा अभाव आणि चांगल्या शिक्षकांचा अभाव.

शिक्षक किंवा इतर लोक आमच्या कॉलनीत येऊन काम करायला तयार नसत. कारण आमचे काम अतिशय अवघड होते व पगार अतिशय कमी होता. शिक्षणखात्याच्या अधिकाऱ्यांनी जे कोणी प्रथम आले त्यांची काहीही चाचणी न घेता त्यांना आमच्याकडे पाठविले. त्यातच ही दोन रत्ने रोडिमचिक व देर्युचेन्को आमच्या वाट्याला आली. ते आपली बायका-मुले घेऊन आले आणि त्यांनी कॉलनीतल्या राहण्याच्या चांगल्या जागा बळकावल्या. मी त्याबद्दल कधीही तक्रार केली नाही. मनाशी मात्र म्हणालो, 'अशाही तऱ्हेची माणसं आपल्या सहवासात येतात!'

देर्युचेन्कोकडे पाहिल्याबरोबरच हा कोणी तरी पेटलुराचा अनुयायी असावा असे वाटे. त्याला स्वतःला रशियन भाषा येत नव्हती. त्याने कॉलनीतल्या सगळ्या खोल्यांतून शेवचेन्कोचे फोटो लावले. तसेच तो युक्रेनियन भाषेतील गाणी म्हणत बसत असे.

देर्युचेन्को हा तरुण होता. तो एकंदरीत युक्रेनियन पद्धतीच्या पोषाखात पक्का भामटा दिसत असे. त्याच्या मिशा कुरळ्या, केसही कुरळे होते आणि भरतकाम केलेल्या युक्रेनियन सदऱ्यावर लावलेला त्याचा नेकटाय पण कुरळाच होता. अशा माणसाला कॉलनीत कामाला पाठविले होते. त्याला आमच्या कामामध्ये काहीही गोडी वाटत नव्हती. अशा माणसाला डुकरांच्या घराचे काम करणाऱ्या संमिश्र तुकडीवर म्हणे पाठवायचे! मुलांच्याबरोबर कामाच्या दिवशी त्याला देखरेख करायला सोडावे लागत असे. आम्ही करीत असलेल्या कामावर त्याचा काडीमात्र विश्वास नव्हता हे काम म्हणजे अर्थहीन आहे व त्यामुळे कोणतेही प्रश्न सुटणार नाहीत अशी त्याची धारणा होती.

दुसरा नग रोडिमचिक. हा त्याच्यापेक्षाही वाईट आणि बेकार होता. त्याने या जगात उणीपुरी ३० वर्षे काढली होती. तो निरनिराळ्या खात्यांतून फिरला होता. गुन्हेगार शोधून काढणे, सहकारी पतपेढी, रेल्वे आणि शेवटी तो उन्मार्गी मुलांच्या शाळेत शिकविण्याच्या धंद्यात शिरला होता. त्याचा चेहरा म्हणजे एखाद्या जुन्या, खूप वापरून सुरकुत्या पडलेल्या थैलीसारखा व लालसर चिकट पदार्थाने रंगवल्यासारखा दिसे. त्याचे नाक चपटे आणि एका बाजूला किंचित वाकडे झालेले होते. त्याचे कान हे मोठे आणि त्याच्या डोक्याला चिकटवल्यासारखे होते. त्याचे तोंड, ओठ म्हणजे खूप उपयोग केल्याने जागोजागी फाटल्यासारखे दिसत होते.

रोडिमचिक आपल्या कुटुंबियांसकट कॉलनीत आला आणि त्याने स्वतःची एक जागा व्यापली. तो आला आणि एक आठवडाभर कॉलनीत इकडेतिकडे फिरला. त्यानंतर त्याने मला 'आपण काही महत्त्वाच्या कामासाठी कॉलनीच्या बाहेर जात आहोत' अशी



“ कठीण आणि खरखरीत
टूथ पावडरी तुमच्या
हिरड्या नि दातांना
इजा करू शकतात...”

# कोलगेट टूथ पावडरने तुमच्या दातांचे नि हिरड्यांचे संरक्षण करा — नि श्वास दुर्गंधीही थांबवा !







कोलगेट टूथ पावडर अत्यंत बारीक आणि पांढरीशुभ्र असते. तुमच्या हिरड्यांचे हळुवारपणे मालिश करीत असतानाच, तिच्यातील सौम्य तकाकीदायक द्रव्याने तुमच्या दातांवरील कीटण दूर होऊन, दात अधिक स्वच्छ व शुभ्र बनतात. कोलगेट टूथ पावडरचा विपुल फेस दातांच्या फटीत आरपार शिरतो आणि त्यामुळे दुर्गंध दूर होऊन दंतक्षय करणाऱ्या किडींचा नायनाट होतो.

**कोलगेट टूथ पावडरने तुमच्या कुटुंबियांना आधुनिक दंत संरक्षण द्या. त्यांना तिचा पेपरमिंटचा थंडगार स्वाद खचितच आवडेल.**

TP.G.30 MR

चिठ्ठी पाठवली. तीन दिवसांनी तो एका बैलगाडीच्या मागे गाय बांधून घेऊन आला. ती गाय त्याने कॉलनीच्या इतर गायींच्या बरोबर बांधायला मुलांना सांगितले. हे ऐकून आमचे शेरेसाहेबही एकदम आश्चर्यचकित झाले.

आणखीन दोन दिवसांनी रोडिमचिक माझ्याकडे एक तक्रार घेऊन आला—

‘कॉलनीमध्ये कॉलनीच्या कार्यकर्त्यांच्याबद्दल अशा तऱ्हेच्या वर्तणुकीची अपेक्षा केली नव्हती. मला वाटतं अजून ते जुने दिवस लोक विसरलेले नसावेत. मी व माझी मुलं यांनाही इतरांप्रमाणे दूध पिण्याचा अधिकार आहे. मी सरकारी दुधासाठी न थांबता माझ्या बेताच्याच कमाईतून स्वतःची एक गाय विकत घेतली आणि मी स्वतः ती कॉलनीत घेऊन आलो. या गोष्टीबद्दल खरे म्हणजे मला दोष न देता धन्यवाद दिले पाहिजेत ! याउलट माझ्या गाईला कसे वागवतात माहीत आहे ? आपल्याकडे कॉलनीत चिक्कार कडबा आहे, शिवाय आपल्याला भुसा, चणे वगैरे कमी किमतीला मिळते. सगळ्या गाईंना ते खाद्य व्यवस्थित देण्यात येते आणि माझी गाय मात्र उपाशी असते. याउलट बोलले असता मुलं मला उर्मटपणानं उत्तरं देतात—‘इथं काय प्रत्येकाची वेगळी गाय नाही !’ दुसऱ्या गाईंना दररोज स्वच्छ ठेवण्यात येतं आणि माझ्या गाईला मात्र गेल्या पाच दिवसांत पाणीसुद्धा लावलेलं नाही आणि त्यामुळं ती घाणीनं लडबडलेली आहे. याचा अर्थ असा काय की, माझ्या बायकोनं स्वतः जाऊन त्या गाईची धू पुस करावी ? तेही ती करील; परंतु मुलं तिला साफसफाई करायला फावडं-खोरं देत नाहीत. या असल्या बारीकसारीक गोष्टीत अशा तऱ्हेनं वागणूक मिळणार असेल तर मला याबाबत माझा निर्णय घ्यावा लागेल हे मी तुम्हाला आधीच सांगून ठेवतो ! मी सध्या पार्टी—सभासद नसलो म्हणून काय झालं ? मी पूर्वी पार्टी—सभासद होतो आणि माझ्या गाईला चांगली वर्तणूक मिळाली पाहिजे !’

मी त्याच्याकडे निर्विकार चेहऱ्याने पहात असताना विचार करीत होतो— ‘या माणसाला काय उत्तर द्यावं ?’

शेवटी मी म्हणालो, ‘हे पहा रोडिमकचि, मला समजत नाही की, तुमची जी गाय आहे ती स्वतःची तुमची खाजगी मालमत्ता आहे, म्हणून ती तुम्हाला इतर गाईंच्याबरोबर कशी ठेवता येईल ? शिवाय तुम्ही शिक्षक आहात हे तरी खरं की नाही ? तुम्ही अशा तऱ्हेनं वागलात तर मुलांच्यावर काय परिणाम होईल याचा कधी विचार केलात काय ?’

‘अहो, मी तुमच्याकडे काही फुकट मागत नाही. जे काही दिलं जाईल त्याचे पैसे मोजण्यास मी तयार आहे. माझ्या गाईला लागणारं खाणं मी विकत घ्यायला तयार आहे आणि मुलं माझ्या गाईसाठी जे काही काम करतील, त्यांना मी पगारही द्यायला तयार आहे. खरं तर माझ्या मुलाचं एक खेळणं चोरीला गेलं तरी मी अद्याप कुणालाही काहीही बोललो नाही आणि मला पक्कं माहीत आहे की, ते खेळणं कॉलनीतल्या मुलांनीच चोरलेलं आहे !’

मी त्याला सरळ शेरेंकडे पाठवून दिले. शेरेंनी काही न बोलता रोडिमचिकची गाय सरळ गोठ्याच्या बाहेर घालविली. काही दिवसांनी ती गाय कुठे तरी नाहीशी झाली. बहुधा रोडिमचिकनं ती

विकली असावी.

दोन आठवड्यांनंतर वोल्कोवने आमच्या जनरल सभेत एक प्रश्न उपस्थित केला, 'रोडिमचिक कोणाला विचारून कॉलनीच्या सार्वजनिक शेतातून बटाटे काढतात ? आम्हाला खायला बटाटे मिळत नाहीत आणि रोडिमचिक मात्र दररोज ते खाऊ शकतात ! त्यांना असं करण्याचा काय अधिकार आहे ?'

इतर मुलांनी वोल्कोवच्या म्हणण्याला पाठिंबा दिला.

झादारोव्ह उठून म्हणाला, 'बटाटे घेतले म्हणून काही बिघडत नाही. कारण त्याच्यावर त्याचं कुटुंब अवलंबून आहे. तरीही त्यानं विचारलं असतं तरी आम्ही नाही म्हटलं नसतं; पण खरोखरच, या रोडिमचिकचा काय उपयोग आहे ? हा दिवसभर खोलीत बसून रहातो किंवा शेजारच्या गावात निघून जातो. मुलं सारा वेळभर घाणेरडी असतात आणि एखाद्या जनवरासारखी रहातात. तुम्ही कामाचा अहवाल घेऊन सही घेण्यासाठी कधीही गेलात तरी हा जागेवर सापडत नाही. एक तर तो झोपलेला असतो, जेवत तरी असतो किंवा कशात तरी गुंतलेला असतो आणि तुम्हाला ताटकळत ठेवतो. अशा माणसाचा काय उपयोग ?'

तारानेट म्हणाला, 'शिक्षकमंडळींनी कसं काम करावं ते आम्ही जाणतो. हे रोडिमचिकसाहेब आमच्या संमिश्र तुकडीबरोबर कामासाठी जातात. थोडा वेळ काम करून सांगतात की, 'मला थोडा वेळ बाहेर जाऊन आलंच पाहिजे !' आणि चक्क दोन तासांनी हे सद्गृहस्थ शेजारच्या गावातून येताना दिसतात. त्यांच्या हातात गावातून त्यांच्या कुटुंबियांसाठी पिशवीतून काही तरी आणलेलं असतं.'

'रोडिमचिकची मी बरोबर दखल घेतो !' असे मी मुलांसमोर कबूल केले. दुसऱ्या दिवशी मी रोडिमचिकला माझ्या ऑफिसात बोलावले. तो आरामात संध्याकाळी माझ्याकडे आला. आम्ही दोघेच असताना मी त्याला फैलावर घेतले. तो रागाने लाल झाला आणि मध्येच म्हणाला,

'हे सारं कारस्थान कुणाचं आहे त्याची मला चांगली कल्पना आहे. माझ्याविरुद्ध तो जर्मन आहे हेही मला चांगलं माहीत आहे. डायरेक्टरसाहेब, तो मनुष्य कसा आहे याची तुम्ही नीट चौकशी करा ! पैसे देऊनही माझ्या गाईला चारा मिळत नव्हता आणि मी शेवटी गाय विकून टाकाली. माझी मुलं दुधावाचून रहातात आणि म्हणून मला शेजारच्या गावातनं दूध विकत आणावं लागतं. शेरे आपल्या मिलार्ड कुत्रीला खायला काय घालतो त्याची जरा चौकशी करा ! तो तिला काय खायला घालतो माहीत आहे का ? तो कोंबड्यांना घालायचं खाद्य तिला घालतो. तो स्वतः ते शिजवतो आणि आपल्या कुत्रीला खायला घालतो. याबद्दल एक कपर्दीकही देत नाही. त्याची कुत्री कॉलनीच्या अन्नावर जगते आहे आणि याचं कारण तुमचा त्यांच्यावर जबरदस्त विश्वास आहे, म्हणून तो या साऱ्या गोष्टी फुकट घेतो ! तो एक शेतकीतज्ज्ञ आहे आणि तुमच्या विश्वासातला आहे हेच त्याचं खरं कारण आहे !'

'हे सारं तुला कसं माहीत ?' मी विचारले.

'मी असल्या गोष्टी पुराव्याशिवाय बोलत नसतो मला तुम्ही असातसा समजू नका ! हा पहा माझ्या हातात पुरावा ! 'असं म्हणून त्याने एक कागदाचे पुडके आपल्या खिशातून बाहेर काढले ! त्या पुडीमध्ये काही तरी काळसर पांढरट असा एक चमत्कारिक पदार्थ होता.

'हे काय आहे ?' मी आश्चर्याने विचारले.

'हे ना ? ही मिलार्ड कुत्र्याची विष्ठा आहे. समजलं का ? मी खूप प्रयत्न करून ही मिळवली. यामध्ये निव्वळ बाजरी आहे. ही बाजरी काय तो विकत घेतो असं वाटलं तुम्हाला ? तसं मुळीच नाही ! मी तो चक्क मुलांच्या कोठीतून घेतो !

'हे पहा रोडिमचिक, तुम्ही कॉलनी सोडून जावं हेच बरं !'

'सोडून जा याचा अर्थ काय ?'

'याचा अर्थ स्पष्ट आहे ! जितक्या लवकर जाता येईल तितक्या लवकर तुम्ही जावं ! मी तुम्हाला सोडून देण्याचा हुकूम आजच देतो. तुम्ही आपला राजीनामा स्वखुषीनं आजच सादर करावा हे जास्त बरं !'

'मी असा सहजासहजी जाणार नाही !'

'ठीक आहे. मग मी तुम्हाला ताबडतोब कॉलनी सोडण्याचा हुकूम करतो !'

रोडिमचिक् माझ्या खोलीतून रागारागाने निघून गेला. तीन दिवसांनी तो कॉलनी सोडून कायमचा निघून गेला !

नव्या कॉलनीत काय करावे ते समजेना. ट्रेपकेवाडीतले रहिवासी बिघडायला लागलेले होते आणि ही गोष्ट सहन करणे कठीणच होते. तिथे आपापसात सारख्या मारामाऱ्या होऊ लागल्या होत्या. कॉलनीत होणाऱ्या सामानाच्या चोऱ्या वाढल्या होत्या आणि खरोखरच सामुदायिकात काही तरी फार मोठा बिघाड झाल्याचे स्पष्ट दिसत होते.

खरीखुरी प्रामाणिक माणसे असले काम करायला कुठून मिळवायची हा एक मोठा प्रश्न मला भेडसावीत होता.

(क्रमशः)


**तीन राजहंस प्रकाशने**

**आणि ड्रॅगन जागा झाला**

अरुण साधू । चवदा रुपये

**फिडेल, चे आणि क्रांती**

अरुण साधू । सात रुपये

**पूर्णिया**

अनिल अवचट । सहा रुपये

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

स्वतंत्र ऑफिस बांधून देण्यात आले आहे. तीनही प्रॉजेक्टस्ची कामे एकदम सुरू करून दहा महिन्यांत संपवण्याचा त्यांचा करार होता, त्यामध्ये त्यांना अपयश आले आहे. म्हणजे Consultancy Firm नेमूनसुद्धा कामाच्या वेगात अपेक्षित वाढ झालेली नाही.

कारखान्याच्या करारातच नवीन फॉर्म्युलेशन विभागाच्या बांधकामाचे काम एका दुसऱ्या सल्लागार कंपनीकडे सोपवण्यात आले आहे. Consultancy Firms मार्फत काम करून घेण्यानेही बांधकामाचा दर १० ते १५ टक्क्यांनी वाढतो. त्याचप्रमाणे कामाचे टेंडर मान्य करण्याची प्रक्रिया गुप्त ठेवली व टेंडर मान्य करण्याचे काम वाटाघाटीने केले तर आणखी ३० टक्क्यापर्यन्त भाव वाढू शकतात. कंपनीचे स्वतःचे इंजिनिअरिंग खाते असताना सल्लागार कंपन्या नेमण्याचा निर्णय निश्चितच कंपनीच्या हिताचा नाही. आर्थिक संकटात असलेल्या उद्योगाने तर हा मार्ग निश्चितपणे टाळणे जरूर होते. प्लँटची उभारणी परगावी असती तर सल्लागार कंपन्या नेमण्याचे समर्थन करता आले असते. सल्लागार कंपन्यांच्या नेमणुकींनी काटकसरही झाली नाही व कामाचा वेगही वाढला नाही.

श्री. स्वामीनाथन संचालक झाल्यानंतरही बांधकामात मोठ्या प्रमाणावर लोखंडाचा (तुळया व खांब लोखंडी असलेले) (Steel Framed Structure) वापर केला जात आहे. अशा प्रकारचे काम आता कालबाह्य झाले आहे. ते अधिक खर्चाचे असते व देशातील अपुऱ्या असलेल्या लोखंडाच्या साठ्याचा हा गैरवापर आहे. विशेष म्हणजे या औषधी कारखान्यातील हवेत अनेक रासायनिक द्रव्ये असतात, त्यांचा परिणाम या लोखंडी फ्रेमवर फार होतो व अशा डोलाऱ्याचे आयुष्यही कमी होते. पण कोणत्याही विषयाच्या तांत्रिक बाजूबाबत आपणास कुणीही सल्ला देण्याची जरूर नाही, अशी संचालकांची मनोधारणा असल्याने ते बजावतील ते हुकुम इंजिनिअर मुकाट्याने अमलात आणीत आहेत. संचालक तीन वर्षांनी जातील व इंजिनिअर १० ते १५ वर्षांनी जातील. भविष्याची चिंता करण्याचे कुणालाच प्रयोजन वाटत नाही.

कारखान्यास तोटा होत आहे, यासाठी अधिक काम करा, ओव्हर टाइम बंद करा, अनावश्यक खर्चात काटकसर करा असा उपदेश चालू असताना, खर्चिक बांधकामाचा झपाटा चालूच आहे. बांधकामावरील अफाट खर्चामुळे आर्थिक अडचणींचा डांगोरा प्रचारी वाटतो, हे संचालकांच्या ध्यानात येत नसावे, हे पटत नाही. उदाहरणच द्यायचे तर, सेंट्रल सिक्युरिटी फोर्ससाठी, स्वतंत्र वसाहत बांधण्यासाठी पंधरा लाख रुपये खर्च केले नसते तरी चालले असते. सिक्युरिटी फोर्सचे जवान तीन-चार वर्षे वसाहतीतील होस्टेलमध्ये रहातच आहेत. कंपनीची आर्थिक स्थिती सुधारेपर्यंत आणखी एक दोन वर्षे ते होस्टेलमध्येच राहिले असते तर काहीही बिघडले नसते.

जनरल मॅनेजर श्री. धारपुरे सध्या एका बंगल्यात रहातच आहेत. त्यांना मोठा बंगला मिळावा म्हणून ऑफिसर्स क्लबची नवी इमारत बांधली व पूर्वी क्लब होता त्या इमारतीत फेरबदल करून जनरल मॅनेजरसाठी बंगला तयार केला जात आहे या कामासाठी एक लाख रुपये खर्च करणेही आवश्यक नव्हते. अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. लक्षात घेण्याचा मुद्दा म्हणजे काटकसरीसाठी बांधकामावरचा खर्च कमी करण्याचे यांना सुचत नाही.

रिसर्च विभाग हा इथला एक स्वतंत्र विषयच आहे. नवीन संचालक श्री. स्वामीनाथन यांनी या विभागाचे वर्णन White Elephant असे केले होते. एका अर्थाने ते खरेच होते. कारण गेल्या २५ वर्षांत इथे कोणत्याही प्रकारचे सांगण्यासारखे संशोधन झालेले नाही. औषध उत्पादनाचे बाबतीत संशोधनाचे स्थूल मानाने तीन प्रकार पाडता येतात.

१ : Fundamental Research – मूलभूत संशोधन म्हणजे एखादे नवीन औषध शोधणे

२ : Formulation Research – औषधांच्या निरनिराळ्या मिश्रणांनी गोळ्या, सायरप, कॅपस्युल्स् बनविणे.

३ : Developmental Research–एखाद्या औषध निर्मितीच्या प्रक्रियेत सुधारणा करणे.

या तीनही प्रकारच्या संशोधनात इथल्या प्रयोगशाळेने उल्लेखनीय अशी कोणतीही कामगिरी केलेली नाही.

हेमायसिन हे नवीन औषध शोधले. औषधाच्या गुणवत्तेबद्दल डॉक्टरी व्यवसायातील सर्व जण प्रशंसा करतात; परंतु हेमायसिनचे उत्पादन काही तांत्रिक अडचणीमुळे बंद केले आहे. तसेच 6 APA पासून ॲंपिसिलीन बनवण्याची प्रक्रियाही इथे शोधली होती. त्याचेही उत्पादन आता बंद आहे.

फार्म्युलेशन रिसर्च इथे जवळजवळ केले जातच नाही. त्यामुळे सुरुवातीपासून ज्या गोळ्या, इंजेक्शन्स बनतात तीच आजतागायत बनवली जातात.

## तंत्रज्ञानाची आयात

डेव्हलपमेंटल रिसर्चही नाहीच. यामुळेच पेनिसिलिन व स्ट्रेप्टोमायसिनचा स्ट्रेन दुसऱ्या औषधकंपनीकडून घ्यावा लागला. पंचवीस वर्षे औषध-उत्पादनाच्या उद्योगात असताना या कारखान्याने दुसऱ्यांना तंत्रज्ञान पुरवले पाहिजे. त्याऐवजी अजून या कारखान्यास बाहेरून तंत्रज्ञान आणावे लागणे हाच रिसर्चच्या अपयशाचा पुरावा आहे. इथे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शास्त्रज्ञ होते; परंतु कारखान्यास उपयोगी संशोधन नव्हते.

परंतु अचानकपणे या विभागावर संचालकांची मर्जी बसल्यासारखे दिसते. त्यामुळे गेल्या काही महिन्यांत लाखो रुपयांची यंत्रसामुग्री संशोधन-विभागासाठी आणली आहे. त्याचा उपयोग किती होईल याची शंकाच आहे. स्ट्रेप्टोमायसिनचा अधिक क्षमतेचा स्ट्रेन (Strain) सांभाळून त्याची जोपासना करण्यासाठी सुसज्ज केलेली लॅबोरेटरी सुमारे वर्षभर कुणीही वापरली नाही. ॲंपिसिलिनचे ३० टन क्षमतेचे प्लँट बंद केले. त्यासाठीही रिसर्च विभागालाच जबाबदार धरावे लागेल.

जेंटामायसिन या नवीन औषधाच्या उत्पादनासाठी हंगेरीकडून

तंत्रज्ञान घेण्याचा करार झाला आहे; खरं म्हणजे जेंटामायसिनच्या उत्पादनासाठी आवश्यक ते सर्व तंत्रज्ञान देशातच उपलब्ध आहे व औषधउत्पादकांना याची माहितीसुद्धा आहे.

त्याचप्रमाणे स्ट्रेप्टोमायसिन व पेनिसिलिन या दोन औषधांच्या उत्पादनात झालेली वाढ टिकून का राहिली नाही ?

श्री. स्वामीनाथन यांना संचालकपदाची सूत्रे घेऊन दीड वर्ष झाले तरी व्हिटॅमिन सीचे उत्पादन का सुरू झाले नाही ?

टेट्रॅसायक्लिनच्या कॅपस्युल्स संरक्षण विभागाने मोठ्या प्रमाणावर परत का केल्या ?

कोणत्याही विषयाबाबत निर्णयाचा सर्वाधिकार स्वतःकडेच ठेवणाऱ्या संचालक व जनरल मॅनेजर या दोघांनाच या सर्व आघाड्यांवरील अपयशाची जबाबदारी स्वीकारावी लागेल.

सरकारी उद्योगांच्या व्यवहारावर लक्ष ठेवून, तो सुधारण्यासाठी वेळोवेळी सूचना देण्याचे काम ब्यूरो ऑफ पब्लिक एंटरप्राइज ही संस्था करते व सरकारी उद्योगांनी आदरातिथ्यावरचा (Entertainment) खर्च कमी करावा व वरिष्ठ अधिकाऱ्यांना मिळणाऱ्या सोयी व सवलतीत वाढ करू नये असा सल्ला ब्यूरोने दिला. त्यानंतर कंपनीच्या हिशेबाच्या पुस्तकातून Entertainment वरील खर्च जवळ जवळ अदृश्य होण्याची किमया इथे घडून आली. खर्च प्रत्यक्षात कमी केला असे नव्हे तर तो अदृश्य झाला एवढेच. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सवलती कमी करण्याऐवजी, संचालकांच्या मर्जीतील जनरल मॅनेजरांना कंपनीची गाडी, ड्रायव्हर व पेट्रोल आठवड्यातून दोन दिवस फुकट मिळावे अशा प्रकारच्या आज्ञा दिल्या गेल्या. अशा प्रकारे ब्यूरोच्या सहाय्याची वासलात लावण्यात आली.

कारखान्याची आर्थिक स्थिती बिकट आहे व आर्थिक मदत न दिल्यास अत्यावश्यक औषधांचा देशातील पुरवठा बंद पडेल अशी भीती दाखवून सरकारकडून वेळोवेळी आर्थिक मदत घेतली जाते. अशा प्रकारे सरकारने (नव्या प्रॉजेक्टसाठी) दिलेले भांडवल, कंपनीच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी वापरले जाते. त्याच वेळी बँकेकडून कर्ज मिळण्याच्या सवलतीचा पुरेपूर वापर केला जातो. कर्ज मागताना बँकेला कारखान्याच्या उज्ज्वल भवितव्याचे आकर्षक वर्णन केले जाते. या कारखान्यास मिळणाऱ्या कर्जपुरवठ्याची मर्यादा केव्हाच संपली आहे. ही मर्यादा वाढवून मिळावी म्हणून, रिझर्व्ह बँकेकडे, स्टेट बँकेने अर्ज केला आहे म्हणे. तोट्यात चालणाऱ्या कंपनीच्या आर्थिक अडचणी जेवढ्या वाढतील तेवढा स्टेट बँकेचा धंदा व पर्यायाने फायदा वाढतो. एका सरकारी उद्योगाच्या अकार्यक्षमतेवर, दुसऱ्या सरकारी उद्योगाची भरभराट अवलंबून असल्याचे असे हे मजेदार उदाहरण आहे.

परदेशी प्रवासाला इथे काहीही मर्यादा नसाव्यात असे दिसते. पेनिसिलिनच्या उत्पादनासंबंधात जपानशी करार झाला श्री. चारी यांच्या काळात. तरीही नवीन संचालक व जनरल मॅनेजर दोघेही जपान-प्रवास करून आले; परंतु हंगेरीशी जेंटामायसिन उत्पादनाबाबत करार होण्यापूर्वीच श्री. स्वामीनाथन हंगेरीस भेट देऊन आले. त्याच कामासाठी कंपनीतील वरिष्ठ अधिकारी हंगेरीचा आठ दिवसांचा दौरा करून आले. हंगेरीतील भाषासुद्धा न येणारे हे चारही अधिकारी आठ दिवसांत तिथे काय शिकले असतील हे फक्त त्यांच्या दौऱ्यास संमती देणारे संचालकच सांगू शकतील ! गेल्या महिन्यात संचालकांचा पुन्हा युरोपचा दौरा झाला. काटकसरीचा पदोपदी उद्घोष करीत असताना अशा दौऱ्यांनी काटकसरीस पोषक वातावरण निर्मित होत नाही, याची तरी संचालकांनी दखल घेणे आवश्यक होते.

संचालकांजवळ व्यवस्थापनातील अनेक कला आहेत हे मात्र मान्य करावेच लागेल. प्रथमतः तोट्यात चालणाऱ्या या उद्योगाची प्रतिमा उजळण्यासाठी एका जाहिरात कंपनीची नियुक्ती करण्यात आली. कामगारांशी सतत करावयाच्या संघर्षासाठी एका व्यवस्थापन सल्लागारांची नेमणूक करण्यात आली. खर्चाची काही खाती गुप्त या सदरात घालण्यात आली आहेत, त्याप्रमाणे वरील दोन खात्यांवरील खर्च अदृश्य केला आहे; परंतु काही वेळा जाहिरातबाजीचे हसू होते, तसे उदाहरण अलीकडेच घडले. या कारखान्यातील रिसर्च विभागातून एक परदेशाहून आयात केलेले, ५-६ लाख रुपये किमतीचे यंत्र गहाळ झाले. कामगार संघटनेने हा प्रश्न वेळोवेळी उपस्थित केला. यंत्राची चोरी झाली की काय, अशी शंकाही व्यक्त केली जात होती. अगदी अलीकडेच, सध्याच्या संचालकांच्या काळात हे यंत्र परत आणण्यात यश लाभले आहे. प्रसिद्धी विभागाने या घटनेला एक पत्रक काढून खूपच प्रसिद्धी दिली. तथाकथित चोरीस गेलेले यंत्र परत मिळाले म्हणून सर्वांना खूप आनंद व्हावा ही अपेक्षाही या प्रसिद्धी-पत्रात व्यक्त केली होती; पण सत्य समाधान मानण्यासारखे आहे काय ? हे यंत्र दुरुस्तीसाठी बंगलोरला पाठवले होते व ते सापडले अहमदाबादमध्ये, हा चमत्कारच मानावा लागेल. विशेष म्हणजे दुरुस्तीस गेलेले यंत्र परत न येता, त्याचा नुसता सांगाडाच—जो कधीही दुरुस्त होणे शक्य नाही—परत आला आहे. या गोष्टीची जाहिरात करण्यासारखे काय आहे ?

श्री. स्वामीनाथन एखादी कृती करतात तेव्हा पूर्ण विचार करतात की नाही, याची शंका वाटते. डिसेंबर महिन्यात कारखान्यात संप झाला, तो मिथेनॉल चोरी-प्रकरणाशी संबंधित तीन कामगारांना तडकाफडकी कामावरून काढल्यामुळे ! परंतु कित्येक दिवस चालू असलेल्या मिथेनॉल अपहरण-प्रकरणात फक्त कामगारच दोषी धरले जावेत परंतु संबंधित खात्यातील कोणाही अधिकाऱ्यांवर कसली जबाबदारी येऊ नये, याचे स्पष्टीकरण संचालकांनी काय दिले आहे कुणास ठाऊक !

श्री. स्वामीनाथन संचालकपदावर रुजू झाले त्याला दीड वर्षाहून अधिक काळ लोटला. त्यांच्या तडफदारपणावर (Dynamism) खूष असणाऱ्यांनाही त्यांच्या यशापयशाचे मूल्यमापन केले पाहिजे, असे वाटू लागले आहे. कारखान्याची आर्थिक स्थिती सुधारण्याऐवजी ती झपाट्याने बिघडत आहे असे दिसत आहे. सारांशरूपाने सांगायचे तर, या काळात बांधकाम व इतर खर्चात बेसुमार वाढ

## आदरातिथ्यावरील खर्च कमी झाला नाही, जवळ जवळ अदृश्यच झाला !

झाली आहे. नवीन अधिकाऱ्यांची बेसुमार भरती झाली आहे. औषध-उत्पादनाचे दोन विभाग पूर्णपणे बंद पडले आहेत. कामगार संघटनांशी संबंध तणावपूर्ण आहेत. अर्थपूर्ण व निर्णायक बोलणी न करण्याचे तंत्र हुशारीने वापरले जात आहे. कामगार-पुढारी व कामगार वर्ग यांच्यातही अविश्वास निर्माण झालेला आहे. इथल्या आर्थिक संकटांबद्दलची जबाबदारी संपूर्णपणे कामगार व जुन्या अधिकाऱ्यांवर टाकण्याचे निदानसुद्धा चूक होते, हेही आता सिद्ध झाले आहे. यामुळे जनता सरकारच्या औद्योगिक व कामगारविषयक धोरणाची पायमल्ली होत आहे व याची दखल घेण्यास संबंधित मंत्रालयास वेळ नाही, हे आणखीनच दुर्दैव !

व्यवस्थापनच्या नवीन तंत्रास अनुसरून रोज नवनव्या शिक्षण-योजना आखल्या जात आहेत; परंतु तेथेसुद्धा देखाव्याचा (outer form) आग्रह आहे. Employee Counselling म्हणजे कामगाराला त्याच्या अडचणीत सल्ला देण्याची योजना आधुनिक व्यवस्थापनतंत्रात महत्त्वाची मानली जाते. त्या योजनेची सुरुवात गाजावाजा करून झाली; परंतु सल्लागार म्हणून नेमणूक झालेले अधिकारी कसे आहेत? तर ज्यांच्यावर कामगारांचा बिलकूल विश्वास नाही. कारण या व्यक्तीने आजपर्यंत, कामगारावर शिस्त-भंगाचा इलाज करणे, चार्जशीट भरणे, खातेनिहाय चौकशी करणे याशिवाय दुसरे काहीही काम केलेले नाही. म्हणजे मूळ योजना चांगली, परंतु यांची हाताळणी वाईट असे होते.

प्रत्येक वेळी नवे संचालक आले की, नव्या आशा फुलवायच्या, थोड्याच काळात भ्रमनिरास झाला की, संचालक बदलून जावे म्हणून वाट पाहायची, नव्यापेक्षा पूर्वीचा बरा म्हणायचे व प्रामाणिकपणे नव्हे तर, बरोबर नियमात बसेल तेवढेच व तसेच काम करीत राहायचे, याशिवाय सामान्य कामगारास काहीही करता येत नाही. आगामी संकटाची चाहूल लागली तरी, त्याची दखल व्यवस्थापनास नको असल्यामुळे गप्प बसण्याशिवाय दुसरे काहीच करता येत नाही. म्हणून संकटाचे पूर्ण ग्रहण लागण्यापूर्वी, संबंधित मंत्र्यांनी हस्तक्षेप करावा म्हणून मनोमन प्रार्थना करणे, हाच एकमेव मार्ग कामगारांना मोकळा आहे. खरे म्हणजे नवीन संचालक आले की, त्यांनी जुन्या लोकांना, कारभाराला नावे ठेवायची, पूर्वी घेतलेले निर्णय चुकीचे होते अशी हाकाटी करायची, स्वतः मन मानेल तसे निर्णय घ्यायचे, यात बदल होण्याची आवश्यकता आहे. सर्वसाधारणपणे सरकारी उद्योग त्यातील (Built-in) अंगभूत दोषांमुळे तोटयात चालतात. या दोषांचा कमीत कमी परिणाम व्हावा असे निर्णय घ्यायला पाहिजेत; परंतु त्याऐवजी या अंगभूत दोषांच्या मागे दडून, स्वतःच्या तात्कालिक अगर भविष्यकालीन हिताचे निर्णय घेतले जातात असा इथला अनुभव आहे.

वास्तविक पाहता राष्ट्रीयीकृत उद्योगात कामगार, व्यवस्थापक व नागरिक अशा तीन गटांचे हितसंबंध गुंतलेले असतात. त्यांपैकी कामगार संघटना कामगारांचे हित पाहतात. व्यवस्थापक सरकारी धोरणे अमलात आणतात व सरकारचे हित सांभाळतात असे मानले जाते; परंतु नागरिकांच्या हिताची काळजी कुणीही करीत नाही असे दिसते. त्यासाठी सरकारी उद्योगात कामगार डायरेक्टर नेमण्याची योजना पुन्हा सुरू केली पाहिजे. त्याचप्रमाणे समाजातील प्रतिष्ठित, अर्थतज्ज्ञ, व्यवस्थापनतज्ज्ञ अशा एखाद्या व्यक्तीचीही नेमणूक डायरेक्टर-बोर्डात केली पाहिजे. सरकारी उद्योगावर सध्या पार्लमेंटचे नियंत्रण आहे; परंतु ते फार दीर्घसूत्री आहे. उदाहरणार्थ, या कारखान्याने बहुराष्ट्रीय कंपनीस कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने काम दिलेले पार्लमेंटला कळायला (जागरूक खासदाराने लक्ष घातले तर) सहज ५ ते ६ महिने लागत. त्यावर उपाययोजना सुचविणे अगर झालेल्या व्यवहाराची चौकशी करण्यास आणखी ५-६ महिने जाणार. तोपर्यंत अशा निर्णयाचे परिणाम झालेले असतात.

औषध-उत्पादनाच्या सरकारी उद्योगाची खाजगी क्षेत्रातील औषध-उद्योगाशी तुलना करणेही योग्य नाही. कारण खाजगी कारखाने एक-दोनच औषधे उत्पादन करीत नाहीत. अनेक औषधे उत्पादन करतात. त्यापैकी दोन-चार औषधांत भरमसाठ नफा काढतात. त्यामुळे एक-दोन औषधे बनवणाऱ्या सरकारी उद्योगाला त्यांच्याशी कधीही स्पर्धा करता येणार नाही. त्यामुळे सरकारी औषध उद्योगाचे नफ्या-तोटयाचे साधे सरळ गणित मांडणे योग्य नाही; परंतु या उद्योगाकडून अपेक्षित सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडल्या जात असतील, तर त्याचेही मूल्यमापन करण्याचे मार्ग शोधले पाहिजेत. हिंदुस्थान अँटिबायोटिक्सने जेंटामायसिनचे उत्पादन सुरू केल्या-बरोबरे खाजगी उत्पादकांनी जेंटामायसिनच्या किंमती एकदम कमी केल्या. (पूर्वी ३२ रु. स विकले जाणारे इंजेक्शन ८ रु. स विकण्यास सुरुवात केली.) औषधाच्या किंमतीवर एकदम होणाऱ्या या परिणामाचे श्रेय या सरकारी उद्योगासच दिले पाहिजे. असे श्रेय देण्याचे तत्त्व मान्य केले तर कारखान्यास तोटा होत आहे, या कारणासाठी कामगारांना दोष देणाऱ्या व बदनाम करणाऱ्या संचालकांना सर्व प्रश्नांचा अधिक जबाबदारीने विचार करावा लागेल व त्यांच्या कामगारविरोधी चाळघांना आवरणे हे सरकारला आपले कर्तव्य मानावे लागेल.

देशात आज उद्योगांच्या राष्ट्रीयीकरणाबाबत पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली असताना, एका सरकारी उद्योगाच्या कामकाजाचा अभ्यास मार्गदर्शक ठरावा यासाठी हा प्रयत्न केला आहे. □


# टॉलस्टॉय – एक माणूस

## लेखिका : सौ. सुमति देवस्थळे

आवृत्ती दुसरी । मूल्य पंचावन्न रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

पुस्तके

# ' क्लोरोफॉर्म '

## माझं असं मत आहे....

□ २४ मार्चच्या 'माणूस'च्या अंकात 'क्लोरोफॉर्म' या डॉ. अरुण लिमये यांच्या पुस्तकावर डॉ. गोडबोले यांनी परीक्षणवजा लेख लिहिला आहे. डॉ. गोडबोले यांचा संपूर्ण लेखच अरुण लिमये यांची मूळ भूमिका (ज्याबद्दल अप्रामाणिकपणाचा आरोप लिमये यांचे शत्रूही करणार नाहीत) समजून न घेता लिहिलेला व त्यांच्यावर वैयक्तिक हल्ले करणारा आहे. अरुण लिमये यांनी डॉक्टरमंडळींची बेजबाबदार वृत्ती, लफडी व समाजातील गरीब घटकांना लुटण्याची प्रवृत्ती यांच्यावर आसूड ओढले आहेत. डॉ. गोडबोले त्यामुळे भलतेच रागावलेले दिसतात. लिमयांच्या पुस्तकामुळे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. (त्यांचा गोडबोल्यांना विचारसुद्धा नकोसा वाटत आहे — मग त्यांची उत्तरं शोधणं तर बाजूलाच राहिलं.) प्रश्न असे: एक, समाजाचे, शासनाचे प्रत्येक डॉक्टर निर्माण करण्यासाठी जे लाख-दीड लाख रुपये खर्च होतात त्यांची फेड गोडबोल्यांसारखे डॉक्टर कशी करणार आहेत — करतात? दोन, डॉ. गोडबोल्यांसारखे (ते स्वतः नव्हेत) लोक जेव्हा ते स्वतः शिक्षण घेत होते तेव्हाची 'गरीब' परिस्थिती विसरून डॉक्टरकीचा धंदा करायला लागले की, पेशंटस्‌ना का लुबाडतात? तीन, डॉक्टरी धंद्यातील अपप्रवृत्तींचा नायनाट करण्यासाठी डॉक्टरांनी सेवाभावाने धंदा करावा. असा उपदेश करून मोकळे होणारे डॉक्टर गोडबोले असल्या उपदेशामागची ढोंगबाजी कशी विसरतात? डॉ. लिमये यांनी अयोग्य मार्गाने पैसा मिळवला; पण त्यांना आता पश्चात्ताप होत आहे व समाजाचे ऋण फेडण्यासाठी व वरील प्रकारच्या प्रश्नांची सोडवणूक व्हावी यासाठी लिमये यांना राजकीय पक्षाच्या चौकटीत काम करावेसे वाटले तर तो पलायनवाद हा जावईशोध डॉ. गोडबोलेच लावू शकतात. इतर मार्गांनी हे प्रश्न सोडवता येतील असं जर डॉ. गोडबोले यांना वाटत असेल तर त्यांनी एखादे चांगले पुस्तक लिहावे. त्यांचे प्रामाणिक अनुभव विचारात घेऊन ग्रंथाली-सारखी संस्था त्यांचे पुस्तक अवश्य प्रकाशित करील असा मला विश्वास वाटतो.

डॉ. गोडबोले यांना जे 'गॉसिप' वाटले, लफडी — कुलंगडी बाहेर काढणे हा धंदा वाटतो तो सुदैवाने चोखंदळ मराठी वाचकांना (यात संपादकमहाशय, आपणही आहात) तसा वाटत नाही. डॉ. गोडबोले यांनी आपल्या साहित्यिक-मित्रांकडून 'ललित' मासिकाचा मार्च महिन्याचा अंक जरूर मागून घ्यावा व त्यातील वाचकांची आवड पहावी, म्हणजे त्यांनी अरुण लिमयांवर केलेला हल्ला किती कमरेखालचा होता, 'चीप' होता, हे समजेल. लेख लिहिण्यापूर्वी त्यांना ते कळले असते तर मग मला तरी प्रपंच कशाला करावा लागला असता?

२५ मार्च — **नरेंद्र आपटे**, कोंभा, मडगाव

□ श्री. नरेंद्र आपटे यांचे पत्र वाचले. माझ्या परीक्षणाबाबत त्यांनी जे काही वाद-ग्रस्त मुद्दे उपस्थित केले आहेत त्याबद्दल माझी मते या ठिकाणी मांडत आहे.

१: माझ्या परीक्षणात मी वैद्यकीय व्यवसायात अपप्रवृत्ती नाहीत, असे कुठेही म्हणालेलो नाही. उलट त्या वाढतच आहेत आणि हीच चिंतेची बाब आहे, या डॉ. अरुण लिमयांच्या मूळ आशयाला माझाही पाठिंबा आहे. फक्त या अपप्रवृत्तीचा बळी झालेल्या डॉ. लिमयांनाही या प्रवृत्तीवर लिहिण्याचा काय अधिकार पोचतो, हो माझी शंका आहे. लिमयांनी या व्यवसायावर ओढलेल्या आसुडांबद्दल मला व्यक्तिशः काहीही राग नाही. कारण मी माझ्या व्यवसायातून कधीही exploitation केलेले नाही. मला खटकते ते हेच की, या व्यवसायातील अपप्रवृत्तींचा शोध घेताना लिमयांना कुठे काही चांगले आढळते की नाही? आणि आढळत असले तर अपप्रवृत्तीने वागणाऱ्यांना चांगल्या मार्गाकडे खेचण्यासाठी त्याचा काही उपयोग होणार नाही का? 'हसत-खेळत वाचा' य 'लाइट नर्व्ह'ने लिमयांनी सारे लिखाण केल्यामुळे या विषयाचे गांभीर्यच कमी झालेले आहे आणि विशेष म्हणजे, या अपप्रवृत्तींना आळा घालता येईल का, याची साधी चर्चासुद्धा पुस्तकात कुठेही केलेली नाही.

२: या व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण करून हा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करता येईल; पण त्यातून मोठ्या प्रमाणावरची दुसरी 'कामगार विमा योजना'च निर्माण होण्याचा सुप्त धोका आहे. इंग्लंडमध्ये लॉर्ड बेव्हेन आरोग्यमंत्री असताना तिथे सुरू झालेली 'राष्ट्रीय वैद्यकीय सेवा' निराशाजनक ठरली आहे. दर डॉक्टरमागे खर्च झालेल्या लाख—दीड लाखाचा विचार करायचा झाला तर वैद्यकीय शिक्षण घेऊन नंतर थोड्याच काळात नाट्य, सिनेमा, साहित्य इत्यादी क्षेत्रात शिरलेल्या डॉक्टरमंडळींकडून या रकमेची समाजाला परतफेड कशी होते? वैद्यकीय शिक्षण घेऊन विवाहानंतर काहीही वैद्यकीय व्यवसाय अथवा त्या क्षेत्रातील नोकरीही न करणाऱ्या अनेक स्त्री-डॉक्टर आहेत. त्यांच्याकडूनही समाजाच्या पैशाची परतफेड कशी होते? आणि विशेष म्हणजे वैद्यकीय शिक्षणासाठी जागा मर्यादित असल्यामुळे आपल्या वैद्यकीय ज्ञानाचा उपयोग न करणाऱ्या या मंडळींनी दुसऱ्या कोणाची तरी 'जागा' कायमची अडवलेली असते.

३: ज्यांना लहानपणीच गरिबीची झळ लागली असेल त्या व्यक्ती समाजाला मदत करण्यास प्रवृत्त होतात. फक्त त्याची प्रसिद्धी होत नाही.

४: वैद्यकीय व्यवसायात 'समाजप्रबोधन' सुरू होण्यासाठी कमीत कमी काय व्हायला पाहिजे, यासंबंधी मी कोणताही उपदेश माझ्या परीक्षणात केलेला नाही. उपदेश करणे हा फक्त प्रचलित राजकारण्यांचा 'राखीव हक्क' आहे, असे मला वाटते. उपदेशाच्या ढोंगबाजीबद्दल बोलायचे झाले तर वैद्यकीय व्यावसायिकांना समाजसेवेचा उपदेश करणाऱ्यांनी आपण स्वतः समाजाची काही तरी सेवा करतो का, असा प्रश्न स्वतःलाच विचारल्यास (बहुतेकांच्या बाबतीत याचे प्रामाणिक उत्तर 'नाही' असेच येईल.) उपदेशाची ढोंगबाजी खरे कोण करते हे उघड होईल.

५ : दुसऱ्या महायुद्धानंतर आपल्या समाजाची पातळी सर्व बाजूंनी इतकी खाली जात आहे की, वैद्यक, शिक्षक, वृत्तपत्रव्यवसाय असे कुठलेही क्षेत्र आता शिल्लक राहिलेले नाही की ज्या ठिकाणी भ्रष्टाचार माजलेला नाही. स्वातंत्र्योत्तर काळात तर राजकीय भ्रष्टाचार पराकोटीला गेलेला आहे. राजकीय भ्रष्टाचार हीच सर्व भ्रष्टाचाराची व अन्यायांची जननी ठरली आहे. अशा राजकीय चौकटीत राहून हा व्यवसाय सुधारता येईल, असे श्री. आपटे यांना कसे वाटते हेच उमजत नाही. कायदे करून हा व्यवसाय सुधारण्याचा प्रयत्न केल्यास या व्यवसायातील चतुर लोक त्यातूनही पळवाटा काढतील. केंद्रीय व राज्यपातळीवरील विविध पक्षीय कार्यकर्त्यांशी आणि पुढाऱ्यांशी त्यांचे लागेबांधे असतातच, त्यामुळे 'राजकीय चौकटी'चाच उपयोग करून ते अशा पळवाटा काढण्याचा संभव जास्त आहे.

६ : माझे लेखन फक्त पुस्तकातील विधानांशी आणि विचारांशी संबंधित आहे. अरुण लिमयांवर कोणतीही व्यक्तिगत टीका करण्याचा वा घाव घालण्याचा पुसटसादेखील विचार माझ्या मनात नाही, तिथे कमरेखालचा वार तर दूरच राहतो. मुळात डॉ. लिमयांचे आणि माझे काहीही शत्रुत्व नाही. इतर पुस्तकं-मासिकांमधल्या परीक्षणांपासून व चर्चांपासून दूर राहून मी माझे वैयक्तिक विचार मांडलेले आहेत. ते सर्वांना पटावेत किंवा पटतीलच असा माझा आग्रह नाही; पण सूज्ञ वाचकवर्ग माझे विचार स्पष्टपणे मांडण्याचा माझा हक्कही मान्य करीलच.

भ्रष्टाचाराने ग्रासलेल्या या निराशामय वातावरणात Where the sky is torn, try to stich the part just above your head, या तत्त्वाचाच पाठपुरावा करणे हाती उरते.

३ एप्रिल डॉ. मु. कृ. गोडबोले, पुणे

मुक्काम पुणे

## नाजूक, नेटकं निसर्ग चित्रण

निसर्गचित्रं रंगविणं हा चित्रकलेतील एक प्रकार. तासअन्तास निसर्गात बसून आपल्याला आवडलेलं दृश्य चितारणं, रंगविणं म्हणजे निसर्गचित्रण, असा एक साधा सोपा अर्थ अनेकांना ठाऊक आहे; परंतु याहीपेक्षा वेगळा विचार असू शकतो हे एका देखण्या चित्रप्रदर्शनानं नुकतंच दाखवून दिलं. प्रा. मिलिंद फडके यांच्या नयनरम्य निसर्गचित्रांचं प्रदर्शन पुण्याच्या बालगंधर्व कलादालनात भरलं होतं. देखणं, लोभस असं त्या प्रदर्शनाचं वर्णन करता येईल.

प्रदर्शनातील बहुतांशी चित्रं एका वेगळ्या, नव्या विचारातून साकार झाली होती. निसर्गात फिरत असताना, आवडणाऱ्या दृश्यांच्या बारकाव्यांची नोंद घेणं, काही केवळ डोळ्यांत साठवणं आणि आपल्या घरी परतल्यावर उत्कृष्ट चित्रनिर्मिती करण्याच्या दृष्टीनं त्यांची फेरमांडणी करणं, रंगछटांची तीव्रता-सौम्यता यथा योग्य ठेवणं, अनावश्यक गोष्टी टाळून आवश्यक त्याची छोटीशी भर घालणं हा फडके यांचा नवा विचार प्रकर्षानं जाणवला. या नव्या संपन्न विचारांतून साकार झालेली ३४-३५ चित्रं अर्थपूर्ण वाटली. तसं पाहिलं तर चित्रांचे आकार फार मोठे, अवाढव्य नव्हते. आटोपशीर, लहान खोलीच्या भिंतीवर टांगता येतील असेच होते. उत्कृष्ट कलाकृतीचा दर्जा आकारावर थोडाच ठरतो? चित्राचा दर्जा ठरतो तो त्याची रचना, रेखाटन, रंगसंगती, विषय आणि एकूण परिणाम या गोष्टींवर. फडके यांची निसर्गचित्रं उत्तम दर्जाला उतरली होती.

### जलरंगांवर हुकमत

मिलिंद फडके यांचं पुण्यातलं हे तिसरं चित्रप्रदर्शन. जलरंगासारखं अवघड, कौशल्यानं हाताळावं लागणारं माध्यम, सहजतेनं, नाजूक पद्धतीनं हाताळणं ही फडके यांची विशेषता याही प्रदर्शनात जाणवली. अत्यंत हळुवार रंगछटांची पसरण एका बाजूला पाहताना, मोठ्या रंगपटलांची सहज फेक प्रेक्षकांना सुखावह वाटत होती. पारदर्शक जलरंगतंत्राच्या वापराबरोबर अपारदर्शक रंगछटाही तितक्याच कोमल, मृदु जाणवत होत्या. जलरंगमाध्यमावर, मिलिंद फडके यांची दिसून आलेली हुकमत लक्षात राहणारी आहे. अनेकविध रंगछटा व त्यांचे बारकावे, आपल्या स्वतंत्र शैलीतून त्यांनी सादर केले.

हे प्रदर्शन पाहताना, काही चित्रांनी प्रेक्षकांना एक आगळाच आनंद दिला. एका चौरस आकारात पिळवटलेलं एक झाड, सोनेरी पिवळट, तपकिरी रंगछटांनी न्हाऊन निघालेलं, लक्ष वेधून घेत होतं. रचना व रंग दोन्ही दृष्टींनी परिपूर्ण असं होतं. दोन उंच डोंगर-कड्यांमधून अलगद वाट काढणारे रेल्वेचे दोन रूळ व मागे हिरव्या-निळ्या फिकट छटांतून रंगलेलं आकाश प्रसन्नता देत होते. करड्या, पांढऱ्या, निळसर रंगछटांनी स्वतंत्र अस्तित्व दाखविणारं ओंकारेश्वर मंदिर. बारकावे, सूक्ष्मता एकूण परिणाम बहारदार होता. पत्रे-फळ्यांनी उभं राहिलेलं एक छप्पर, स्वच्छ आकाशामुळं अधिक लक्ष वेधून घेत होतं. 'पीस ऑफ माइंड' या शीर्षकाचं चित्र असंच बोलकं. एक पांढरं छोटसं मंदीर, हिरव्यागार वृक्षाच्या छायेत शोभत होतं. हिरव्यारंगाच्या अगणित छटा हा या चित्राचा विशेष होता. मनोहारी आकाशाची पार्श्वभूमी आणि एका टेकाडावर चढत जाणारी वाट हेही चित्र उठावदार होतं. 'स्लम वॉटर फ्रंट' चित्रांतील रंगी-बेरंगी सुखद छटा, पाणी भरणाऱ्या दोन स्त्रिया व त्यांची हालचाल या गोष्टी लक्षात राहणाऱ्या होत्या! 'व्हॅनिशिंग पॉइंट'मधील बंदिस्त कठड्यामधून दूर जाणारी वाट, 'सेटिंग सन'मधील पिवळ्या सुवर्णमय रंगछटांनी साकारलेले आकाश व दोन होड्या, रचनातंत्र व रंग यांचे उत्कृष्ट उदाहरण होतं. अशा किती तरी चित्रांचे बारकावे सांगता येतील. पनवेल येथील मशिद हे चित्र छाया-प्रकाशांनी, रखरखीत उन्हाच्या परिणामांनी, रचना-तंत्रांनी परिपूर्ण असं चित्र, 'रॅप्ट अटेन्शन' या चित्रातील पानं नसलेली दोन नाजूक झाडे, तळाशी पसरलेली हिरवीगार भात-खाचरं, हिरव्या मृदु रंगछटा, रचनाकौशल्य सारं कसं उत्कृष्ट असंच. बहुतेक सर्व चित्र प्रसन्न

आल्हाददायक, सिद्धहस्त कुंचल्यातून आकार धारण केलेली अशीच होती.

### रंगीबेरंगी माउंटस्

चित्रांचं सौंदर्य वृद्धिंगत होतं चित्रांतील रंग, रेषांनी हे खरं; पण त्याचबरोबर त्या चित्रांना साजेसे सभोवतालचे माउंटसही तितकेच महत्त्वाचे.त्या निमित्तानं चित्रसौंदर्य-वाढीच्या प्रयत्नातील मिलिंद फडके यांचे एक धाडस या प्रदर्शनात दिसून आलं. प्रत्येक चित्राला आवश्यक रंगाचे माउंटस विचार-पूर्वक निवडले गेले होते. भडक तांबडे, काळे, आकाशी, निळे, तपकिरी असे विविध तऱ्हेचे. चित्रांना पूरक असेच ते ठरले होते. केवळ पांढरे माउंटस चित्रासाठी घेणं ही कल्पना बदल-लीच पाहिजे, हे फडके यांनी दाखवून दिलं. हे लहानसं पण सुंदर, मोजक्या पण रेखीव चित्रांचं श्री. फडके यांचं प्रदर्शन म्हणजे एक मेजवानीच होती.

–अनंत भिडे

रंगभूमी । विनया खडपेकर

# कैकेयी

अनामिकानिर्मित कैकेयी नाटकाचा प्रथम प्रयोग २९ मार्च १९७९ या दिवशी छबिलदासच्या रंगमंचावर सादर झाला. या नाटकाच्या लेखिका ललिता बापट आहेत आणि दिग्दर्शक श्री. रमेश चौधरी आहेत.

जितेंद्र अभिषेकी, प्रभाकर कारेकर ही नावे आणि छबिलदासचा रंगमंच ही जोडी कशी जुळते हे पहाण्याची उत्सुकता होती. ही जोडी योग्य प्रकारे जुळली.

रामायणातल्या आपल्या नेहमीच्या परि-चित कैकेयीपेक्षा ही कैकेयी वेगळी आहे. ही कैकेयी व्रती आहे. उन्मत्त रावणाचा वध करण्यास रामाने दंडकारण्यात राहून संघटन करणे आवश्यक होते. उत्तरेतले सैन्य नेऊन ते काम भागण्यासारखे नव्हते. म्हणून ऋषी कैकेयीला वर मागायला लावून रामाला दंडकारण्यात वनवासाला पाठवितात. जिवाच्या कराराने कैकेयी ते कृत्य करते. भरत निर्मोही असल्यामुळे रामाच्या मागे तोच राज्यास योग्य असे ठरविते. सगळ्यांचे शाप सहन करते. राम वनवासाला जातो तेव्हा ती व्रतस्थ राहते. राम परत आल्यावर राज्यारोहणाचा सोहळा पहाण्यास उत्कंठित होते.

रामायण-महाभारताचे आम्हाला आकर्षण आहे. पुनःपुन्हा आम्ही या महाकाव्यांकडे वळून पहातो. त्यातून नवनवे अर्थ शोधतो. कथा रचतो. नाटके लिहितो. पौराणिक नाटके अनेक प्रकारे रंगभूमीवर आली. खाडिलकरप्रभृतींनी पौराणिक नाटकांतून स्वातंत्र्याचे संदेश दिले. कधी पौराणिक नाटकावर आमचे सामाजिक प्रश्न लादले गेले. अगदी विष्णुदास भावे, अण्णासाहेब किर्लोस्करांपासून ते आजच्या विद्याधर गोखले, रत्नाकर मतकरी, विद्याधर पुंडलिक या सर्वांनी आपापल्या शक्तीनुसार या महाकाव्यांच्या आख्यानोपाख्यांना रंगभूमीवर आणले आहे. विद्याधर गोखले यांनी हरिदासी थाटात पौराणिक आख्याने रंगभूमीवर आणली तर रत्नाकर मतकरी, विद्याधर पुंडलिक यांनी त्या महाकाव्यांचा त्यातील व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. ललिता बापट या दोघां-इतक्या खोलात शिरल्या नाहीत; परंतु त्यांची कैकेयी-परंपरा मात्र होच सांगत असते. ही 'कैकेयी' म्हणजे ललिता बापट यांचा केवळ कल्पनाविलास नाही. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार राजकारण जाणणारी, रणात लढणारी कैकेयी इतकी हट्टी, स्वार्थांध हे त्यांना पटत नसे. तिच्या वागण्यामागे वेगळे काही कारण असावे असे वाटत असे. किंचित खोलात शिरू पाहता वाल्मीकि रामायणात तसे सबळ पुरावे मिळाले. त्या आधारे ललिता बापट यांनी 'कैकेयी' हे नाटक रचले.

केवळ सनसनाटी काही लिहायचे म्हणून हे नाटक लिहिले गेले नाही. कैकेयीच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेण्याचा हा प्रयत्न आहे. फार खोलात न शिरता उथ्याउथ्याच केलेला हा प्रयत्न आहे; पण प्रामाणिक प्रयत्न आहे. ही कैकेयी सहानुभूतीची भीक मागत नाही. स्वतःच्या त्यागाचे रडगाणे गात नाही. तिला काय सोसावे लागले ते ती आक्रोश करून सांगत नाही. दुःखाचा एकही उद्गार न काढता ही सम्राज्ञी अति-शय खंबीरपणे सारे सहन करते. आजच्या महाभारत, रामायण या महाकाव्यांतील खलपात्रे स्वतःची भूमिका आत्यंतिक आवेशाने मांडत असतात. त्या पार्श्वभूमीवर कैकेयीची ही व्यक्तिरेखा महत्त्वाची वाटते. पौराणिक पात्रांची भाषा बहुतेक नाटकांतून आधुनिक असते. त्यामुळे वातावरणनिर्मितीत बाधा येते. ललिता बापट यांनी भाषाशैलीचे अगदी योग्य भान ठेवले आहे. सर्व पात्रांची भाषा संस्कृतप्रचुर आहे. ती प्रेक्षकांना सहजपणे रामायणकालात घेऊन जाते. 'परवानगी', 'सजावट' असे काही शब्द संस्कृतप्रचुर संवादांच्या लयीत किंचित विक्षेप आणतात. सीतेचे गाणे एकंदर कथानकात कोठे बसत नाही. ते मुद्दाम घुसडल्यासारखे वाटते.

नाटकाचा प्रयोग एकंदर ठीक होतो. तरी त्यात अनेक दोष आहेत. कांता शिवेश्वरकर यांनी कैकेयीची भूमिका सहजपणे पेलली आहे. कोठे भडकपणा येऊ दिलेला नाही. शेखर नवरे (विश्वामित्र), श्याम बापट (दशरथ), मोहन भिडे (भरत), विजय जोग (विदूषक), गीता नाईक (मंथरा) यांनी आपापल्या भूमिका व्यवस्थित सांभा-ळल्या आहेत. विश्वनाथ कामथ (राम) आणि ज्योत्स्ना हर्डीकर (सीता) यांचे चेहेरे, शरीरयष्टी त्यांच्या भूमिकांना योग्यच वाटत नाही. ती उणीव अभिनयात भरून निघत नाही. त्यामुळे या भूमिका अगदीच मिळ-मिळीत वाटतात. स्त्रीपात्रांची वेषभूषा योग्य वाटत नव्हती. कैकेयी प्रथम आधुनिक स्त्रीच्या पाच वारी साडीत होती.नंतर वैधव्य आल्यावर नॉयलॉनचे झिरझिरीत शुभ्र वस्त्र नेसली होती. त्यावर सोनेरी भरतकाम होते. सीता आणि मंथरेची वस्त्रे नेसण्याची पद्धतही आधुनिकच होती. 'संकल्प'च्या अमॅच्युअर मुलांनी रेग्यांच्या नाटिका करताना प्राचीन वेषभूषांचे भान यापेक्षा किती तरी अधिक ठेवले होते. चौदा वर्षांनंतरच्या प्रसंगात मंथरा आणि कैकेयी यांनी आधीचीच वस्त्रे नेसून प्रवेश केला, हे तर फारच चूक वाटते. ती वस्त्रे थोडी मलीनसुद्धा दाखवली नव्हती. नेपथ्यामध्ये बाजूचे खांब राजप्रासादाला साजेसे होते; परंतु मागच्या बाजूची भिंत चक्क आधुनिक सिनेमा-थिएटरच्या भिंती-सारखी मखमली दिसत होती सगळी पात्रे निःपात या शब्दाचा उच्चार निप्पात असा करीत होती. जितेन्द्र अभिषेकी, प्रभाकर कारेकर, अजित कडकडे, राजा काळे यांचे पार्श्वगायन मधुर होते. त्यामुळे नाटकातील वातावरणाचा परिपोषही होत होता.

ललिता बापट यांचे हे पहिलेच नाटक आहे. मराठी रंगभूमीला त्या काही देऊ शकतील असे हे नाटक पाहून वाटते. ☐

# पुरोगामी धोरणाची वेगवान वाटचाल

राज्यातील मागासलेल्या, दुर्बल, उपेक्षित घटकांसाठी तसेच सर्वसामान्य जनतेसाठी नव्या पुरोगामी शासनाने अल्पावधीत क्रांतिकारी स्वरूपाचे अनेक लोकहितकारी निर्णय घेतले असून त्यांचा प्रत्यक्ष लाभ एव्हाना जनतेस मिळूही लागला आहे.



अवर्षणग्रस्त भागात टंचाई निवारणार्थ कामे.
उत्पादक कामे रोजगार हमी योजनेतून.
कामांचे आर्थिक निकष शिथिल.
अनेक नवीन प्रकारच्या कामांचा समावेश.



रोजगार हमी योजनेच्या मजुरीत वाढ.
धान्याच्या स्वरूपात देण्यात येणाऱ्या मजुरीत वाढ.



अवर्षणग्रस्त भागात गुरांसाठी चारा पुरवठ्याच्या सवलती. चाऱ्यासाठी तीनशे रुपयांपर्यंत तगाई कर्ज.
चाऱ्याच्या वाहतुकीसाठी मदत.
जवळच्या वनक्षेत्रांत मोफत चराई.
सहकारी संस्थांमार्फत चारा पुरवठ्याची व्यवस्था.

अवर्षणग्रस्त भागात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था. कूपनलिका खोदणे,
विहिरी पुनर्जीवित करणे,
टँकरने पाणी पुरवठा.



माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन, मुंबई तर्फे प्रकाशित

# श्री भगवान उवाच....

**श्रीअर्जुन उवाच**

अर्जुन म्हणे आज देवा
आणिला पहा अमोल मेवा
करमणुकीचा अपार ठेवा
तुमच्यासाठी ।

कितीही खावा इतरा द्यावा
इतरांचाही मोद वाढवावा
कमी न होता वाढतच जावा
वाटूनही ।

काय त्याचा महिमा वर्णावा
किती म्हणोनी गुण त्याचा गावा
येई इकडे, दूर ठेव पावा
मुरलीधरा सत्वरी ।

द्रौपदीने आज आग्रह केला
काही करा पण सिनेमाला चला
स्त्री-हट्टापुढे ना कोण झुकला
सांग तूच ।

मीही विटलो होतो या जीवना
नव्हता विरंगुळा माझ्याही मना
घातले कपडे सारल्या वहाणा
पायांमधे ।

पोचलो रिक्षातून विनासायास
लक्ष्मी रोडजवळ भानुविलास
थेटर बांधले मानवाने खास
पुण्यनगरीत ।

रिक्षावाल्याला देऊन पैसे
शिरलो आत चाचपत खिसे
समोरच छोटीशी खिडकी दिसे
तिकिटाची ।

म्हटले जरा चैन करावी
बाल्कनीचीच तिकिटे काढावी
मध्यंतरी भेळपुरी खावी
द्रौपदीसंगे ।

ठेचाळत दोघे अंधारात,
कुणाच्या पायांवर पाय देत
आणि कित्येकांच्या शिव्याही खात
आसनस्थ जाहलो ।

फार काळ परी सुख न लाभले
रक्तपिपासू ढेकूण आले
मिळेल तिथून शोषू लागले
उभयतांना ।

शेवटी घेतले हाती धनुष्य
द्रोणाचार्यांचा मी पट्टशिष्य
संपवले एकेका नीचाचे आयुष्य
सहजतेने ।

तोवरी संपले होते एक गाणे
वासुदेवाचे वाकडे नाचणे
दृष्टीस देऊळ सुंदर, देखणे
दिसो लागले ।

आणि आली पाटलाची गाडी
धुळ उडवत बैलांची जोडी
देऊळ पाहून कासरा ओढी
गाडीवान ।

हनुमान तो महाबळी
रावणाची दाढी जाळी
लिहिलेल्या कोणी तरी ओळी
देवळावरी ।

नदीच्या किनाऱ्याने वसलेलं गाव
डोंगर-झाडी, रामपूर नाव
सुबत्ता दिसे जिकडे पहावे
गावात त्या ।

गावामध्ये म्हणे कोणी एक संत
गृहस्थ सज्जन, म्हणती त्याला पंत
झिजण्याला याच्या ना कधीच अंत
गावासाठी ।

गरिबांचा तो सदैव वाली
अस्पृश्य म्हातारीची घागर उचली
भरून सदैव प्रेमाच्या पखाली
ओतीतसे ।

जीर्णोद्धार केला या देवळाचा
देऊन हात नवा रंगाचा
कष्टला मारून धोतराचा काचा
अहोरात्र ।

गावातले पोर नदीत बुडाले
पाटलाच्या डोळ्यांत पाणी आले
डोक्यात नवीन योजना चाले
ईर्षेपायी ।

मीही दावतो, बांधी पंत देऊळ
मला तर आहे पैशाचेही बळ
गावासाठी टाकतो सर्वत्र नळ
उदईकचि ।

असं म्हणोनी कामा लागला
गावात तरुण विंजेनेर आला
काम सुरू झालं मुहूर्तही झाला
पाणी भरण्याचा ।

काम संपलं परी सुरू झालं प्रेम
पंताच्या पोरीवर विजेनेराचा नेम
बाकी सर्वत्र कुशल क्षेम
गावामध्ये ।

पंताची पोर, पाटलाचा पोर
खेळले बालपणी शिपाई-चोर
भावा-वहिणीसम प्रेम त्यांचे थोर
परस्परांवरी ।

पोरीचं लगीन ठरत आलं
देण्या-घेण्यावर परी फिसकटलं
पाटलाच्याही कानावर गेलं
वृत्त हे ।

काही न बोलता पाटील गेला
विजेनेराला नीट पटवला
लग्नाचा बस्ताच घेऊन आला
गावामधी ।

लग्नाची धांदल सुरू जाहली
पाटील सर्वत्र मांडव घाली
कळेना कुणाला पाटलाच्या चाली
लग्न कुणाचं ।

पंतांना वाटलं पोराचं लगीन
मांडलं पाटलानं मला जिरवून
लाल लाल झाला पंत तापून
क्रोधभरे ।

परी मांडवात पाहून पोरीला
धक्का बसला पंताच्या मनाला
पाटील उभा कन्यादानाला
सपत्नीक ।

पंत–पाटील मिठ्या मारती
स्तुती–सुमनांचा वर्षाव करती
जनही आनंदित झाले या परती
मांडवात ।

कसली ही फिल्म, नाव हिचं ईर्षा
परी नाही कुठं थारा संघर्षा
परस्परांवरी प्रेमाची वर्षा
करिती नुसती ।

याने देऊळ बांधलं, त्यानं पाणी आणलं
याने शाळा काढली, त्याने कन्यादान केलं
देवमाणसासारखं जनांचं भलं
दोघांपुढे ।

फिल्मीत या मोठ्या नट्या-नट
नाव मोठं पण लक्षण खोटं
भिडती न कोणी मनास थेट
प्रेक्षकांच्या ।

आधी कथेतच नाही काही जोर
दिग्दर्शकावर कमी झाला भार
दाखवून जुन्याच कल्पत्या चार
स्वस्थ बसे ।

संगीत म्हणजे नुसतं बडवणं
ढोल-ताशावर कसंही गाणं
मध्येच थोडी बासरी करुण
पेरली असे ।


**श्री भगवान उवाच**

पहाव्या कशाला अशा फिल्मा
निघण्याआधीच विचार करावा धीमा
विचारावं थोडं धर्माला वा भीमा
चांगली कोणती ।

अस्सल मसाला म्हणावं जिला
सध्या फिल्म एक, नाव सुशीला
येतोस जरी तर पूस द्रौपदीला
सर्वही जाऊ ।

—सतीश कामत


**हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?**
**राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?**
या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी........



# नाझी भस्मासुराचा उदयास्त

लेखक : वि. ग. कानिटकर
आवृत्ती : तिसरी (सचित्र)
किंमत : रुपये पंचेचाळीस
राजहंस प्रकाशन, पुणे

जात आहे; पण ते काम दिरंगाईचे आहे. आज घाटातून वाढती गाडी नेणे शक्य नाही.' व्याख्यानाचे शेवटी त्यांनी 'पसायदान' म्हटले. ते म्हणाले, 'चोरियाँ हटे / सबको आराम हो / करप्शन कम हो / सबको आनंद हो / सुख हो!'

चीफ ऑपरेटिंग सुपरिंटेंडेंट व्ही. डी. जोग म्हणाले, 'गाडी आता सुटेल, प्रवाशांनी गाडीत जाऊन बसावे. वेळ होताच मोहन धारिया हे टेबलावर ठेवलेले लिव्हर दाबून गाडी सुरू करतील.'

मोहन धारिया यांनी भाषणात एके ठिकाणी रेल्वे-अधिकाऱ्यांनी गाड्यांतील गर्दी कमी होण्याकडे पहावे असे म्हटले. काही अंशी गर्दी कमी करणे अधिकाऱ्यांच्या क्षमतेवर आहे हे खरेच; पण खरा दोष मुंबईत वाढलेल्या बेसुमार लोकसंख्येवर येतो. सगळ्या जगात शहरांकडे रीघ लागली आहे, त्याची कारणे अर्थशास्त्रज्ञ, उद्योगपती व राजकारणशास्त्र जाणणारे सांगू शकतील. आज तरी मुंबईत लोकलगाडीतला प्रवास हे दिव्य झाले आहे. एकदा मी अनेक वर्षांनी मुंबईस गेलो. येताना बोरीबंदरवर बसायला आलो. मला कशी तरी मासळीच्या डब्यात जागा मिळाली. मासळीच्या टोपल्या ठेवण्यास खण केलेले असतात त्यांच्याखाली शिरून, मान वाकवून बसून राहिलो. काही मिनिटात सबंध डबा भरला. शेजारी पाहिलं तर माझा वर्गमित्र असाच दुमडून बसला होता. त्याने विचारले, 'कुठे असतोस?' मी म्हटलं, 'पुण्याला!' तो म्हणाला, 'भाग्यवान आहेस. या लोकलगाड्यांतील प्रवासाने आमच्या आयुष्याची पंधरा वर्षे कमी केली आहेत!'

आगगाडीच्या प्रवासाची मुंबईत अशी भयाण अवस्था असली तरी मुंबई-पुण्याहून दूर गेलो तर अजूनही आगगाडीचा प्रवास ही गंमत आहे. मला कुणी म्हटले की तू मोटार, विमान, आगगाडी यापैकी काय पत्करशील? तर मी डोळे मिटून 'आगगाडी' म्हणेन. इंग्लंडमध्ये आगगाडी अजिबात उखडली गेली. आता शेवटचे रूळ व एक आगगाडी पुढच्या पिढीला दाखवण्यास ठेवली आहे. तो तिचा फोटो पाहून माझ्या डोळ्यांत पाणी आले. मी आमच्या पुढाऱ्यांना सांगेन, तुम्ही ज्या ईर्षेने लोकशाही राखाल त्याच ईर्षेने आगगाडी राखा. सगळ्या जगातून आगगाडी उठली तरी आगगाडी व लोकशाही भारताचे वैशिष्ट्य राहू द्या! या जगातून आगगाडी कधीच उठणार नाही ही माझी खात्री आहे. परवाच युरोपमध्ये आगगाडीचे पुनरुज्जीवन होत आहे असे वाचले व आनंद झाला. तिथे जास्तीत जास्त लोक आगगाडीने जाऊ लागले आहेत. रेल्वे कंपन्यांनी आता अत्यंत सुखसोयीच्या गाड्या बांधल्या आहेत. त्या थोडी स्टेशने घेतात. जवळच्या अंतरात त्या विमानापेक्षा फार वेळ घेत नाहीत. एअर होस्टेसप्रमाणे ट्रेन होस्टेस तुमची देखभाल करतात खालचा रुळाचा ट्रॅक असा बांधला आहे की, तुमच्या पोटातले पाणी हलत नाही. सकाळी तुम्ही ताजेतवाने होऊन उठता. उत्तम चहा व जेवण तुमच्यापुढे येते.

मला तर आगगाडी म्हणजे घरच रुळावर घालून चालले आहे असे वाटते. गाडीत मोकळी हालचाल करता येते. डब्यांतून इकडून तिकडे जाताना अनपेक्षित मित्र भेटतात. खिडकीतून प्रदेश न्याहाळता येतो. त्या दृष्टीने पायी जाण्याचा मी पहिला नंबर लावीन, बैलगाडीचा दुसरा व आगगाडीचा तिसरा लावीन. आगगाडी ही आपल्या देशाला परवडेल अशी एकमेव प्रवासाची रीत आहे. महत्त्वाची कामे सोडल्यास, देशांतर्गत विमान वाहतूक कमी करून तो खर्च आगगाडीकडे करावा.

¤

आगगाडीच्या बाबतीत मी हळवा आहे हे मी मान्य करतो. हे खरे की, मध्यरात्री मी जागा झालो व दीड मैल दूर असलेल्या स्टेशनावरील आगगाडीची शिटी ऐकू आली की मी अस्वस्थ होतो. माझ्या शरीरावर रोमांच उठतात. मला वाटते, बायकोमुलांना उठवावे, वळकट्या बांधाव्यात, बॅगा भराव्यात आणि सर्वांनी स्टेशनाकडे चालू लागावे. मला जर देव प्रसन्न झाला तर मी देवाजवळून शंभर वर्षांचा संबंध भारताचा रेल्वेपास मागेन.

अंधारातून आगगाडी जात आहे. एकदम पूर्वक्षितिजावर चंद्रबिंब फुटते. तुम्ही हळूच काच वर करता. कोळशाचे कण तुमच्या तोंडावर आपटतात. केसात वारा घुसतो. उगवत्या चंद्राच्या चांदण्याने सगळ्या सृष्टीबरोबर तुमचेही हृदय हळवे केले आहे. तुम्हाला आयुष्यातले कुठले कुठले हळवे प्रसंग आठवतात. तुम्ही आयुष्याविषयी चिंतन करू लागता. सृष्टी व तुम्ही वेगळे नाहीत असे वाटू लागते. बऱ्याच वेळाने थकून तुम्ही खिडकीच्या उंबऱ्यावर डोके टेकता आणि समाधी लागावी तशी झोप लागते.

बाहेरचे व आतले असे आगगाडीला अनुपम सौंदर्यही आहे. कोणत्याही प्रदेशातून आगगाडी जावो ती स्वतःला व त्या प्रदेशाला दोघांना सौंदर्य आणते. डोंगर, दऱ्या, राने, वाळवंट, माळरान यातून ती सुंदर स्त्रीप्रमाणे बेगुमान जात असते. असे वाटते की, बैलगाडी व आगगाडी ही दोन यंत्रे निर्माण करून माणूस थांबला असता तरी बिघडले नसते.

या माझ्या प्रवचनामध्ये, झेलम एक्स्प्रेसचे उद्घाटन मोहन धारिया यांच्या हस्ते होत आहे हे विसरले जाऊ नये. व्ही. डी. जोग यांनी प्रवाशांनी आपापल्या डब्यात जाऊन बसावे अशी विनंती केली. हीच विनंती धारिया यांनीही पुन्हा पुन्हा केली, ते योग्यच होते. एखादे लग्नाचे वऱ्हाड निघावे व वऱ्हाडातील कर्त्या माणसाला कुणी तरी मागे राहील अशी भीती वाटावी तशी धारियांना व रेल्वे-अधिकाऱ्यांना वाटत होती. शिवाय स्वतः धारिया म्हणाले तसे व्याख्यानाच्या नादात गाडी सुटण्याची वेळ निघून जावयाची, असेही होण्याचा संभव होता. त्यासाठी आखडती घेतलेली सर्वांची व्याख्याने संपली आणि दहा मिनिटे वेळ उरला. शेवटी धारिया बोलले होते. खाली बसल्यावर त्यांच्या लक्षात आले की, गाडी सुटण्यास उरलेली दहा मिनिटे वक्ते व श्रोते यांनी परस्परांकडे बघून शांतपणे काढणे

अशक्य. ते पुन्हा उभे राहिले. ते म्हणाले, 'गाडी वेळेवर सुटावी म्हणून आम्ही व्याख्याने आखडती घेतली. तरी गाडी सुटण्यास अजून दहा मिनिटे आहेत. मी दोन-तीन विनोदी किस्से सांगतो.' धारियांनी चांगली समयसूचकता दाखविली. त्यांनी तीन किस्से सांगितले. पहिला मोटारवाल्या बाईचा होता. चौकातल्या पोलिसाचा आडवा हात कापून ती पुढे गेली. तेव्हा ट्रॅफिकचा पोलीस शिट्टी फुकत फटफटीवरून पाठलाग करू लागला. थोडयाच वेळात त्याने तिला थांबवून विचारले, 'बाई! पोलिसाचा हात कापून तुम्ही गेलात ते तुम्हाला कळले नसेल; पण माझ्या शिट्टयाही तुम्हाला ऐकू आल्या नाहीत?' बाई लाजत म्हणाली, 'शिट्टया ऐकून मागे पाहावयाचे का माझे वय आहे?'

दुसरा किस्सा— 'एक शीख आरामात पहुडला होता. कुणी तरी त्याला विचारले, 'आर यू रिलॅक्सिंग?' तेव्हा तो उसळून म्हणाला, 'नो नो! आय अॅम मिल्खासिंग!'

तिसरा किस्सा एका प्रवाशाने गाडीची साखळी ओढूनही गाडी थांबली नाही याचा होता. त्या प्रवाशाने गाडीकडे तक्रार केली. गार्ड म्हणाला, 'तुम्ही साखळी ओढलेली असणे शक्यच नाही.' तेव्हा चिडलेल्या उतारूने त्याला डब्यात नेऊन साखळी दाखवली. ती संडासातली होती.

या गोष्टी सांगण्याआधी कुणाला दुखवण्याचा माझा हेतू नाही हे धारियांनी सांगितले. मी धारियांचे समयसूचकतेबद्दल अभिनंदन करतो. पण धारियांच्या या गोष्टींमुळे माझ्यातला कथा-लेखक जागा झाला आहे. असे समजू या की, धारियांचे तीन किस्से संपल्यावरही गाडी सोडावयास तीन मिनिटे तर उरली आहेत. माझ्या गोष्टीला तेवढी पुरे आहेत. एकदा कुर्डुवाडी स्टेशनावरून पंढरपूरकडे गाडी निघाली. आरंभीच गाडीला चढ चढावा लागतो. त्या गाडीच्या एंजिनचा जीव इतका लहान की चढावर डबे ओढून नेताना ती दहादा धापा टाकते, थांबते, मागे येते, पुढे जाते. एकदा एक युरोपियन माणूस पंढरपूर पहायला आला. त्याने अर्थातच फर्स्ट क्लासचे तिकिट काढले होते. फर्स्ट क्लासच्या डब्यात पाऊल ठेवताच त्याचे डोके भडकले. त्या डब्यात बाकांवर गाद्या नव्हत्या, वर पंखे नव्हते. थोडक्यात फर्स्ट क्लास लिहिलेला तो थर्ड-क्लासचा डबा आहे, हे त्याच्या ध्यानात आले. तो गार्डकडे गेला. गार्ड म्हणाला, 'सर, तुमचा डबा फर्स्ट क्लासच आहे, लिहिण्यात चूक नाही. तुम्ही डब्यात जाऊन बसा. थोडयाच वेळात तुम्हाला तुमच्या शंकेचे उत्तर मिळेल!' तो युरोपियन चडफडत आपल्या डब्यात जाऊन बसला. गाडी सुरू झाली. फासफुस् करीत ती पहिला चढाव चढू लागली. गाडीला गर्दी असल्याने लोड जास्त होते. चढता चढता एंजिन थकले व मागे आले. पुन्हा थांबले. पुन्हा गाडी ओढू लागले. असे दोन-चार वेळा पुढे-मागे होऊन गाडी थांबली. जरा वेळ गेला. बाहेर थोडा ओरडा ऐकू आला आणि गाडी हळूहळू पुढे सरकू लागली. तेवढयात गार्ड डब्याचे दार उघडून युरोपियन उतारूजवळ गेला. युरोपियनाला म्हणाला, 'साहेब, जरा बाहेर पहा!' साहेबाने गाडीबाहेर डोकावून पाहिले. गाडीतले लोक खाली उतरत होते. बरेचसे उतरले होते. उतरलेले लोक गाडी लोटण्यासाठी धावत होते. सर्वजण ललकाऱ्या देत गाडी लोटत होते. गार्ड साहेबाला म्हणाला, 'साहेब, तुमचा डबा फर्स्ट क्लासचा का हे कळले का? थर्ड क्लासचे लोकांना गाडी लोटावी लागते. फर्स्ट क्लासच्या लोकांना आम्ही गाडीत बसू देतो!'

चार-पन्नास झाले आहेत. माझी कथा वेळेवर संपली आहे. केंद्रीय मंत्री मोहन धारिया हसतमुखाने लिव्हर ओढून आगगाडी सोडीत आहेत. त्यांनी लिव्हर दाबली. सिग्नल पडला. गाडीने शिट्टी दिली. गार्डने शिट्टी वाजवली. हिरवे बावटे फडफडले. गाडी सुरू होतानाचे चाकांचे, रुळांचे, डब्यांचे आवाज आले. गाडी सरकू लागली. मोहन धारिया यांनी हात वर करून हालवीत गाडीला निरोप देणे सुरू केले. आम्ही सर्व सरकणाऱ्या गाडीकडे पहात हात हालवीत आहोत.

आणि काय चमत्कार! गाडी स्थिर झाली आहे आणि आमच्यासह आमचा प्लॅटफॉर्मच प्रथम हळू सरकत, मग वेगाने जम्मूकडे निघाला आहे. अच्छा! टा टा! जम्मूतावीला पोहोचताच पत्र पाठवू! □



लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी
१९४८-४९
लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे ३० । मूल्य : २० रुपये

## श्री. भांडारी यांचा लेख – दुसरी बाजू : पृष्ठ ४ वरून

पक्षांतर्गत निवडणुकीला उभे राहण्याचा अधिकार जुन्या कॉंग्रेस पक्षाच्या घटनेत होता व जनता पक्षाच्या घटनेतही तो अधिकार आहे. प्राथमिक समितीच्या निवडणुकीत मत देण्याचा अधिकार क्रियाशील सभासदाला नसून प्राथमिक सभासदाला आहे. ही तरतूद जनता पक्षाच्या घटनेत आहे व जुन्या कॉंग्रेस पक्षाच्या घटनेतही तशीच होती. जनता पक्षाच्या अंतर्गत निवडणुकात सभासद नोंदणीबाबत काही गैरप्रकार झाले आहेत. बीड ब्लॉककडून सुमारे एक हजार सभासदांची यादी व पैसे मुदत संपल्यानंतर प्रदेश कार्यालयात भरण्यात आले व ती यादी प्रमाणित करून घेण्याचा प्रयत्न झाला; पण त्या यादीत सभासदाचा पावतीक्रमांक दिलेला नाही, अशी तक्रार तेथील दुसऱ्या काही कार्यकर्त्यांनी केल्यानंतर प्रदेश निवडणूक मंडळाने ती यादी अप्रमाणित ठरवली व त्या यादीच्या आधारावर झालेली निवडणूकही रद्द ठरवली. हे सर्व फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात झाले व त्या वेळी मृणालताई बर्लिनमध्ये होत्या; पण सत्य समजून घेण्याची तसदी न घेणाऱ्या श्री. भांडारी यांना हे कसे माहीत असणार? म्हणूनच ते बिनदिक्कतपणे लिहिते झाले, 'मृणाल गोरे पंतप्रधानांकडे जाऊन महाराष्ट्रात बोगस सदस्यनोंदणी मोठ्या प्रमाणावर झाल्याची तक्रार करतात.' की मृणालताईंनी ती तक्रार पश्चिम जर्मनीच्या पंतप्रधानांकडे नोंदवली, असे श्री. भांडारी यांना म्हणावयाचे आहे?

असे प्रकार केवळ एकाच ठिकाणी घडले असे नाही. चंद्रपूर जिल्ह्यात तर भूतपूर्व जनसंघवाल्यांनी प्रमाणित याद्या नागपूरच्या कार्यालयात कपाटात दडवून ठेवल्या आणि भूतपूर्व समाजवाद्यांची नावे वगळून बनवलेल्या अप्रमाणित याद्यांच्या सहाय्याने अंतर्गत निवडणुका घेतल्या. या दडवलेल्या याद्यांचा रीतसर पंचनामा करून त्या सील करून आता राज्याच्या मध्यवर्ती कचेरीत आहेत. हा गंभीर प्रकार चौकशीअंती नजरेसमोर आल्यानंतर प्रदेश निवडणूक मंडळाने तेथील सर्वच निवडणुका रद्द केल्या आहेत. नागपुरात बावीस हजार सभासदांच्या याद्या प्रमाणित करून घेण्यात आल्या. मात्र प्रदेश कार्यालयाकडे चौदा हजार सभासदांचेच पैसे भरलेले होते. श्री. भांडारी यांना हे सगळे सोयिस्करपणे माहीत नसावे.

श्री. भांडारी यांनी म्हटले आहे की, 'बापूसाहेब काळदाते ह्यांच्याबद्दल व्यक्तिशः कुणास आकस नाही. महाराष्ट्राच्या राजकारणात गेली अनेक वर्षे ते आघाडीवर आहेत. ते एक उत्कृष्ट वक्ते आहेत; पण त्यांची उमेदवारी 'जनसंघविरोधी' म्हणून पुढे आणण्याची गरज काय होती? महाराष्ट्राचे एक ज्येष्ठ नेते म्हणून ते सर्वांना स्वीकारार्ह ठरले नसते काय? या प्रश्नाचे उत्तर एकच आहे. नकारात्मक दृष्टिकोन'.

असे लिहून श्री. भांडारी कुणावर काय आरोप करीत आहेत? त्यांनीच पुढे म्हटल्याप्रमाणे श्री. मोहन धारिया यांनी प्रदेश अध्यक्षपदासाठी डॉ. काळदाते यांचे नाव सुचविले. दिल्लीत ते या संबंधात अनेकांशी बोलले. यात धारियांचा नकारात्मक दृष्टिकोन काय होता? की श्री. मोतीरामजी लहाने यांच्या उमेदवारीला त्यांनी पाठिंबा दिला म्हणजे त्यांचा दृष्टिकोन होकारात्मक किंवा विधायक असतो? पुणे शहर जनता पक्षाच्या अध्यक्षस्थानी श्री. अण्णा जोशी यांची बिनविरोध निवड घडविण्यात पुढाकार घेतल्याबद्दल अटलजी व नानाजींनी त्यांचे अभिनंदन केले तेव्हा धारियांचा दृष्टिकोन पुरोगामी असतो आणि काळदाते यांचे नाव सुचविल्याबरोबर त्यांचा दृष्टिकोन नकारात्मक ठरतो काय?

काळदाते यांची उमेदवारी 'जनसंघविरोधी' म्हणून कुणी पुढे आणली? भूतपूर्व जनसंघीयांनी अशी कुणाची उमेदवारी आग्रहाने पुढे केली होती की, ज्यांना विरोध करायला काळदातेंसारखा मोहरा पुढे सरकवण्याची गरज पडली? महाराष्ट्रातील तरुणांना क्रियाशील बनवून जनता पक्षाची पाळेमुळे ग्रामीण भागात रुजवायला डॉ. काळदाते सर्वतोपरी लायक उमेदवार आहेत, असे धारियांना व इतर काही जणांना वाटले तर तो जनसंघविरोधी नकारात्मक दृष्टिकोन कसा काय ठरतो? इतरांचे दृष्टिकोन नकारात्मक आहेत की होकारात्मक, हे तपासण्यापूर्वी आपल्याला समाजवादद्वेषाची कावीळ झाली नाही ना, हे श्री. भांडारी यांनी तपासून पहावे आणि इतर सर्व दृष्टींनी लायक असलेल्या काळदात्यांना, ते केवळ भूतपूर्व समाजवादी पक्षाचे व 'आढावपंथी' आहेत म्हणून ज्यांनी विरोध केला त्यांचीही तपासणी करावी.

### पन्नालाल सुराणा यांची भूमिका

श्री. भांडारी यांनी म्हटले आहे, 'काळदात्यांना अविरोध अध्यक्ष करू या,' हा सांगावा धारियांकरवी धाडला जात असतानाच पन्नालाल सुराणांसारखा जबाबदार नेता 'संघाचं नियमन करणं अत्यावश्यक आहे,' असा दावा करतो पूर्वाश्रमीच्या जनसंघीयांना दडपण्याची, त्यांचा न्याय्य हक्कसुद्धा त्यांना लाभू न देण्याचीच धडपड ज्यांनी केली त्यांनीच आपल्या माणसाला अविरोध निवडून देण्याचा प्रस्ताव मांडावा, हा राजकीय निर्लज्जपणाचा इरसाल नमुना आहे.'

श्री. भांडारी यांचे भाषाज्ञानही मोठे अगाध दिसते. 'दावा' या शब्दाचा अर्थ त्यांना जसा कळत नाही तसा 'निर्लज्जपणा' या शब्दाचाही कळत नाही असे दिसते. पहिली गोष्ट अशी की, 'संघाचं नियमन करणं अत्यावश्यक आहे,' असे विधान पन्नालालनी बोलताना किंवा लिहिताना कुठेही केल्याचे मला तरी माहीत नाही. रा. स्व. संघाचे 'हिंदू राष्ट्रनिर्मिती' हे ध्येय व 'हिंदूंचे संघटन' हा मार्ग राष्ट्रीय एकात्मतेला मारक आहे, असे त्यांचे मत आहे. त्यांनी ते अनेक वेळा बोलून दाखवले आहे. तसेच संघ हा जनता पक्षात विलीन झालेला नसल्याने त्याविषयी जनता पक्षाच्या व्यासपीठावर चर्चा करण्याचे कारण नाही असेही त्यांचे मत आहे; पण ते असो. संघाबद्दलची कुणाची काहीही मते असली तरी जनता पक्षाच्या प्रदेश अध्यक्षपदासाठी बापू काळदातेंचे नाव सुचविणे हा निर्लज्जपणा कसा काय ठरतो? त्यांची सूचना कुणाला पसंत पडली नाही तर त्यांनी खुशाल तसे म्हणावे; पण त्यासाठी 'निर्लज्जपणा' हा शब्द वापरून आपल्या हलक्या मनाचे प्रदर्शन कशासाठी करायला हवे?

श्री. भांडारी यांचे तर असे म्हणणे नाही ना, की ज्यांना जनता पक्षात रहायचे आहे त्यांनी संघाचे थोरपण मान्य केले पाहिजे? संघाच्या शक्तीचा धाक दाखवून भांडारी गुरकावत असले तर पन्नालालही मेल्या आईचे दूध प्यालेले नाहीत हे त्यांनी ओळखून असावे.

गेल्या विधानसभा निवडणुकीनंतर जनता विधिमंडळपदाच्या नेता-निवडीबाबत भांडारी व त्यांचे मित्र यांच्या मनात बराच राग घुमसतो आहे असे दिसते. बाकी त्याहीबाबत त्यांचे ज्ञान तेवढेच अगाध असणार! म्हणून त्या वेळी काय घडले ते नमूद करायला हवे. निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर जनता प्रदेश अध्यक्ष श्री. एस् एम्. जोशी व इतर पदाधिकारी दिल्लीला गेले. तेथे पक्षाध्यक्ष श्री. चंद्रशेखर व इतर पदाधिकाऱ्यांची भेट घेतली असता नेता-निवडीबाबत चर्चा झाली. इंदिरा कॉंग्रेसबरोबर सहकार्य करू नये, अशी दादा-कॉंग्रेसमधील अनेक आमदारांची इच्छा होती. जनता पक्षाचे नेतेपद डॉ. काळदाते किंवा तत्सम व्यक्तीकडे गेले तर त्यांना मंत्रिमंडळ बनवायला पाठिंबा देण्याची त्या दादा-कॉंग्रेसवाल्यांची तयारी होती. दादा-कॉंग्रेसचे सहकार्य घेऊन मंत्रिमंडळ जनता पक्षाने बनवायला हरकत नाही, असे त्या वेळी नानाजींचेही मत होते असे भूतपूर्व जनसंघाच्या एका ज्येष्ठ नेत्याने सांगितले होते. म्हणून एस्. एम्. नी असे सुचविले की, काळदातेंना नेता म्हणून निवडावे. त्यानंतर श्री. नानाजी देशमुख यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला की, विधिमंडळात निवडून न आलेल्या व्यक्तीला नेता होता येणार नाही, असा निर्णय केंद्रीय पार्लमेंटरी बोर्डाने घेतला आहे. हा निर्णय आधीपासून घेण्यात आलेला नव्हता. जून १९७७ मध्ये झालेल्या अनेक राज्यांच्या विधानसभा निवडणुकांनंतर उत्तर प्रदेशात श्री. राम नरेश यादवांची व बिहारमध्ये श्री. कर्पूरी ठाकूर यांची नेतेपदी निवड झाली होती. ते दोघेही त्या वेळी विधिमंडळाचे सभासद नव्हते, लोकसभेचे सभासद होते पुढे काही महिन्यांनी हिमाचल प्रदेशात श्री शांताकुमार (जे भूतपूर्व जनसंघी आहेत) यांच्या नेतेपदाला आव्हान दिले जाऊ लागले. म्हणून केंद्रीय पार्लमेंटरी बोर्डात उपरोक्त निर्णय घेण्यात आला. याचा अर्थ बाहेरच्या व्यक्तीने विधिमंडळ पक्षाचा नेता होऊ नये, हे काही तत्त्व नाही. तो फार तर एक संकेत मानला जाऊ शकतो. तो बाजूला सारल्याने जर महाराष्ट्रात सुरुवातीलाच जनता पक्षाच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ बनवणे शक्य होते तर एवढे शब्दावर बोट ठेवायचे नानाजींना काय कारण होते? तत्त्व किंवा संकेतांचाच विचार करायचा झाला तर प्रत्यक्ष निवडणुकीत पडलेल्या उमेदवाराने अप्रत्यक्ष निवडणूक लढवू नये, हा महत्त्वाचा संकेत होऊ शकत नाही काय? काही भूतपूर्व जनसंघीयांनी तो संकेत ठरवावा असे म्हटले होते; पण श्री. मोतीरामजी लहानेंच्या वेळी संकेतप्रेम कुणी आपोआप बाजूला सारले हे श्री. भांडारी यांनी भूतपूर्व जनसंघवाल्यांना विचारायला हवे.

पण नानाजी तसे म्हणाले असले तरी जेव्हा एसेम मोरारजीभाईंना भेटले तेव्हा मोरारजीभाईंनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, हा दंडक बाजूला सारता येईल. मागे मद्रासमध्ये श्री. राजगोपालचारी व मुंबईत खुद्द श्री. मोरारजीभाई देसाई हे विधिमंडळाचे सभासद नसताना नेता निवडले जाऊन मुख्यमंत्री झाले होते. असो.

पुढे प्रदेश पदाधिकारी मुंबईला परतल्यावर नेता निवडीसाठी पक्षाची बैठक संध्याकाळी व्हायची होती तत्पूर्वी नेता-निवड एकमताने व्हावी असा प्रयत्न करण्यासाठी पन्नालाल सुराणा हे वसंतराव भागवत यांना भेटले होते; पण त्यांना यश आले नाही. त्यानंतर थोड्याच वेळात एका मित्रामार्फत श्री. मधु लिमयांना निरोप आला की, नेता-निवडीचे काम केंद्रीय पार्लमेंटरी बोर्डावर सोपवावे ही सूचना तुम्हाला मान्य आहे का? त्यावर मृणालताई, बापू काळदाते वगैरेंनी विचार करून होकार कळविला. त्यानंतर त्या मित्रामार्फत परत फोन आला की, नानाजींनाही ही सूचना मान्य आहे. त्या वेळी पाच वाजले होते. आता निवडणूक न होता निर्णय केंद्रीय पार्लमेंटरी बोर्डावर सोपवला जाईल असे सगळेचजण गृहीत धरून चालले होते.

जनता विधिमंडळ पक्षाची बैठक साडेसहा वाजता सुरू झाली. एसेम जोशींच्या प्रास्ताविकानंतर नानाजींनी सूचना मांडली की, नेता-निवडीचा निर्णय केंद्रीय पार्लमेंटरी बोर्डाकडे सोपवावा. मधु लिमयांनी त्याला पाठिंबा दिला. त्याबरोबर प्रा. राम कापसे, राम नाईक आदि भूतपूर्व जनसंघी आमदारांनी त्या सूचनेला विरोध केला मग नानाजी म्हणाले की, जर ही सूचना एकमताने मान्य होणार नसेल तर नेता-निवडीचे काम येथेच व्हावे. त्यानंतर मतदान झाले. त्यात शिक्षक मतदार संघातून निवडून आलेल्या व त्यामुळे कुठल्याही राजकीय पक्षाशी संबंध नाही असे म्हणणाऱ्या काही विधान-परिषद सदस्यांनाही मतदान करू देण्यात आले. मतदानात उत्तमराव विजयी झाले; पण त्यामुळे काही कॉंग्रेसी आमदारांचा पाठिंबा मिळण्याची शक्यता दुरावली व जनता पक्ष मंत्रिमंडळ बनवू शकला नाही. यावरून नकारात्मक भूमिका कुणाची होती हे सुज्ञांच्या लक्षात येईल.

कॉंग्रेसी आमदारांच्या पाठिंब्याचा मुद्दा विचारात घेण्याचे कारण नाही, असे ह्या वेळी प्रतिपादन करताना श्री. राम नाईक म्हणाले होते की, सत्तेवर यायची इतकी कशाला घाई करायची? विरोधी पक्ष म्हणून बसलो तर कुठे बिघडले? गंमत अशी की, त्यानंतर थोड्याच दिवसांनी स्वतः श्री. उत्तमराव पाटील जाहीरपणे म्हणाले की, श्री. शरद पवार दादा मंत्रिमंडळातून बाहेर पडणार असतील तर त्यांना मुख्यमंत्री करायची आमची तयारी आहे. लवकरच तसे घडलेही. तर 'आमच्या उत्तमरावांना मुख्यमंत्री होऊ दिले नाही,' म्हणून अनेक भूतपूर्व जनसंघी व 'विवेक', 'तरुण भारत' आदी पत्रे भूतपूर्व समाजवाद्यांचा दुःस्वास करू लागली. या कर्माला काय म्हणावे?

'जनसंघीयांचा न्याय्य हक्क' ही श्री. भांडारी यांची आवडती कल्पना दिसते. राम नाइकांचा म्हणे मुंबई जनता अध्यक्षपदावर न्याय्य हक्क. विदर्भातील पदवीधर मतदारसंघ 'आमचाच.' डॉ. वसंतकुमार पंडित यांची रिकामी झालेली जागा मधु देवळेकरांचीच. मग मुंबई पदवीधर मतदारसंघातील दोनपैकी एका जागेवर १९७० साली प्रा. मधु दंडवते निवडून आले असताना, १९७६ साली आणीबाणीच्या काळात एक त्या वेळच्या जनसंघाने व एक त्या वेळच्या समाजवाद्यांनी लढवावी व मिसाबद्ध असलेल्या प्रा. सदानंद वर्दे यांना ती जागा द्यावी, ही सूचना का मान्य झाली नाही? त्या वेळचा खोटेपणा तर असा की, एसेम व नानासाहेबांनी 'तुम्ही माघार घ्या' असे सांगितले आहे, असे खोटेच सांगून येरवड्याच्या तुरुंगात प्रा. सदानंद वर्दे यांची उमेदवारी मागे घेण्यासाठी सही घेण्यात आली व तो कागद खास मोटारीने मुंबईला पोहोचविण्यात आला. असे सगळे प्रकार करणारे ते विधायक व बाळासाहेब देवरसांविषयी गौरवपर लेख लिहिणारे पण बापू काळदात्यांना मत देणारे प्रा. सदानंद वर्दे मात्र नकारात्मक! आनंद आहे!! □